UNIVERSAL
LIBRARY

OU_192398

UNIVERSAL
LIBRARY

# बादशहा आठवे एडवर्ड यांचें चरित्र.



M 923.1
E 31N

# बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय.

लेखकः—

रामचंद्र पुरुषोत्तम नाडकर्णी.

प्रकाशकः—

न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६ केळेवाडी, गिरगाव, मुंबई नं. ४.

सन १९३६

किंमत ६ आणे.

मुद्रक व प्रकाशक—रघुनाथ दिपाजी देसाई.
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, ६ केळेवाडी,
गिरगाव मुंबई न. ४.

Checked 1969

# या पुस्तकाविषयीं कांहीं विद्वान् गृहस्थांचे अभिप्राय

**श्री. आर. व्ही. परुळेकर, एम्. ए., एम्. इडी., टी. डी., सेक्रेटरी म्युनिसिपल स्कूल्स कमिटी मुंबई, यांचा अभिप्रायः—**

"**बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय**" हे पुस्तक योग्यकाली लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल रा. रा. नाडकर्णी याचे मी अभिनंदन करतो. ब्रिटिश साम्राज्याच्या नूतन सम्राटाने आपले बालपण व तारुण्य कसे घालविले, त्याचा स्वभाव कसा आहे वगैरे गोष्टींबद्दल तीव्र जिज्ञासा साहजीकच बऱ्याच लोकामध्ये व विशेषतः विद्यार्थीवर्गामध्ये उत्पन्न झाली आहे. या पुस्तकाच्या वाचनानें ती चागलीच तृप्त होईल याबद्दल शका नाही. सर्व शिक्षण-संस्थांनीं तर या पुस्तकाचा भरपूर उपयोग करून घ्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे. आपल्या तरुण पिढीस या चरित्रापासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे. पुस्तकाची भाषा व रचना चांगली असून किंमतही माफक आहे.

ता० २२-५-३६ **रामचंद्र विठ्ठल परुळेकर**

**श्री. व्ही. आर. नेरूरकर, एम्. ए; एस् टी. सी., टी. डी. ( लंडन ), एम्. आर. एस्. टी. ( इंग्लंड ) प्रिन्सिपाल, चिकित्सकसमूह हायस्कूल, फेलो ऑफ् धी बॉम्बे युनिव्हर्सिटी, हे लिहितातः—**

" माझे मित्र रा. नाडकर्णी यानीं लिहिलेलें, " **बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय** " हे पुस्तक समग्र वाचले. पुस्तक अर्थातच लहान मुलांसाठीं लिहिलेले असल्यामुळे पुस्तकाची भाषा सुटसुटीत व लहान मुलांस सहज समजेल अशीच वापरली आहे. आपल्या बादशहाचें चरित्र आमच्या लहान तसेंच तरुण पिढीला आदर्शवत् असल्यामुळे हे पुस्तक मराठी चौथ्या इयत्तेंतील मुलामुलींच्या हातीं देण्यास अत्यंत लायक असून ह्या पुस्तकाचा प्रवेश दर म्युनिसिपालिटीच्या व खासगी शाळात होईल अशा तऱ्हेचा प्रयत्न लेखकांनी अवश्य करावा म्हणजे मुलाच्या मनात राजनिष्ठेचे बीजारोपण व अनुकरणीय चरित्राबद्दल साहजिकच वाटणारें प्रेम व आदर उत्पन्न करणें हीं दोन्ही कामे उत्कृष्ट रीतीनें साधल्याचें श्रेय त्याना लाभेल यांत बिलकूल शका नाही. अशी बाल-वाङ्मयाला पोषक पुस्तकें लिहून उदयोन्मुख नवीन पिढीला लेखकानीं मार्गदर्शक व्हावें अशी त्यांना आग्रहाची विनति करून हा छोटासा प्रशस्ति-लेख पुरा करतों. "

**डॉ. आर्. के. शिरोडकर, बी. एस्‌सी, पीएच्. डी., प्रिन्सिपाल, 'बॉम्बे एज्युकेशन लीग्ज हायस्कूल' यांचा अभिप्रायः—**

" रा. रामचंद्र पुरुषोत्तम नाडकर्णी यांनी लिहिलेल्या ह्या लहानशा पुस्तकांत लेखकानेंच एके ठिकाणीं ओघाने पुढीलप्रमाणे म्हटले आहे:—

" एका बड्या सम्राटाचे जीवन-चरित्र हे कादंबरीसारखेच रहस्यमय असते; त्यात लोकमतानुवर्ती राज्यघटनेचा पूर्ण सहानुभूतीने पुरस्कार करणाऱ्या ब्रिटिश सम्राटाच्या चरित्रांत हे रहस्य अधिक प्रमाणात प्रतीत होते "

बादशहा आठवे एडवर्ड ह्यांच्या चरित्रातला वरील प्रकारचा आकर्षकपणा रा. नाडकर्णी यांच्या लेखनशैलीने चांगलाच स्पष्ट झाला आहे व लेखकाच्या वर्णन-कौशल्यानें चरित्र-नायक बादशहा वाचकांच्या दृष्टीपुढे स्पष्ट उभे राहतात. मुलेसुद्धां हौसेने वाचतील असे हे पुस्तक उतरले आहे.

---

# महाराष्ट्र-भाषा-भूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांचें मतः—

## “ बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय ”

नुकतेच तख्तनशीन झालेले इंग्लडचे राजे आठवे एडवर्ड यांचें हें बरेच विस्तृत चरित्र श्री. रामचंद्र पुरुषोत्तम नाडकर्णी यानीं लिहिले आहे. यात बादशहा आठवे एडवर्ड याचे, त्याच्या जन्मापासून त्याच्या राज्यारोहणापर्यंतचे चरित्र मनोरंजक रीतीने दिले असून त्यात त्याच्या जीवनक्रमाविषयींच्या बहुतेक सर्व ठळक गोष्टी समाविष्ट झालेल्या आहेत. पुस्तकाची भाषा प्रायः शुद्ध आणि सुलभ असून वर्णनशैली सुदर आहे. ज्या ब्रिटिश साम्राज्याचा एक घटक होण्याचे हिंदुस्थानच्या नशिबीं आलेले आहे त्या साम्राज्याच्या नव्या अधिपतीच्या चरित्राची माहिती तरूण पिढीस असणे जरूर आहे व या दृष्टीने हे पुस्तक अगदीं योग्य वेळींच प्रसिद्ध होत आहे असे म्हणण्यास हरकत नाहीं. पुस्तकाचे बाह्यांगही चागलें असून आकाराच्या मानानें ६ आणे किंमत माफकच आहे.

मुबई ता. ७ मे<br>
सन १९३६

# प्रो. वसंतराव नारायण नाईक, एम्. ए. यांचे दोन शब्द.

श्री. नाडकर्णी यानीं विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले " **बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय** " हे पुस्तक मी समग्र वाचले, आणि त्यातील एकंदर मजकूर आणि विषयाची मांडणी, विद्यार्थीवर्गाला आठवे एडवर्ड बादशहाच्या चरित्राचे, रहस्य ओळखण्यास उपयुक्त अशीच आहे हे सागण्यास मला हरकत वाटत नाही. तरूण व लहानग्या विद्यार्थ्यांकडून कोवळ्या वयात थोर व कर्तव्यदक्ष अशा पुरुषाचीं चरित्रे वाचून घेतल्यास त्याचा योग्य तो परिणाम त्याच्या मनावर झाल्याशिवाय रहात नाही. राजे व राजपुत्र याचे एकदर जीवित चैन आणि ऐषआरामातच गेले पाहिजे अशी आपल्याकडे सर्वसामान्य समजूत आहे. " श्रीमंत माणसाला व त्याच्या मुलांना शिकून करावयाचे तरी काय ? त्याना पोटापाण्याचा प्रश्नच उरत नाहीं, मग अशी दगदग कशाला ? " अशा तऱ्हेचा हीन युक्तिवाद आपणामध्यें अजूनही आढळतो. म्हणून ब्रिटिश साम्राज्याचे सत्ताधीश होण्याचा वारसा स्वतःकडे येत असूनही, प्रिन्स ऑफ वेल्स या नात्याने आज तख्तनशीन असलेल्या बादशहानीं आपल्या वयाच्या अवघ्या चाळीस वर्षाच्या आत ठिकठिकाणीं प्रवास करून, स्वदेशाची व परदेशांची लोकस्थिति प्रत्यक्ष अवलोकन करून आणि विश्वविद्यालयांत जाऊन व खास शिक्षकाच्याद्वारे जे शिक्षण संपादन केले त्याची माहिती येथील विद्यार्थ्यांना असणें अवश्य वाटते.

राजकीय थोर पुरुष या नात्यानें बादशहावरील जबाबदारी फार मोठी आहे. त्याची पूर्वतयारी तितक्याच कसोशीनें केल्याविना इतराच्या हातातील बाहुलें होऊन बसण्याचा प्रसंग त्यांजवर ओढवतो, हे तत्त्व इंग्लंडच्या राजघराण्यानें, महाराणी व्हिक्टोरिया याच्या कारकिर्दीपासून जसे आत्मसात् केले आहे तसे ते इतरत्र क्वचीतच आढळेल. याच परंपरेत साप्रतचे एडवर्ड बादशहा वाढले आणि त्याचें शील बनविण्यात आले. राजपुत्र असूनही सामान्य जनतेप्रमाणे वागण्यात त्यांना लाज वाटत नाही. त्याच्या सुखदुःखाशीं समरस होणे हेच आपले आद्यकर्त्तव्य आहे असे ते समजतात. तिसऱ्या जॉर्जला, " तूं देशाभिमानी राजा हो " अशी संथा त्याच्या गुरूनीं दिली होती. एडवर्ड बादशहाचा आदर्श Patriot King होण्याचा नसून Democratic King होणे हा आहे; आणि शरीर, मन आणि वासना याना त्यानीं तशाच प्रकारचे वळण लाविलें आहे. ते राजेसाहेब म्हणूनच थोर आहेत असे नसून प्रयत्नाने थोरपणाचे गूण त्यानीं आपणात आणिले आहेत, म्हणूनच त्याचा गुणगौरव आज होत आहे. हें छोटेखानी चरित्र वाचीत असताना ठिकठिकाणीं या गुणसमुच्चयाचें लेखकाने योग्यप्रकारें आविष्करण केल्याची प्रतीति मिळाली. याचा विद्यार्थ्यांनीं चागलाच उपयोग करून घ्यावा अशी आशा व्यक्त करून हे दोन शब्द पुरे करतो.

ता. २० मे सन १९३६ — व. ना. नाईक.

# प्रास्ताविक

ब्रिटिश राजघराण्याचा वंशवृक्ष या पुस्तकांत अन्यत्र दिला आहे. त्यावरून दिसून येईल कीं बादशहा आठवे एडवर्ड हे ब्रिटिश सिंहासनावर अधिष्ठित झालेले ३७ वे राजे होत. राजपदारूढ झालेल्या आपल्या कोणत्याही पूर्वजापेक्षां हे जास्त सुसंस्कृत आहेत. बादशहा सातवे एडवर्ड याची कारकीर्द दहाच वर्षे झाली, आणि पंचम जॉर्ज बादशहाची कारकीर्द २५ वर्षे झाली. पण बादशहा आठवे एडवर्ड हे राजपदावर आरूढ होण्यापूर्वी, त्याचा राजकारणांतील व सार्वजनिक कार्यातील अनुभवच सन १९१४ म्हणजे महायुद्धाच्या सुरवातीपासून ते अधिकारारूढ होईपर्यंत दरम्यानच्या पूर्ण २० वर्षांचा आहे. या वीस वर्षातील त्यांचे कार्य केवढे मोठें झालेलें आहे हे या पुस्तकातील हकीकतीवरून लक्षात येईल, व त्यावरून खात्री होईल की राज्यकारभार चालवण्यास अत्यावश्यक असे अनुभवात्मक शिक्षण मिळालेले, बादशहा आठवे एडवर्ड हे या राजघराण्यांत पहिलेच पुरुष होत. या त्याच्या वैयक्तिक वैशिष्ठ्यामुळे त्याची कारकीर्द ब्रिटनच्या सनदशीर राज्यकारभाराच्या अमदानींतील पूर्वीच्या कोणत्याही कारकिर्दींपेक्षां जास्त उज्ज्वल व कर्तबगारीची होईल अशी ब्रिटिश जनतेची आपेक्षा आहे.

अशा या थोर पुरुषाचे आतांपर्यंतचें चरित्र मराठी वाचकांस त्यातही विशेषतः आमच्या तरूण पिढीस माहित व्हावे म्हणून हा

अल्पसा प्रयत्न केला आहे. ता० २१ जानेवारी सन १९३६ रोजीं त्यास राज्याधिकार–प्राप्ति झाल्यानतर त्याच्याविषयीं जी माहिती ठिकठिकाणी प्रसिद्ध झालेली माझ्या वाचनात आली तीच येथे माझ्या भाषेत संग्राहित केली आहे. हा प्रयत्न कितपत साधला आहे हे ठरविणे वाचकाकडे आहे.

ज्या वृत्तपत्रात व नियतकालिकांत ही माहिती मला मिळाली त्याचे व ज्या विद्वान् गृहस्थानी या प्रयत्नास मला उत्तेजन दिलें त्यांचे व 'न्यू भारत' प्रिंटिंग प्रेसचे चालक श्री. रा. रघुनाथ दिपाजी देसाई याचे मनःपूर्वक आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे.

ता. २५ मे सन १९३६ } रामचंद्र पुरुषोत्तम नाडकर्णी.

---

# अनुक्रमणिका.


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | पृष्ठ |
| भाग १ | जन्म, बाळपण व तारुण्य. | .... | .... | | १ |
| भाग २ | राज्याधिकार—प्राप्ति | .... | .... | | १६ |
| भाग ३ | बादशहाचा कार्यक्रम | ... | .... | | २८ |
| भाग ४ | बादशहाच्या काही गोष्टी | .... | .... | | ५५ |
| भाग ५ | भविष्यकालीन अपेक्षा | .... | ... | | ८५ |



बादशहा आठवे एडवर्ड

# बादशहा आठवे एडवर्ड
## यांचा
# हिंदुस्थानास संदेश.

ता. १ मार्च १९३६ रोजी बादशहानी साम्राज्यातील सर्व प्रजेस रेडिओद्वारे संदेश पाठवला, त्यात हिंदुस्थानास पाठविलेला सदेश असा आहे'—

" हिंदुस्थानचे राजेमहाराजे व हिंदी लोक यास आम्ही बादशहा या नात्याने अभिवादन करतो. प्रस्तुत प्रसंगी आपण सर्वांनी राजनिष्ठापूर्वक जी सहानुभूति प्रदर्शित केली त्या योगाने आम्हास अत्यत समाधान वाटत आहे. "

" शाततेच्या कालात अगर युद्ध-परिस्थितीत ब्रिटिश व हिंदी लोक याजमधील परस्परसबध दीर्घकालपासून चालत आलेले असून ते सन्माननीय स्वरूपाचे आहेत. हे सन्माननीय सबध पुढे चालवून ते दृढतर करण्याचे जे उदाहरण महाराणी व्हिक्टोरिया, सातवे एडवर्ड व पंचमजॉर्ज बादशहा यानी घालून दिले ते त्याचे वंशज व वारस या नात्याने पुढे चालवणे हे आमचें पवित्र कर्तव्य आहे. "

# बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय.

## भाग १

### जन्म, बाळपण व तारुण्य

सन १९०१ सालची गोष्ट. लंडन येथील राजवाड्यांत एक सात वर्षांचा राजकुमार एके दिवशीं आपल्या दाईला मनास येतील ते नाना प्रकारचे प्रश्न विचारून भंडावून सोडीत होता. इंग्लंडच्या सम्राज्ञी 'महाराणी व्हिक्टोरिया' या नुकत्याच मृत्यू पावल्या होत्या आणि त्या देवलोकीं गेल्या असे त्या दाईनें या राजकुमारास सांगितल्यावर, देवलोक म्हणजे स्वर्ग, तो कुठेंसा आहे, तो कसा असतो, याविषयीं त्या राजकुमारानें त्या दाईवर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली होती. देवाचे आणि देवलोकाचे वर्णन पूर्वीं या राजकुमारानें मोठ्या लोकांच्या तोंडून ऐकलें होतें, आणि आपली दाई ही मोठी शहाणी आहे, तिला सर्व कांहीं माहित आहे असें त्याच्या सात्त्विक बालवृत्तीस वाटत असल्यामुळें जिज्ञासापूर्वक त्यानें ही चौकशी चालविली होती आणि त्याला कांहींतरी उत्तर दिलें पाहिजे म्हणून ती दाईहि त्याला उत्तरें देत होती. त्या बालकानें तिला विचारलें, 'काय ग नानी, देवलोकीं गेलें म्हणजे सर्वच देव होतात तें खरें ना ?' ती दाई म्हणाली 'होय तर! स्वर्गांत जातात ते सगळे सारखे होतात. तेथें

एक लहान एक मोठा असा भेद नाहीं. कोण कोणाचा चाकर नाही आणि कोण कोणाचा धनी नाहीं ! ' हे ऐकून तो राजकुमार थोडा वेळ विचारात पडल्यासारखा दिसला, आणि नंतर त्या दाईस म्हणतो 'देवलोकीं असे आहे तर ! वाः हें फारच चांगलें ! पण आमच्या बड्या आजीला ते काहीं पसंत पडायचे नाहीं. '

एका राजकुमाराचे बालवृत्तीतील हे विचार असले तरी त्या विचारात भावी वृत्ती बीजरूपानें प्रतीत होते. हा राजकुमार म्हणजे नुकतेच अधिकारारूढ झालेले ब्रिटिश साम्राज्याचे अधिपति आणि हिंदुस्थानचे बादशहा आठवे एडवर्ड हे होत. ज्या ब्रिटिश साम्राज्याच्या सत्तेखाली आज हिंदुस्थान देश आहे त्या ब्रिटिश साम्राज्याचीं सूत्रे परमेश्वरी संकेतानें त्यांच्या हातीं आली आहेत. अशा या भाग्यशाळी बादशहांच्या आजपर्यंतच्या आदर्श चरित्राचा परिचय आमच्या तरूण पिढीस असणें इष्ट व आवश्यक आहे. म्हणुन तो या ठिकाणी संक्षेपतः करून देण्यात येत आहे.

बादशहा आठवे एडवर्ड यांचें वय आज ४१ वर्षांचे आहे. त्याचा जन्म ता. २३ जून सन १८९४ रोजीं लंडन नजीक रिचमंडपार्क येथील व्हाइटलॉज या राजवाड्यांत झाला. त्यावेळीं इंग्लंडच्या गादीवर महाराणी व्हिक्टोरिया या होत्या. महाराणी व्हिक्टोरिया यांचे ज्येष्ट पुत्र एडवर्ड, हे पुढे सातवे एडवर्ड या नावानें ब्रिटिश साम्राज्याचे राजे झाले. सातव्या एडवर्ड बादशहांचे ज्येष्ट पुत्र निवर्तल्यानें द्वितिय पुत्र जॉर्ज यांजकडे एडवर्ड बादशहांच्या पश्चात् सन १९१० सालीं इंग्लंडच्या गादीचा वारसा आला व ते पंचमजॉर्ज नावानें गादीवर बसले. पंचमजॉर्ज बादशहा ता. २० जानेवारी सन १९३६

रोजीं निधन पावले; तेव्हां त्यांचे ज्येष्ट पुत्र हे आठवे एडवर्ड यांजकडे हा वारसा आला.

यावरून लक्षांत येईल की व्हिक्टोरिया महाराणीचे हे पणतू होत. व्हिक्टोरिया महाराणींच्या पश्चात् त्यांचे पुत्र एडवर्ड हे गादीचे वारस होते. अर्थात् त्यांचे ज्येष्ट पुत्र यांजकडे राज्याचा भावी वारसा येणार होता. पण सातव्या एडवर्ड बादशहांचे हे ज्येष्ट पुत्र सन १८९२ सालीं निवर्तल्यानें, द्वितिय पुत्र जॉर्ज यांजकडे हा भावी वारसा गेला. एडवर्ड बादशहा गादीवर बसल्यावर पंचम जॉर्ज हे ' प्रिन्स ऑफ् वेल्स ' म्हणजे युवराज झाले, व पंचम जॉर्ज गादीवर बसल्यावर ही ' प्रिन्स ऑफ् वेल्स ' पदवी त्याचे वडील पुत्र या नात्यानें एडवर्ड यांस मिळाली. इंग्लंडच्या गादीवर एडवर्ड या नांवांचे यापूर्वी सात राजे होऊन गेले. म्हणून यांस ' आठवे एडवर्ड ' हें नांव प्राप्त झालें आहे.

ख्रिस्ती धर्मात अशी चाल आहे कीं मूल जन्मास आलें कीं, त्या धर्माची दीक्षा त्यास द्यावी लागते व त्यासाठी कांहीं धार्मिक संस्कार करावा लागतो. या संस्कारास बाप्तिस्मा असें म्हणतात. या संस्काराचे वेळीं त्या मुलाचे जे आप्त व धर्मोपाध्ये हजर असतात त्यांपैकीं कांहीं त्या मुलाचे धर्मपिते ( गॉड फादर ) होतात. अर्थात् मुलगी असली तर स्त्रिया धर्ममाता होतात. प्रत्येक धर्मपिता एक एक नांव त्या मुलास देतो. अनेक धर्मपित असले तर तेवढीं नांवें लागतात. त्याप्रमाणें आमच्या बादशहांचें सबंध नांव **एडवर्ड आलबर्ट ख्रिस्तीयन् जॉर्ज अँड्र्यू पॅट्रिक डेव्हिड** " असें आहे. हा बाप्तिस्मा विधि त्यांच्या जन्माच्या २३ व्या दिवशीं आर्च बिशप ऑफ कँटरबरी यांच्या हस्तें झाला.

वयास सात वर्षें होईपर्यंत त्यांच्या शिक्षणाची कांहीं विशेष तजवीज करण्यांत आली नव्हती. जॉर्ज बादशहा हे प्रथमतः राज्याचे संभवनीय वारस नसल्यामुळें दरबारची नेमणूक घ्यावी आणि राजघराण्यांतील पुरुषास योग्य अशा व्यवसायाचें शिक्षण घेऊन तो व्यवसाय करावा अशी त्यांच्या भावी जीवनक्रमाची रूपरेषा आखलेली होती. त्यांच्याच सान्निध्यांत त्यांच्या या चिरंजिवांचीं पहिलीं कांहीं वर्षें गेलीं व तेवढ्या अवधींत त्यास थोडेसे सामान्य तऱ्हेचें प्राथमिक शिक्षण मिळालें.

सन १९०२ साली म्हणजे वयाच्या आठव्या वर्षीं मि. एच. पी. हॅन्सेल यांस त्याचे खास शिक्षक नेमण्यात आलें. हे शिक्षक त्याजकडे सन १९१४ च्या ऑगस्ट महिन्यापर्यंत होते. राजकुमाराने ब्रिटिश आरमार खात्यांत जावें, या भावी धोरणानें त्यांच्या शिक्षणास सुरवात झाली, व सन १९०२ पासून १९०७ पर्यंत त्यांस त्या प्रकारचें प्राथमिक शिक्षण देण्यांत आलें. सन १९०७ सालीं ते ऑसबोर्न येथील कॉलेजात गेले, आणि तेथे दोन वर्षें अभ्यास करून नंतर डार्टमाऊथ येथील रॉयल नेव्ही कॉलेजमध्यें दाखल झाले.

या कॉलेजांतील आरमारी शिक्षणाचा अभ्यासक्रम सन १९११ सालीं पुरा झाल्यावर त्यांना ‘ नाईट ऑफ् धी गार्टर ’ ही पदवी देण्यांत आली. इंग्लंडांतील सरदारवर्गात ही सर्वांत श्रेष्ठ दर्जाची पदवी आहे. सातवे एडवर्ड बादशहा निधन पावल्यावर पंचम जॉर्ज बादशहा हे पूर्वी सांगितलेल्या हक्कानुसार गादीवर आले, आणि बादशहांचे ज्येष्ठ पुत्र म्हणून राजपुत्र एडवर्ड यांस ‘ प्रिन्स ऑफ्

वेल्स ' या पदवीचे अधिकार ता. १३ जुलई सन १९११ रोजीं देण्यांत आले याशिवाय ' अर्ल ऑफ चेस्टर ' ही पदवी त्यांस मिळाली. याच सुमारास कॉर्नवाल परगण्यांतील जहागिरी त्यांस मिळाल्यामुळें ' ड्यूक ऑफ् कॉर्नवाल ' ही पदवी त्यांस प्राप्त झाली. ' प्रिन्स ऑफ् वेल्स ' ही पदवी दिल्यावर यौवराज्यपदाचा अभिषेक-समारंभ वेल्स प्रांतांत काइरनार्व्हन येथे झाल्यावर ब्रिटिश आरमार खात्यांत ' एच्. एम्. एस्. हिंदुस्थान ' या जहाजावर 'मिडशिपमन' च्या हुद्यावर त्यांची नेमणूक झाली. या ठिकाणीं त्यांनीं तीन महिने काम केलें.

सन १९१२ सालच्या उन्हाळ्यांत युवराज, फ्रेंच भाषा शिकण्या-साठीं व फ्रेंच राष्ट्राच्या इतिहासाची माहिती करून घेण्यासाठी पॅरिस येथें मार्किस ऑफ ब्रिटुल यांच्याकडे जाऊन राहिले. तेथें मॉरिस एस्काफीर यांजकडून त्यांस पाहिजे होते ते शिक्षण मिळाले. सन १९१२ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत ते ऑक्सफर्ड येथील मागडालेन कॉलेजमध्ये दाखल झाले. या ठिकाणी युवराजाची राहणी इतर सामान्य विद्यार्थी राहतात त्याच प्रकारची होती. कॉलेजला सुटी असेल तेव्हां ते युरोपांत प्रवास करीत असत. याप्रमाणें त्यांनीं सुटीच्या मुदतींत जर्मनी, देन्मार्क, नार्वे हे देश फिरून पाहिले. कॉलेजचें हे उच्च शिक्षण आणखीहि कांहीं काल त्यांस मिळाले असते, पण सन १९१४ सालीं महायुद्ध सुरू झाल्यामुळें तो बेत रद्द करावा लागला.

ता. ४ आगस्ट सन १९१४ रोजीं इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध सुरू केलें. ता. ७ आगस्ट रोजीं युवराजांची नेमणूक लष्करात ' ग्रेनेडियर गार्ड्स ' मध्यें झाल्याचें जाहीर करण्यांत आलें आणि त्याप्रमाणें

ता.११ ऑगस्ट रोजी ते इसेक्स येथें आपल्या पलटणींत कामावर हजर झाले. या कामावर अठरा महिने फ्लँडर्स येथे होते. सन १९१६ साली भूमध्यसमुद्रांच्या लगत पाठविलेल्या लष्कराच्या सेनापतीच्या हाताखालीं त्यांची नेमणूक झाली, आणि त्याप्रमाणें ते इजिप्तमध्यें गेले. सन १९१७ च्या ऑक्टोबर महिन्यात इटली देशांत त्यांस पाठविण्यांत आले, आणि तेथील युद्धाची समाप्ति झाल्यावर ते फ्रान्समध्यें आले.

जगातील सर्वांत मोठ्या साम्राज्याच्या बादशहाचा पुत्र-युवराज, गादीचा भावी वारस-म्हणजे अत्यंत वैभवशाली तरूण, त्याने ऐष-आरामांत लोळत पडावे, दासदासी, नोकर चाकर, गाड्या घोडे, मोटार विमाने असल्या विपुल सुखसाधनाच्या उपभोगांत निमग्न असावे अशी ज्यांची कल्पना असेल, त्यांनी वरील वर्णनावरून हे ब्रिटिश राजघराणे, सुखोपभोगापेक्षा स्वकर्तव्यपालनाकडे किती तत्पर असतें हे पहावे. ब्रिटिश साम्राज्याचा उत्कर्ष, मोठेपणा याचें पुष्कळसे रहस्य त्या साम्राज्याच्या सूत्रचालकांमध्यें वास्तव्य करीत असलेल्या या प्रमुख गुणामध्ये आहे.

जगावर चारही खंडांत पसरलेल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत त्यांनीं प्रवास केला आहे. सन १९१९ साली ते अमेरिकेंत कॅनडा येथें गेले होते. तेथें ते तीन महिने राहिले, व त्या अवधींत ब्रिटिश साम्राज्याचे युवराज या नात्यानें त्यांनी युनायटेडस्टेट्सचे प्रेसिडेंट यांस भेट दिली.

सन १९२० च्या मार्च महिन्यांत ते न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया या देशास गेले व तिकडून परत येत असतां वेस्टइंडीज बेटांत त्यांनीं तीन आठवडे प्रवास केला.

सन १९२१ सालीं ऑक्टोबर महिन्यांत ' रिनाऊन ' बोटीनें ते हिंदुस्थानांत येण्यास निघाले, व ता. १७ नवंबर रोजी मुंबई बंदरांत उतरले. हिंदुस्थानात निरनिराळ्या प्रांतांत प्रवास करण्यांत काही आठवडे गेल्यावर ते कलकत्ता येथून ब्रह्मदेशांत रंगून येथें जावयास गेले. रंगूनहून मंडाळे येथें गेल्यावर तेथून परत हिंदुस्थानात मद्रास येथे ता. १३ जानेवारी सन १९२२ रोजीं आले. ता. १४ फेब्रुवारी रोजीं दिल्ली येथील वरिष्ट कायदेमंडळानें त्यांस मानपत्र दिलें. तेथून वायव्य सरहद्दीवरील प्रातात गेले व ता. ७ मार्च रोजीं कराची बंदरातून जपानकडे जावयास निघाले. वाटेत सिलोनची राजधानी कोलंबो हे शहर त्यानीं पाहिलें व पुढील प्रवासांत मार्गांतील पोर्ट स्वीटनहॅम, सिंगापूर, हॉंगकॉंग हीं ठिकाणें पाहून टोकिओ येथें एप्रील महिन्यांत ते पोचले. जपानांत मेअखेरपर्यंत राहून तेथून परत स्वदेशीं जाण्यास निघाले. जाताना मानिल्ला, बोर्निओ, पीनांग केरो वगैरे शहरे पाहून जून महिन्यांत प्लायमाऊथ येथें पोचले.

महायुद्धात जे ब्रिटिश सैनिक शत्रुपक्षाच्या कैदेंत सांपडले होते त्यांस राजकीय कैदी या नात्यानें सहानुभूतीने वागविण्यांत आलें या गोष्टीच्या निदर्शनार्थ, तह होऊन महायुद्ध बंद झाल्यावर, ब्रिटिश सरकारनें ब्रुसेल्स येथें एक जयस्तंभ उभारला होता, त्याचा अनावरण समारंभ करण्याकरितां युवराज सन १९२३ च्या एप्रील महांत ब्रुसेल्स येथें गेले, व तो समारंभ झाल्यानंतर फ्लँडर्स व उत्तर फ्रान्स येथील रणक्षेत्रे पुनः एकदा पाहून आले. पुढील सप्टेंबर महांत, कॅनडा प्रांतांत आलबर्टा येथें त्यांची गोवर्धन संस्था आहे ती पाहण्या-

साठीं कानडा प्रांतास त्यांनी खासगी रीतीनें भेट दिली आणि ऑक्टोबर महांत इंग्लंडास परत आले.

सन १९२४ च्या एप्रील महिन्यांत वेम्बले येथें ' ब्रिटिशसाम्राज्य प्रदर्शन त्याच्या अध्यक्षतेखालीं भरलें होते. या प्रदर्शनास जॉर्ज बादशहांनी भेट दिली त्यावेळीं त्यांचें स्वागत युवराजांनीच केलें. हें साम्राज्य-प्रदर्शन त्या सालच्या नवंबर महिन्यापर्यंत चालू होते. दरम्यान युवराज कॅनडांतील आपल्या गोवर्धन संस्थेस पुनः एकदा भेट देण्यासाठी गेले व प्रदर्शन संपण्याचे वेळी परत आले. कॅनडातील या सफरीत त्यावेळीं युनायटेड्स्टेट्स्मध्यें आंतर्राष्ट्रीय पोलोचे सामने सुरू होते, ते पाहण्यासाठीं त्यांनी खासगी रीतीनें भेट दिली. या भेटींत अमेरिकेचे प्रेसिडेंट कुलिज यांनीं त्यांस चहापार्टी दिली होती. सन १९२३-२४ सालात इंग्लंडांत पश्चिम यॉर्कशायर, बार्मिंगहम, न्यु-कॅसल-ऑन-टाईन, नॉटिंगहॅम, डंडी, उत्तर वेल्स प्रात या भागातील हरएक प्रकारच्या उद्योगधंद्याचे कारखाने व मातीच्या भांड्यांचे कारखाने त्यांनीं फिरून पाहिले.

सन १९२५ सालच्या मार्च महिन्यांत ते आफ्रिका खंडाच्या दौऱ्यावर निघाले. या खेपेच्या त्यांच्या बोटीचे नांव ' रिपल्स ' असें होतें. आफ्रिका खंडाच्या पश्चिम व दक्षिण भागांत त्यांनीं प्रवास केला. आफ्रिका खंडाच्या पश्चिम किनाऱ्यावर सेनेगाल प्रांतांत बॅथर्स्ट हें ब्रिटिश बंदर आहे, तेथें त्यांची बोट एप्रील महिन्यांत आली, व त्या बंदरीं उतरून सेनिगाल, सेरालिऊन, गोल्डकोस्ट, नायगारा या ब्रिटिश वसाहती त्यांनीं फिरून पाहिल्या. त्यानंतर नायगाराचें बंदर लागूस येथें बोटीवर चढून ते आफ्रिकेच्या दक्षिण

टोंकाच्यां वसाहतीकडे जाण्यासाठी गेले व केपटाऊन येथें उतरले, त्या प्रांतांत सर्वत्र प्रवास करून ट्रान्स्केयी या तद्देशीय लोकांच्या वसाहतीचा प्रांत आहे तिकडे गेले. ऑरेंज फ्रीस्टेट प्रातांत मासेरू येथें, घोड्यावर बसण्यांत पटाईत अशी ज्यांची प्रसिद्धी आहे असे ५०००० बासुटो घोडेस्वार त्यांचें स्वागत करण्यासाठीं जमले होते.

आफ्रिकेच्या आग्नेय किनाऱ्यावर म्हणजे नाताळ प्रांतात डर्बान नांवाचें ब्रिटिशांचें मोठें बंदर आहे तेथें एक नवी गोदी उघडण्याचा समारंभ या दौऱ्यांत त्याच्या हस्तें करण्यांत आला. या प्रांतात आपल्या हिंदुस्थानांतले बरेच लोक व्यापारानिमित्त जाऊन राहिले आहेत. यावेळीं सुमारें २५००० हिंदी लोक युवराजांचें स्वागत करण्यासाठीं जमले होते. ही कामगिरी झाल्यावर आफ्रिकेंतील झुलू, स्वाझी या लोकांचे मुलूख त्यांनीं फिरून पाहिले व त्यानंतर ट्रान्सवालचीं मुख्य शहरें प्रीटोरिया व जोहान्सबर्ग येथें विटवॉटरसॅंड युनिव्हर्सिटीचा उद्घाटन समारंभ त्यांच्या हस्ते करण्यांत आला. मेफकिंग, बेचुआनालॅंड, र्‍होडेशिया हे प्रांतही त्यांनीं फिरून पाहिले व परत स्वदेशी जाण्यासाठी केपटाऊन येथे आल्या वेळीं त्यानीं किंबर्ले शहरास भेट दिली. या खेपेचा हा आफ्रिकेचा दौरा तीन महिने चालू होता.

दक्षिण अमेरिकेंत ‘ आर्जेंटाईन ’ नांवाचें एक लोकसत्ताक संस्थान आहे. त्या संस्थानच्या प्रेसिडेंटनीं युवराजांस आपल्या संस्थानचे सन्मान्य पाहुणे म्हणून येण्याबद्दल आग्रहाचें आमंत्रण दिलें होतें व सवड होतांच येतो असे सांगून त्यांनीं त्या आमंत्रणाचा स्वीकार केला होता. म्हणून आफ्रिकेचा दौरा संपल्यावर ते जुलै महिन्यांत निघाले व ऑगस्ट महिन्यांत युराग्वेची राजधानी मॉटेव्हिडिओ येथें पोंचले.

युराग्वे प्रातांत दोनचार दिवस राहून ते ब्यूनॉस आयर्स येथें गेले व तो प्रात कांहीं दिवस त्यांनीं फिरून पाहिला. या व जवळच्या प्रांतांत शेतीच्या उपयोगी अशा जनावरांची पैदास फार मोठ्या प्रमाणावर होते. युवराजांस गुरांची फार आवड असल्यामुळें त्यांनी या प्रातांत सुमोरें १५०० मैलाचा प्रवास केला. त्यानंतर चिली प्रातांतील वालपरैसो आणि सॅंटियागो ही शहरें पाहून ते ब्यूनॉस आयर्स येथे परत आले. सप्टेंबर महिन्यात ते इंग्लंडास जावयास निघाले व ऑक्टोबर महिन्यांत पोर्टस्मथ येथें येऊन पोंचले.

सन १९२६ सालीं युवराजाची प्रकृति किंचित नादुरुस्त होती व थोडासा कानाचा विकार झाल्यामुळें कानावर शस्त्रक्रिया करावी लागली होती. यामुळे प्रवास किंवा सार्वजनिक कामे यांत त्यांना विशेष लक्ष घालता आलें नाही. तथापि ऑक्सफर्ड येथें ब्रिटिश असोशिएशनच्या परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांनीं स्वीकारलें आणि पारिस येथें कॅनडा प्रांतांतील विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृह बांधलें होतें त्याचा प्रवेशसमारंभ करण्याबद्दल फ्रान्सच्या अध्यक्षांनी त्यांस सरकारी नात्यानें निमंत्रण दिल्यावरून तोही समारभ तेथे जाऊन त्यांनी केला.

सन १९२७ साली ग्रेटब्रिटनमधील उद्योगधंदे व कारखाने याचें त्यांनी ठिकठिकाणीं जाऊन निरीक्षण केलें. यावेळीं मि. स्टॅन्ले बाल्डविन हे इंग्लंडचे मुख्य प्रधान होते. कॅनडा प्रांतांत एकसूत्री राज्यपद्धत झाली त्याचा शतसांवत्सरिक उत्सव याच वर्षी होता म्हणून युवराज मुख्य प्रधानांसमवेत कॅनडा येथें गेले. येथें पुष्कळ बड्या मंडळींशीं त्याचा परिचय झाला.

युवराजांच्या प्रवासाची थोडीशी सविस्तर माहिती या ठिकाणीं

देण्याचें कारण असें कीं राज्यकारभाराची प्रत्यक्ष जबाबदारी त्यांच्यावर नसतानाही भर तारुण्यांत ऐषआराम गौण मानून त्यांनीं प्रवासाचे किती श्रम काढले आणि सार्वजनिक कार्याची त्यांना मनापासून कशी आवड आहे हे दिसून यावे. यात कांहींतरी उपयुक्त कार्यक्रमाशिवाय त्याचा एक दिवसही आजपर्यंत गेला नाही. त्यांच्या उद्योगशील व सार्वजनिक मनोवृत्तीमुळें त्यांच्या कार्याचा व्याप सारखा वाढत चालला आणि त्यापायी वेळच वाट्यास येईनासा झाल्यामुळें प्रवासाच्या वेळाची शक्य तेवढी बचत व्हावी म्हणून सन १९२८ साली त्यांच्यासाठी खास विमानाची योजना करण्यांत आली. लगेच वैमानिक प्रवासाची त्यास आवड उत्पन्न झाली आणि विमान चालवण्याची कला त्यांनी लवकरच हस्तगत करून घेतली. ठरलेले कार्यक्रम अगदी वेळेवर अमलात आणण्यासाठीं आपले विमान पुष्कळ वेळां ते स्वतः चालवितात.

याच सालच्या सप्टेंबर महिन्यांत युवराज, आपले बंधू डयूक ऑफ् ग्लूस्टर यांस घेऊन पूर्व आफ्रिकेस गेले, व केनिया प्रांताचें बंदर मोंबासा येथें उतरले. या ठिकाणीं ते शिकारीसाठीं गेले होते. पण शिकारीचा कार्यक्रम सुरू होतो न होतो इतक्यात जॉर्जबादशहा लंडनांत जास्त आजारी पडल्याचे वर्तमान येऊन थडकलें, त्यामुळें पुढील कार्यक्रम एकदम रद्द करून ते तांतडीनें परत आले. हा ६००० मैलाचा प्रवास त्यांनीं १४ दिवसांत केला.

सन १९२९ सालीं इंग्लंडांत कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या मजुरांत मंदीमुळें असंतोष उत्पन्न झाला होता त्यासाठीं तेथील वस्तुस्थितीचें निरीक्षण करण्याकरितां ते कित्येक प्रमुख खाणींत जाती-

निशी जाऊन त्यांनीं मजुरांच्या तक्रारी ऐकल्या. त्यांच्या पगाराचे कागदपत्र पाहिले, मजुरांची प्रत्यक्ष स्थिति पाहिली आणि त्यांत मजुरांच्या स्थितींत सुधारणा होणें जरूर आहे असें स्पष्ट मत जाहीर केल्यामुळें ब्रिटिश जनतेस या प्रश्नाचा विचार करावा लागला.

सन १९३० सालच्या आरंभीं ते पुनः दक्षिण आफ्रिकेच्या सफरीवर निघाले आणि तिकडील प्रत्येक प्रमुख स्थळास त्यांनी भेट दिली. सन १९३१ सालींसुद्धा त्यांनीं प्रवास केला. यावेळीं राजपुत्र जॉर्ज हे त्यांच्याबरोबर होते. हा प्रवास त्यांनीं दक्षिण अमेरिकेंत केला. दक्षिण अमेरिकेंत अनेक प्रजासत्ताक संस्थानें आहेत. त्या सर्व संस्थानांत युवराजांचा सत्कार करण्यासाठीं एकमेकांत चढाओढ लागली होती! या दोन राजपुत्रांनीं आपल्या समर्पक व प्रेमळ भाषणांनी व खेळीमेळच्या वागणुकीनें या प्रांतांतील जनतेस भारून टाकलें इतके ते लोक त्यांच्यावर खूष झाले. या दौऱ्यांत ही संस्थानें व ग्रेटब्रिटन यांजमध्ये युवराजांच्या प्रेरणेनें सलोख्याचे व्यापारी संबंध प्रस्थापित झाले. सन १९३१ च्या मध्याच्या सुमारास हा दौरा संपवून ते परत इंग्लंडास आले.

सन १९३२ सालपासून आतांपर्यंत युवराजांनीं मोठमोठे लांबचे प्रवास जरी केले नाहींत तरी युरोप खंडांतील निरनिराळ्या देशांत मधून मधून ते जातात, तथापि या अवधीत त्यांचा बराचसा वेळ सार्वजनिक व लोकोपयुक्त अशा कार्यांत गेला आहे. ब्रिटिश राष्ट्राचा व्यापार आणखीहि वृद्धींगत होऊन त्या राष्ट्राचें पाऊल नेहमीं प्रगतिपथांत कसें राहील या प्रश्नाचा त्यांनीं पुष्कळच विचार केला आहे आणि सार्वजनिक समारंभांत त्यांनीं केलेल्या अनेक भाषणांत त्यांनीं

यासंबंधीं आपले तात्त्विक विचार स्पष्टपणें प्रदर्शित केले असून व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनी त्या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ कसें धोरण ठेवले पाहिजे हे त्यांनी अधिकारयुक्त रीतीनें सांगितलें आहे.

प्रस्तुतच्या, कांही वर्षांपासून सुरू झालेल्या जागतिक मंदीपासून ब्रिटिश राष्ट्रही सुटलें नसून बेकारीमुळें गरीब व मध्यम स्थितीतील लोकांच्या चरितार्थाची फार पंचाईत होत आहे, ही बेकारी नाहींशी केल्याशिवाय समाजाची आर्थिक व लौकिक स्थिति सुधारणार नाहीं म्हणून ही बेकारी नाहींशी करण्याकरितां ब्रिटनमधील लोकपुढारी जे प्रयत्न करीत होते त्या प्रयत्नांस युवराजांचा पूर्ण पाठिंबा व सहानुभूति मिळे. बेकारीमुळें विपत्तीनें गांजलेल्या गरीब लोकांच्या वस्तींत युवराज स्वतः जाऊन त्यांची चौकशी करीत असल्यामुळें सर्वसाधारण जनतेची या प्रश्नाकडे दृष्टि वळली. खाणींतिल कामगारांच्या मदतीसाठी त्यांच्या प्रोत्साहनाने 'लॉर्ड मेयरचा फंड' निघाला. अशा अनेक लोकोपयोगी कार्यात त्यांनीं स्वतः भाग घेऊन अगर इतरांस प्रोत्साहन देऊन बहुसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस पुष्कळ हातभार लावला आहे.

याचे एक ठळक उदाहरण येथें देण्यासारखे आहे. सामान्यतः विचार केला तर असें दिसून येईल की तरुणांच्या अंगीं कर्तृत्वशक्ति असते, उत्साह असतो आणि धडाडीहि असते, पण त्या कर्तृत्वशक्तीचा विकास होऊन ती अमलांत येण्यासाठीं तरुणास योग्य दिशा दाखविली पाहिजे, त्यांच्या ठिकाणी त्यांस विवक्षित असें कार्य करण्याची शिस्त बाणवली पाहिजे, आणि त्यांस आपली कर्तबगारी दाखविण्याची संधि आणून दिली पाहिजे. तात्पर्य, शिस्त,

सहाय आणि संधि ही जर प्रत्येक तरुणास प्राप्त होईल तर त्या देशातील तरुण पिढीच्या कर्तृत्वशक्तीचे तेज त्वरित प्रकट होईल व त्या राष्ट्राचा दर्जा वाढता राहील. युवराजांच्या लक्षांत ही गोष्ट आली आणि माजी बादशहा पंचमजॉर्ज यांचा जो रौप्य-जुबिली-महोत्सव झाला, त्या प्रसंगाची संधि साधून या कार्यासाठीं राष्ट्रीय द्रव्यनिधि गोळा करण्याचें त्यांनीं ठरविलें. ज्युबिलीचा कार्यक्रम निश्चित करण्याकरिता सन १९३५ च्या मार्च महिन्यांत लंडनांत सेंट जेम्स राजवाड्यांत जी सभा भरली, त्या सभेस ग्रेटब्रिटनमधील बहुतेक प्रमुख शहरांचे लॉर्ड मेयर, लॉर्ड लेफ्टेनंट व इतर बडी बडी मंडळी हजर होती. त्या सभेत युवराजांनीं आपली ही योजना मांडिली आणि ज्युबिलीसाठी जमणाऱ्या फंडाचा विनियोग जर या कार्याकडे केला तर त्या योगानें बादशहा व महाराणी यांस जें समाधान वाटेल तें इतर कोणत्याच योजनेनें वाटणार नाही असें सांगितलें आणि त्यासाठीं 'किंग जॉर्ज ट्रस्ट' या नावाचा फंड काढावा अशी सूचना केली. ही योजना सभेंतील लोकासच नव्हे तर अखिल ब्रिटिश राष्ट्रास एवढी पसंत पडली की ह्या फंडास लोकांनी उत्साहानें मदत केली आणि त्याची रक्कम १० लक्ष पौंड म्हणजे सव्वाकोट रुपयांहून जास्त झाली. या फंडाचा विनियोग आतां नियोजित कार्याकडे करण्यांत येत आहे.

याप्रमाणें आपल्या प्रजेच्या कल्याणाकरितां शक्य ती सक्रिय सहानुभूति, उदार विचार, प्रजेच्या न्याय्य आकांक्षा व हक्क यांचें संरक्षण व्हावें अशी अंतःकरणपूर्वक कळकळ वगैरे अनेक सद्गुणां-मुळें युवराजपदावस्थेंत त्यांनीं अपूर्व लोकप्रीयता जोडून ठेवली आहे

आणि कोणत्याही राजपुरुषानें केला नाही इतका प्रवास त्यांनीं जगाच्या पाठीवर केला असल्यामुळें त्याचा परिचय व त्यांच्या थोर स्वभावाची माहिती जगांतील सर्व राष्ट्रांस झाली आहे. असा हा थोर व भाग्यशाली पुरुष ब्रिटिश साम्राज्यपदावर आरूढ झाला असून त्याची भावी कारकीर्द अत्यत उज्ज्वल व प्रगमनशील होईल व या कारकीर्दींत ब्रिटिश साम्राज्याचा पूर्ण उत्कर्ष होईल असा विश्वास बाळगण्यास भरपूर आधार आहे.

# भाग २

## राज्याधिकार-प्राप्ति

ब्रिटिश राजसिंहासन हें स्वामीविरहित असें कधीं असत नाही. एक राजा गेला तर त्या गादीचा मालक, दुसरा राजा, त्याच क्षणास होतो, हाच अर्थ " राजा मृत्यु पावला. राजा चिरायू होवो ! " ( The King is dead. Long live the King ! ) या शब्दांनीं सूचित केला जातो. म्हणून ईश्वरी संकेतानुरूप पंचमजॉर्ज बादशहांची प्राणज्योत मावळली त्याचवेळी ईश्वरी संकेतानें आठवे एडवर्ड हे ब्रिटिश सम्राट् झाले. हिंदुस्थानांत ही वेळ ता. २१ जानेवारी रोजी पहांटेचे सुमारें पांच वाजण्याची होती.

बादशहा पंचमजॉर्ज यांचे हें शेवटचें दुखणें फक्त ३।४ दिवसांचें होतें. ता. १७ जानुआरी रोजीं ते आजारी झाले आणि अनेक नामांकित डॉक्टरांचे कांही इलाज न चालतां तो आजार वाढतच गेला. ता. २० रोजी सकाळीं डॉक्टरनी त्यांची आशा सोडली, आणि जॉर्ज बादशहांसही आपल्या आजाराचा परिणाम कळून चुकला असावा म्हणूनच की काय, त्यांनीं सकाळींच आपले अधिकार आपल्यातर्फे चालवण्यासाठीं मंडळ ( कौन्सिल ऑफ् स्टेट ) नेमण्याची तजवीज केली.

लंडनपासून कांहीं अंतरावर नार्फोक परगण्यांत सँड्रिंगहॅम नांवाचें गांव बादशहांचें खासगी वतन आहे. तेथील राजवाड्यांत जॉर्ज बादशाह यावेळीं राहत होते. त्यांच्या शय्यागाराच्या समोरच्या

खोलींत कौन्सिल ऑफ् स्टेट नेमण्यासाठी प्रीव्ही कौन्सिलची सभा भरली. या सभेस मि. रॅमसे मॅकडोनाल्ड, लॉर्ड हेलशॅम, सर जॉन सायमन, कॅंटरबरीचे आर्च बिशप, लॉर्ड डॉसन ऑफ् पेम, लॉर्ड विग्रॅम आणि सर मॉरिस हॅंके इतकी मंडळी हजर होती. सभेचें काम बादशहांस निजल्या जागेवरून दिसावें अशा ठिकाणी चालले होतें. कौन्सिल ऑफ् स्टेट नेमण्याचा जाहीरनामा तयार झाला. तो बादशहांच्या सहीसाठी त्यांच्यापुढे लॉर्ड डॉटन यांनी धरला. बादशहांनी त्यावर सही केली. कौन्सिल ऑफ् स्टेट—प्रिन्स ऑफ् वेल्स, महाराज्ञी मेरी, डयूक ऑफ् यॉर्क, डयूक ऑफ् ग्लूस्टर व डयूक ऑफ् केंट म्हणजे महाराज्ञी व बादशहांचे चार पुत्र—एवढ्या मंडळींचें नेमलें. या मंडळास अगर यांतील कमीत कमी तीन सभासदांस बादशहांच्या वतीनें बादशहा चालवीत असत ती बहुतेक कामें करण्याचा व बादशहांसाठीं सही करण्याचा हक्क असतो. प्रीव्ही कौन्सिलची सभा बोलावून त्यांत चालणाऱ्या कामास बादशहांच्यातर्फे मान्यता देता येते, किवा राज्याच्या हितासाठी म्हणून एकादी गोष्ट जरूरीने करावयाची असल्यास तसा हुकूम देतां येतो. मात्र पार्लमेंटची बैठक बरखास्त करणें, एकाद्यास पदवी अगर सरदारकी बहाल करणें अशा कांहीं गोष्टी या कौन्सिलास करतां येत नाहीत.

बादशहांच्या जीविताची आशा डॉक्टरांनी सोडली होती हें वर सांगितलेंच आहे. आतां त्यांच्या शक्तिपातास सुरवात झाली. संध्याकाळीं साडेपांच वाजतां सर फ्रेडरिक विलन्स, सर स्टॅन्ले ह्यूएट व लॉर्ड डॉसन ऑफ् पेम या तीन डॉक्टरांच्या सह्यांनिशीं पुढील पत्रक प्रसिद्ध झालें—

## ‘ बादशहांचा शक्तिपात होत आहे. ’

महाराणी मेरी बादशहांजवळ पांच वाजल्यापासून बसून राहिल्या होत्या. त्यांचा एक हात आपल्या हातांत घेऊन त्या त्यांच्या चर्येकडे पाहत राहिल्या होत्या. रात्रौ नऊ वाजेपर्यंत बादशहांना साधारणपणें शुद्धि होती. नऊ वाजल्यानंतर, श्वासोच्छ्वास करण्यास तसदी पडूं लागली म्हणून ऑक्सिजन देण्यांत आला, परंतु त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. हळूहळू घरघर सुरू झाली. रात्रौ साडे नऊ वाजतां पुढील पत्रक प्रसिद्ध झालें:—

**“ बादशहांची अखेरची वेळ नजीक नजीक येत आहे. ”**

डॉक्टर व नर्सीस बिछान्यासभोंवार येऊन उभ्या राहिल्या. या पलीकडे त्यांच्या हातीं आतां काही इलाज राहिला नव्हता.

जवळच्या खोलीत प्रिन्स ऑफ् वेल्स, त्यांची बहीण प्रिन्सेस रॉयल, व त्याचे बंधू ड्यूक ऑफ् यॉर्क, व ड्यूक ऑफ् केंट आणि डचेस ऑफ् केंट इतकी मंडळी उदासवाणी बसली होती.

जेवण तयार होतें, पण त्या भयाण प्रसंगीं जेवण कसलें ? बादशहाची कन्या एकसारखी रडत बसली होती. भावजयी तिला पोटाशीं घेऊन बसली होती.

बादशहांच्या खोलींत राजघराण्याचे आजपर्यंतचे ऋणानुबंधी कँटरबरीचे आर्चबिशप परमेश्वराची प्रार्थना करीत होते.

एक एक क्षण चालला होता आणि त्याबरोबर बादशहांची प्राणज्योत विझत चालली होती. अकरा वाजतां त्यांची शुद्धी पूर्ण गेली. सर्वांचे डोळे त्यांच्या चेहऱ्याकडे लागून राहिले. श्वासोच्छ्वास कमी कमी ऐकूं येऊं लागला. अकरा वाजून पंचावन मिनिटांनीं श्वास

साफ बंद झाला. शातपणें हा महापुरुष या मर्त्यलोकाचा त्याग करून चालता झाला.

महाराणी मेरी यानीं आपल्या पतीकडे पाहिले आणि खालीं वाकून त्यांच्या कपाळाचे अखेरचे चुंबन घेतलें. युवराजांनीं आपल्या मातोश्रींस दुःखावेगाने घट्ट मिठी मारली आणि त्यांस घेऊन ते तेथून निघून गेले. त्यावेळी तेथें असलेल्या राजघराण्यांतील मंडळींत काय अनर्थ झाला असेल त्याचें वर्णन करणें अशक्य आहे.

*　　*　　*　　*

या दुःखप्रसंगाचे वर्णन या ठिकाणी देण्याचे कारण असें कीं जगांतील अत्यंत मोठ्या साम्राज्याचा स्वामी निधन पावल्यामुळें त्याचे कुटुंबीजन शोकसागरांत बुडून गेले असतां ते दुःख बाजूस ठेवून मृत्यू झाल्यापासून एका घटकेच्या आत त्या सम्राटाच्या वारस पुत्रास साम्राज्याची धुरा घेण्याच्या विधींतून पार पडावे लागलें, व ती गोष्ट त्याने शांत चित्ताने केली, यावरून राजवैभव प्राप्त होणाऱ्या पुरुषावर केवढी जबाबदारी येते आणि त्यासाठीं त्या पुरुषाच्या अंगीं केवढी धीरोदात्तता असावी लागते हें दिसून येईल. ही धीरोदात्तता बादशहा आठवे एडवर्ड यांच्या ठिकाणीं आहे हें या प्रसंगानें सिद्ध केले आहे.

जॉर्जबादशहा मृत्यु पावले आणि पांच मिनिटांनीं बारा वाजल्यावर जानेवारी महिन्याची २१ तारीख सुरू झाली. या सुरवातीच्या पहिल्याच तासास सॅंड्रिंगहॅम राजवाड्यांत ज्या खोलींत जॉर्जबादशहांचा पार्थिव देह होता त्याच्या नजीकच्या खोलींत चार ब्रिटिश मुत्सद्दी येऊन हजर होते व त्यांनीं युवराजांस त्या खोलींत येण्याबद्दल बोला-

बर्ण पाठवले होते. हे चार मुत्सद्दी म्हणजे लॉर्ड हेलशॅम ( लॉर्ड चॅन्सेलर ), मि. रॅम्से मॅकडोनाल्ड ( लॉर्ड प्रेसिडेट ऑफ कौन्सिल ) सर जॉन सायमन ( होमसेक्रेटरी ) आणि आर्चबिशप ऑफ कँटर बरी हे होत. यांपैकी आर्च बिशप हे उभे होते. व बाकीचे तिघे गुडघे टेंकून प्रिन्स ऑफ् वेल्सची वाट पहात होते. प्रिन्स ऑफ् वेल्स आंत आले. येतांक्षणींच आर्च बिशपनीं, 'यूअर मॅजेस्टी' ( खुदा-वंत सरकार ) या शब्दांनीं त्यांना संबोधिले. या क्षणापासून 'प्रिन्स ऑफ् वेल्स' हे 'बादशहा आठवे एडवर्ड' झाले, आणि या क्षणापासून जगांतील सर्वांत मोठ्या अशा अखिल ब्रिटिश साम्राज्याची धुरा वाहण्याची प्रचंड जबाबदारी त्याजवर आली. एका अर्थी असें म्हणतां येईल कीं विवक्षित जीवनक्षेत्रांत पदार्पण करण्याचा जो समय येतांच तसें करण्याची आपली पात्रता असली पाहिजे यासाठी ते सज्ञान झाल्यापासून तयारी करीत होते तो समय या वटकेस प्राप्त झाला होता.

ब्रिटिश राजघराण्याच्या मुख्य धर्माधिकाऱ्याकडून, वर सांगितल्याप्रमाणें नव्या बादशहांच्या सम्राट्पदाची घोषणा झाल्यावर, आठव्या एडवर्ड बादशहांनीं आपल्या बंधूंबरोबर पुढील व्यवस्थेसंबंधानें थोडीशी वाटाघाट केली व लंडनचे लॉर्ड मेयर यांना पुढीलप्रमाणें तार केली:—

"आमचे परमप्रिय वडील, बादशहा पंचम जॉर्ज यांनीं आज रात्रौ ११–५५ वाजतां शांतचित्तानें देह ठेवला हे वृत्त आपणास कळविण्यास मला अत्यंत दुःख होतें—" एडवर्ड.

बादशहा या नात्यानें त्यांची ही पहिलीच सही होय. प्रिन्स ऑफ् वेल्स असतां, ते "एडवर्ड, पी." अशी सही करीत असत.

अशा प्रसंगीं राजधानीतील सर्व जनतेस कळविण्याकरितां सेंट पॉल देवळांतली प्रचंड घटा वाजविण्याची चाल आहे. जॉर्ज बादशहांच्या निधनाची बातमी कळतांच दुसऱ्या दिवशीं सकाळींच दोन तासपर्यंत ही घंटा वाजत होती. ' ग्रेट टॉम ' असें या घंटेचें नांव आहे.

सिंहासनाधिष्ठित राजा कालवश झाला म्हणजे प्रीव्ही कौन्सिलची बैठक ताबडतोब बोलावण्याची पद्धत आहे त्याप्रमाणें मंगळवार ता. २१ रोजी संध्याकाळी चार वाजतां ही बैठक भरविण्यांत आली. या बैठकीस हजर राहण्यासाठीं आठवे एडवर्ड बादशहा आपले बंधू डयूक ऑफ यॉर्क याजसह विमानमार्गें सॅड्रिंगहॅमहून लंडनास गेले. सेंट जेम्स राजवाडयांत ही प्रीव्ही कौन्सिलची बैठक एडवर्ड बादशहांच्या राज्याधिकारप्राप्तीची घोषणा करण्यासाठीं भरविण्यांत आली होती.

लंडनचे विमानगृह हेंडन येथे आहे. तेथें नवीन बादशहांचें दर्शन घेण्यासाठी प्रचंड लोकसमूह जमला होता. बादशहा विमानांतून उतरतांच सर्व लोकांनीं त्याचे अत्यादरपूर्वक स्वागत केलें. बादशहा लगेच आपल्या बंधूसह मोटारीतून लडनकडे निघून गेले. यावेळीं सेंट जेम्स राजवाड्याकडे अफाट जनसंमर्द लोटला होता.

या विशिष्ठ प्रसंगाच्या बैठकीस शक्य तोंवर प्रीव्ही कौन्सीलचे सर्व सभासद—ही संख्या ३०० आहे—हजर असतात.

चार वाजताच सेट जेम्स राजवाड्यांतील आपल्या बैठकीच्या दिवाणखान्यातून बादशहा प्रीव्ही कौन्सीलची सभा भरली होती त्या दरबारी दिवाणखान्यांत प्रविष्ट झाले. बादशहांचे बंधू डयूक ऑफ यॉर्क व डयूक ऑफ ग्लूस्टर या समयीं हजर होते.

या सभेंतील प्रमूख मंडळी लंडनचे लॉर्ड मेयर, आल्डरमेन व राजधानीचे मोठमोठे अंमलदार हे दरबारी पोषाख घालून उपस्थित होते. त्याचप्रमाणें मुख्य प्रधान मि. बाल्डविन, मंत्रि मंडळ व माजी सभासदांसह हजर होते. न्यायाधीशही दरबारी पोषाख घालून आले होते. कॅंटरबरीचे आर्चबिशप यांचा झगा यावेळी जांभळ्या रंगाचा होता. अॅडमिरल बॅटी आपले सर्व बिल्ले व पदकें धारण करून आले होते. प्रीव्हीकौन्सीलच्या एकट्याच स्त्री सभासद मिस् मार्गरेट बॉन्ड-फिल्ड याही हजर होत्या.

आठवे एडवर्ड हे ब्रिटिश साम्राज्याचे राजे व बादशहा झाल्याचा जाहीरनामा सभेंत वाचून दाखविणें व सर्व सभासदांनी राजनिष्ठेच्या शपथा घेणें हे काम या प्रीव्ही कौन्सिलच्या सभेंत व्हावयाचें होतें तें रीतसर झाले. प्रीव्ही कौन्सिलचे क्लार्क सर मॉरिस हँके यांनी जाहीरनामा वाचून दाखविला, व त्यानंतर सर्व सभासदांनीं त्यावर सह्या केल्या. पुढें प्रत्येकाने बादशहाशी राजनिष्ठ राहण्याच्या शपथा घेतल्या. हा संस्कार झाल्यावर पूर्वापार पद्धतीप्रमाणें बादशहांनी चेंबरमध्ये येऊन प्रीव्ही कौन्सिलसमोर भाषण केलें. यावेळीं बादशहांसही प्रीव्ही कौन्सिलसमोर शपथविधी करावा लागतो. या शपथविधीचा ठराविक मसुदा अहे व तो सन १९१० च्या पार्लमेंट-अॅक्टनें ठरलेला आहे. बादशहांनीं यावेळीं पुढीलप्रमाणें जाहीर भाषण केलें:—

" माझे प्रिय व पूज्य वडील, बादशहा पंचम जॉर्ज यांच्या निधनामुळें ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळी राष्ट्रें व वसाहती यांचें अपरिमित नुकसान झालें असून यापुढें साम्राज्याच्या राज्यकारभाराची

जबाबदारी माझ्यावर येऊन पडली आहे. तुम्हीं आणि माझे सर्व प्रजाजन, किंबहुना सर्व जग, यांची या विपत्प्रसंगीं मला पूर्ण सहानुभूति आहे हें मी जाणतो. त्याचप्रमाणें माझ्या मातोश्रींवर जो दुर्धर प्रसंग आला आहे त्याबद्दलहि आपणा सर्वांस पूर्ण सहानुभूति वाटत आहे याचीहि मला जाणीव आहे."

"सव्वीस वर्षांपूर्वीं माझे वडिलांस असल्याच प्रसंगी या ठिकाणीं उभें राहून बोलण्याचा प्रसंग आला होता, त्यावेळी त्यांनीं अशी घोषणा केली होती की सनदशीर राज्यपद्धतीचा आपण पूर्ण अवलंब करूं आणि त्याप्रमाणें ते अखेरपर्यंत चालले. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून माझ्या सर्व वर्गाच्या आणि सर्व जातीच्या प्रजेच्या सुखासाठी आणि कल्याणासाठी कार्य करण्याचा मी निश्चय केला आहे."

"साम्राज्यातील सर्व प्रजाजनांची राजनिष्ठा आणि प्रेम यांजवर आणि साम्राज्य-पार्लमेंटच्या शहाणपणावर माझा पूर्ण विश्वास आहे आणि माझ्या या प्रचंड जबाबदारीच्या कामात ते मला पूर्ण पाठबळ देतील असा भरंवसा आहे. हे कर्तव्य करण्याचे कामीं ईश्वर मला मार्गदर्शक होवो अशी त्याच्या चरणी माझी प्रार्थना आहे."

याप्रमाणें बादशहांचें भाषण झाल्यावर प्रीव्ही कौन्सिलचें त्या दिवसाचें काम संपलें. नंतर सम्राट् नात्यानें त्यांनी बकिंगहॅम राजवाड्यांत प्रथम प्रवेश केला व त्या ठिकाणी लॉर्डस् व कॉमन्स यांनीं राजनिष्ठेच्या शपथा घेण्याचा विधि झाला.

इ. स. १७०७ च्या क्राऊन ॲक्टप्रमाणें ब्रिटिश सिंहासनाधिष्ठित राजा मृत्यु पावतांच पार्लमेंटची बैठक ताबडतोब भरविली पाहिजे. त्याप्रमाणे सर्व व्यवस्था झाली.

नवीन बादशहा गादीवर बसले हें सर्वत्र जाहीर करण्याचा पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीप्रमाणे कार्यक्रम लंडन येथें बुधवार ता. २२ माहे जानेवारी सन १९३६ रोजीं करण्यांत आला.

यासंबंधानें सेंट जेम्स राजवाड्यांत पूर्वापार पद्धतीप्रमाणें यथासाग कार्यक्रम करण्यांत आले व नवीन बादशहांची "बादशहा आठवे एडवर्ड, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे व समुद्रापलीकडील ब्रिटिश वसाहतींचे राजे, धर्म-संरक्षक, कैसर-इ-हिंद" ही पदवी जाहीर करण्यात आली.

ज्या गच्चीवरून हा जाहीरनामा वाचून दाखविण्यांत आला त्या गच्चीवर सर्वत्र किरमिजी रंगाचे गालिचे पसरले होते व पूर्वापार राजदरबारच्या पद्धतीप्रमाणें चित्रविचित्र रंगाची निशाणें सर्व गच्चीवर लावण्यांत आली होतीं. हा जाहीरनामा सर्व जगांत ऐकूं जावा म्हणून मायक्रोफोन व लाऊडस्पीकर यांची योजना करण्यांत आली होती.

समारंभाच्या सुरवातीस प्रथम साम्राज्यपताका घेऊन मास्टर ऑफ आर्म्स (Master of Arms) व त्यांच्या हाताखालील सार्जंट यांची तुकडी गच्चीवर येऊन उभी राहिल्यावर शिंगाची तीनदां ललकारणी झाली. त्यानंतर शस्त्रागारावरील मुख्य अंमलदार गार्टर प्रिन्सिपाल सर जिरॉल्ड वोलॅस्टन व अर्ल मार्शल ड्यूक ऑफ नार्फोक हे आले व गार्टर प्रिन्सिपाल यांनी जाहीरनामा वाचला. जाहीरनामा वाचून होतांच ब्रिटनचे राष्ट्रगीत म्हणण्यांत आले व बादशहांचें वय ४१ आहे म्हणून ४१ तोफा डागण्यांत आल्या.

त्यानंतर पूर्वोक्त शस्त्रागारावरील अंमलदार, निशाणें धरणारे शिपाई व दरबारचे हुजरे आणि दरबारच्या गाड्या यांची मिरवणूक निघाली. ती ठराविक ठिकाणांमधून मिरवत मिरवत चेरिंग क्रॉस येथें

आली व तेथें आणखी एक वेळ जाहीरनामा वाचण्यांत आला. तेथून पुढें मिरवणूक निघाली ती टेंपलबार येथें आली. येथून लंडन शहरची हद्द लागते. या ठिकाणी रस्ता मुद्दाम दोरी लावून बंद करण्यांत आला होता. तेथें येतांच मिरवणुकीच्या अग्रभागीं असलेला बिगुलवाला व लंडन शहराच्या हद्दीवर येऊन उभा राहिलेला बिगुलवाला यांच्यामध्ये मिरवणुकीतील निळे शिरस्त्राण घातलेला लष्करी अंमलदार येऊन उभा राहिला व लंडन शहरांत जाण्यासाठीं रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली. या ठिकाणी लडनचे सिटि मार्शल होते त्यांनी वाट मोकळी करून दिली तेव्हां मिरवणूक शहरच्या हद्दींत गेली. सिटी मार्शलने मिरवणुकीपुढें राहून मिरवणूक लंडन शहरच्या लॉर्ड मेयरच्या ऑफिसकडे नेली. तेथें त्यांचें स्वागत करण्यासाठी लॉर्ड मेयर, ऑल्डरमेन, रेकॉर्डर, शेरीफ वगैरे अंमलदार हजर होते. नंतर ही सर्व मंडळी मिरवणुकींत सामील झाली आणि लंडन शहरच्या मध्यभागी रॉयल एक्सचेंज आहे तेथे गेली. या ठिकाणी तिसऱ्यांदा जाहीरनामा वाचून दाखविण्यांत आला. त्यानंतर लॉर्ड मेयर यांनी आठवे एडवर्ड बादशहा यांच्या नांवाचा त्रिवार जयजयकार केला तेव्हा तेथे जमलेल्या प्रचंड समाजानेंहि त्रिवार जयजयकार करून तो भाग गर्जवून सोडला.

या एका दिवशी ब्रिटनचे राष्ट्रीय निशाण यूनिअन जॅक हें सर्वत्र फडकत होतें. दुसऱ्या दिवसापासून ते माजी बादशहाच्या निधनाच्या दुःखप्रदर्शनार्थ अर्धें खालीं उतरण्यात आलें.

वर जो नवीन बादशहाचा जाहिरनामा वाचून दाखवून त्यांच्या नांवानें द्वाहीं फिरवण्यांत आली तो जाहीरनामा असा आहेः—

# बादशहा आठवे एडवर्ड

## यांच्या राज्याधिकार-प्राप्तीचा जाहीरनामा.

" सर्वसत्ताधारी परमेश्वराच्या संकेतानुरूप, आमचे माजी कीर्तिमान् व भाग्यशाली प्रभू, राजे पंचमजार्ज यांचा परलोकवास झाल्यामुळें त्यांच्या निधनानें, ग्रेटब्रिटन व आयर्लंड या राज्याचे सम्राट्पद ज्याअर्थीं सनदशीर व एकमेव हक्काने प्रतापी व परमथोर प्रिन्स एडवर्ड आल्बर्ट ख्रिश्चन जॉर्ज अँड्र्यू पॅट्रिक डेव्हिड यास प्राप्त झाले आहे त्याअर्थीं आतां, या राज्यांतील आम्ही धर्मकारण व राजकारण क्षेत्रांतील सरदार उमराव व माजी सम्राटांच्या प्रीव्हीकौन्सीलांतील सरदार उमराव व त्याचप्रमाणे अनेक थोर समाजधुरीण, व लंडन शहरचे लॉर्ड-मेयर, आल्डरमेन व नागरिक याच्या पूर्ण मान्यतेने व सहकारितेनें जाहीरपणे अशी घोषणा करतों की मशारनिल्हे प्रतापी व परमथोर प्रिन्स एडवर्ड आल्बर्ट ख्रिश्चन जॉर्ज अँडयूपॅट्रिक डेव्हीड हे आमच्या परमपूज्य माजी बादशहाच्या निधनानंतर, आमचे एकमेव व कायदेशीर प्रभू " आठवे एडवर्ड, परमेश्वराच्या कृपेने ग्रेटब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे व समुद्रापलीकडील ब्रिटिश वसाहतींचे राजे, धर्मसंरक्षक व हिंदुस्थानचे बादशहा झाले आहेत."

" आणि त्यांच्याशी आह्मी एकनिष्ठेने व पूर्ण आज्ञाधारकपणें आणि खऱ्या अंतःकरणाच्या प्रेमानें वागूं. आणि ज्याच्या सत्तेनें राजे-महाराजे व महाराणी राज्य करतात, त्या परमेश्वराची आह्मीं प्रार्थना करतों कीं, राजे आठवे एडवर्ड यांनीं आमच्यावर दीर्घकाळ व सुखाचें राज्य करावें एतदर्थ त्यांस दीर्घायुरारोग्य द्यावें. "

हा राज्याधिकाराचा जाहीरनामा ब्रिटनमध्यें व जगांत साम्राज्य-भर याचवेळीं ठिकठिकाणीं वाचून दाखविण्यांत आला.

याप्रमाणें बादशहा आठवे एडवर्ड यांच्या राज्याधिकार-ग्रहणाचें थोडक्यात वर्णन आहे.

बादशहा आठवे एडवर्ड हे आतां हिंदुस्थानचे बादशाह झाले आहेत आणि आपले बादशहा या नात्यानें त्याचे व हिंदी प्रजेचे आतां परस्पर वैयक्तिक संबंध ते युवराज होते त्या वेळच्या संबधापेक्षां अधिक निकटचे व प्रेमाचे झाले आहेत. अर्थात्, त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाकडे आपले आता अधिक लक्ष लागून राहणार आहे. ज्यांच्या सार्वभौम सत्तेखाली हिंदी प्रजेस पुढचा काळ आक्रमण करावा लागणार आहे अशा या भाग्यशाली पुरुषाचे पूर्वचरित्र आतां-पर्यंत दिले. परंतु त्यांचा स्वभाव व मनोवृत्ति यांचा परिचय व्हावा म्हणून त्यासंबंधीं स्पष्टीकरण करणाऱ्या त्याच्यासंबंधीच्या कांही गोष्टी आणि राज्यकारभारविषयक त्यांचे कार्यक्रम कसे चालणार यांविषयीं कांहीं उपयुक्त व मनोरंजक माहिती पुढील भागात देण्याचें योजिलें आहे.

# भाग ३ रा

## बादशाहाचा कार्यक्रम

प्रिन्स ऑफ् वेल्स या नात्यानें जॉर्ज बादशहांस जो आयुष्यक्रम स्वीकारावा लागला होता, त्यापेक्षां आठव्या एडवर्ड बादशहांचा युवराज पदांतील जीवनक्रम अधिक व्यापाचा गेला हें पूर्वोक्त वर्णनावरून उघड दिसून येईल. वडिलांपेक्षां त्यांच्यावर पडलेली कामगिरी बिकट व मोठी होती. मोठमोठया जबाबदारीचीं कामें त्यांना करावीं लागली आणि या कामांत प्रत्यक्ष राजकीय जबाबदारीचीं कामें पुष्कळशी होतीं. पण आतां ही जबाबदारी मालक या नात्यानें त्यांजवर पडल्यामुळे पूर्वीचा अनुभव त्यांना सम्राट्पदावस्थेंत सहाय्यक व उपकारकच होईल यांत संशय नाही

ब्रिटिश राष्ट्राचे राजेपण आणि इतर राष्ट्राचें राजेपण यांची तुलना करता यावयाची नाहीं. त्या दोन गोष्टींमध्यें बहुधा कसलेच साम्य नाहीं. ' ब्रिटिश राष्ट्राचा राजा राजसत्ता चालवितो पण राज्यकारभार चालवीत नाहीं, असे म्हणण्याची अन्वर्थक रूढि पडली आहे. इंग्लंडचा राजा हें त्या राष्ट्राच्या सरकारचें प्रतीक असून सरकारच्या सत्तेचा उगम त्याच प्रताकामधून होतो. कोणतेंहि सरकारी काम अगर राजकारण त्याच्या सत्तेवांचून चालणार नाहीं, पण राजाला ती सत्ता मंत्रीमंडळाच्या सल्ल्याबरहुकूम चालवावी लागते.

### ' राजाच्या हातून अन्याय होत नाहीं '

(The King can do no wrong) याचा भावार्थ हाच आहे. कारण राजाच्या प्रत्येक कृत्याला प्रधानमंडळ जबाबदार असतें

अर्थात् एकादें अन्याय्य कृत्य झालें तरीहि प्रधानमंडळच जबाबदार होणार ! कारण त्यांनी तसा अन्याय्य सल्ला दिला म्हणूनच राजानें तसें अन्याय्य कृत्य केलें !

राजकीय विषयांत राजाची वैयक्तिक मते कांहीहि असोत, पण तीं मंत्रीमंडळाच्या धोरणाशीं विसंगत असतील तर राजानें ती जाहीर रीतीनें बोलून दाखवितां कामा नयेत. तशीं ती बोलून दाखविली तरी राजा ती बोललाच नाही असें कायद्यानें मानावयाचें. राजकीय कामासंबंधी राजाच्या सहीने जे जाहीरनामे अगर हुकूम बाहेर पडतात त्यातील मजकूर मंत्रिमंडळानें तयार केलेला असतो, व जाहीर रीतीनें तो आयत्यावेळी त्यांच्या हातीं देण्यांत येतो. सन्माननीयांचा सन्मान करणे, किंवा कोणास राजमान्यता देणें किंवा इनाम देणग्या देणें याला राजाचा हुकूम लागतो पण हा हुकूमसुद्धा वर लिहिल्या प्रकारचा असतो. मंत्रीमंडळाच्या अनुमतीशिवाय राजे-साहेबांस स्वतःच्या अधिकारांत दोनच पदव्या देतां येतात. एक ऑर्डर ऑफ मेरिट व दुसरी. के. सी. व्ही. ओ. या शिवाय इतर कोणतीही पदवी द्यावयाची तर तीस प्रधान मंडळीची मान्यता लागते. सारांश एवढ्या महापदावर अधिष्ठित झालेल्या ब्रिटिश सम्राटाला आपले राजपद स्वत्व बाजूस ठेवून तटस्थ वृत्तीनें चालवावें लागतें. आणि दैवीवृत्तीच्या चतुःसीमेंत राहून लौकीक व्यवहार करावे लागतात ! आंग्ल-सम्राट् म्हणजे एका पक्षीं साम्राज्यपदाची सर्व ऐश्वर्य सत्ता तर दुसऱ्यापक्षी इतरेजनाप्रमाणें आयुष्यभर सर्वसाधारण व्यवहार चालविणारा पुरुष होय.

ब्रिटनच्या राजपदाचें आणखी एक वैशिष्ठ्य आहे. इंग्लंडच्या

प्रचलित राज्यघटनेनुसार राजानें तटस्थ राहून मंत्रिमंडळाच्या सल्ल्या-प्रमाणें राज्यकारभार चालवणें जरी जरूर आहे, तरी प्रधानमंडळास त्या सल्लामसलतीची योग्य दिशा दाखवून देण्याचा राजास पूर्ण अधिकार आहे. अर्थात् आपल्या ज्ञानाचा आणि बुद्धिमतेचा पूर्ण उपयोग राज्यकारभारांत करून देण्याची राजास प्रचलित राज्यपद्धतींत संधि आहे.

यासंबंधी मागें घडलेलें एक उदाहरण या ठिकाणी देणें उचित होईल. सन १९३१ साली मजूरपक्षीय प्रधानमंडळाने राजीनामा दिला. राष्ट्रांतील निरनिराळ्या पक्षांतील प्रमुख मुत्सद्यांची मनोवृत्ति क्षुब्ध होऊन गेली होती. अशा परिस्थितीत इंग्लंडच्या राज्यकारभारांत आजपर्यंत कधीं झाली नाहीं अशी दंगल उडून जाईल अशी भीति क्षणोक्षणी वाटत होती.

मुख्य प्रधान मि. रॅम्से मॅकडोनाल्ड हे आपला राजीनामा घेऊन जॉर्ज बादशहांकडे गेले. प्रधानाचा राजीनामा राजाने वस्तुतः ।कारतां नये पण जॉर्ज बादशहानी मि. मॅकडोनाल्ड यांची जूत घालून त्यांस परत पाठविलें. बादशहा म्हणाले, "आतां यावळीं चला आणि रात्रौ स्वस्थ विचार करा. तोपर्यंत आम्हीं सर हर्बर्ट सॅम्युएल आणि मि. बाल्डविन व इतर प्रधानमंडळ यांस बोलावून आणून त्याचा विचार घेतो. तुम्हीं उद्यां आम्हांस भेटा मग कायतें पाहूं."

यावेळीं जे सर्वपक्षीय म्हणजे 'राष्ट्रीय' सरकार निवडण्यांत आलें, तें तसें निवडण्याची बादशहांवर जबाबदारी होती असें मुळींच नाहीं. परंतु त्यांचें वजन व निःपक्षपाती सल्ला यांचें वर्चस्व पडून मुत्सद्यांच्या मनाचा समतोलपणा टिकून राहिला; आणि त्यांनीं

राष्ट्रीय सरकारची प्राणप्रतिष्ठा केली. राजपदाचें खरें मर्म अशा प्रकारच्याच कर्तबगारींत असून, ती कर्तबगारी बुद्धिमतेच्या प्रमाणांत परिणामकारक होते. अशा प्रकारचें विस्तृत ज्ञान संगृहीत करणें, देशांतील पक्षोपक्षांची पूर्ण माहिती मिळवून ठेवणें, सामान्य जनसमाजाच्या व्यवहाराशीं परिचय करून घेणे, राजकारणांतील बारीक सारिक औपचारिकत्वही पाळणें हेंच इंग्लंडच्या गादीवरील अधिपतींचे महत्त्वाचें कर्तव्य होय.

आतापर्यंत इंग्लंडच्या राजपदावरील पुरुषाचे हें सामान्यतः वर्णन केलें. आतां आपले आठवे एडवर्ड बादशहा याच्या भावी जीवन क्रमाचें त्रोटक वर्णन देतोः—

ब्रिटिश साम्राज्याच्या राज्यकारभाराची धुरा वाहण्याचें काम करण्यासाठी आठव्या एडवर्ड बादशहांना वार्षिक ४६०,००० पौंड मिळतील. या मिळकतीचें दरबारी नांव सिव्हिललिस्ट असे आहे. याच मिळकतींतून त्यांना आपल्या खाजगी खात्यांतील सर्व खर्च भागविला पाहिजे. त्यांच्या दिमतीला असलेल्या अगदीं हलक्या नोकरापासून तो तहत् त्याच्या अत्यंत विश्वासातील स्नेही व सल्लागार यांच्यापर्यंत सर्वांचा पगार व खर्च याच मिळकतींतून त्यांनीं केला पाहिजे.

या पगारासाठीं व पेन्शनीपायीं त्यांच्या या प्राप्तीपैकीं एकशेंवीस हजार पौंड खर्ची पडतात. बकिंगहॅम आणि विंडसर या दोन राजवाड्यांच्या दिमतीसाठीं १९०,००० पौंड लागतात. या राजवाड्याकडील कांहीं कांही नोकरचाकरांचा खर्चही या रकमेंत जमेस धरला आहे. बकिंगहॅम पॅलेसकडे चारशें व विंडसरकडे तीनशें नोकर आहेत.

घरगुती खर्चाचीं बिलें फार फुगीर असतात, आणि तीं थोडीं-बहुत कमी करण्यासाठी फडणीसांनी केलेले सर्व प्रयत्न फुकट गेले आहेत. उदाहरणादाखल एकाच बाबीचा उल्लेख करावयाचा, तर तो धोब्याच्या बिलाचा करतां येईल. बकिंगहॅम पॅलेसमध्यें धोब्याचें बिल दरवर्षी आठ हजार पौंड होतें.

## दीडशे नातेवाईक

जमाखर्चांतून शिल्लक उरलेले १५०,००० पौंड बादशहांच्या खात्याला जमा होतात. पण या रकमेतूनच बादशहांना आपल्या दीडशें राजकुलीन नातेवाइकाची सोय करावी लागते, कारण पार्लमेंटनें त्यांची कांहीच व्यवस्था केलेली नाही. सॅंड्रिंगहॅम, बालमारल यांसारख्या बादशहांच्या ज्या खासगी इस्टेटी आहेत, त्यांच्या व्यवस्थेचा खर्चही यांतून त्यांना द्यावा लागतो. शिवाय राजघराण्याशीं परंपरेनें निगडित झालेल्या सर्व दरबारी कार्यक्रमाचा खर्च आणि परराष्ट्रीय राजकुलीन पाहुण्याच्या पाहुणचाराचा खर्चही या रकमेंतून चालवावा लागतो.

यांतील शेवटच्या बाबतींत बादशाही खजिन्यानें नुकताच आपला फायदा करून घेतला आहे. इन्कमटॅक्सची माफी मिळवून त्या मोबदल्यांत राजकुलीनांच्या पाहुणचाराचा खर्च स्वतः करण्याचें पत्करून पंचम जॉर्जनीं बराच फायदा करून घेतला. इन्कमटॅक्स देण्याची प्रथा १८४१ मध्यें व्हिक्टोरिया महाराणीनीं स्वखुषीनें सुरू केली होती. लढाईनंतर इन्कमटॅक्स वाढला आहे आणि त्या मानानें परराष्ट्रीय राजकुलीन पाहुण्यांच्या भेटीचें प्रमाण कमी झालें आहे; त्यामुळें एकंदरीनें बादशाही दौलतीचा फायदा झाला आहे. जर

पूर्वींप्रमाणें बादशाही दौलतीवर इन्कमटॅक्स बसला असता, तर आपल्या मिळकतींपैकीं जवळ जवळ एकचतुर्थांश भाग म्हणजे १००,००० पौंड बादशहाना इन्कमटॅक्स भरावा लागला असता.

बादशहांच्या दिमतीला असलेल्या शेंकडों नोकरचाकरांपैकीं कामाच्या दृष्टीनें प्रमूख आणि सतत बादशहांच्या समीप असणारे म्हणजे कीपर ऑफ् दि आकाइव्हस् आणि प्रायव्हेट सेक्रेटरी लॉर्ड विग्रॅम, दि लॉर्ड चॅन्सेलर, लॉर्ड क्रोमर, दि कंट्रोलर ऑफ हाउसहोल्ड सर ए. लॅबर्ट वार्ड, दि ट्रेझरर टू दि किंग (सध्या दुय्यम फडणीस सर रॉल्फ हारवुड ) हे होत. याच्यानंतर ज्याचा बादशहाशी निकट संबंध येतो, ते लोक म्हणजे लॉर्डस्-इन-वेटिंग होत. हे सहाजण असून ते पंधरवड्याच्या पाळीपाळीनें आपली कामगिरी बजावतात.

## कचेरींतील काम

बादशहांच्या दैनंदिन कार्यक्रमाला रोज सकाळी दहा वाजतां सुरवात होते. या वेळीं बाकिंगहॅम पॅलेसमधील "आपल्या कचेरी"त बादशहा वक्तशीर प्रवेश करतात. या कचेरींत दोन मोठी मेजें ठेविलेलीं आहेत. त्यापैकीं एक बादशहासाठी असून दुसरे त्याच्या खासगी चिटणिसासाठीं आहे.

बादशहा कचेरीत येतात, त्या वेळी त्याच्या टेबलावर कामाचा ढीग त्यांच्या सहीची वाट पाहत पडून राहिल्याचे त्यांच्या नजरेला पडतें. हे सर्व कागदपत्र वाचून पाहून त्यावर त्यांना सह्या कराव्या लागतात. ह्या कागदपत्रांच्या आरंभींच मुख्य प्रधानांनी तयार केलेलें एक अहवालवजा पत्रक असतें. हें पत्रक आदल्या रात्रीं मुख्य प्रधान तयार करितात. या पत्रकांत त्या दिवशीं झालेल्या हाउस ऑफ

कॉमन्समधील कामकाजाचें टिपण आणि सरकारच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाच्या असतील अशा बातम्यांचें टांचण केलेलें असतें.

हें पत्रक काळजीपूर्वक वाचल्यानंतर मग इतर कागदपत्र वाचण्यास सुरवात होते. बादशहांचे खासगी चिटणीस या कामीं त्यांना सहाय्य करतात. या कागदपत्रांपैकीं कांहीं कागद तर रवाना करण्याच्या स्थितीत बादशहांच्या सहीसाठीं आलेले असतात, आणि कांहींत बादशहांच्या संमतीसाठीं सरकारी धोरणाचें दिग्दर्शन केलेलें असतें.

## जिकीर आणि जबाबदारी

राष्ट्राच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या प्रत्येक प्रश्नाची बादशहांना यथासांग माहिती असावी, एवढ्यासाठीं त्यांच्याकडे हा कागदपत्रांचा ढीग अवलोकनार्थ रवाना केला जातो हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. हे कागदपत्र संख्येनें इतके भरतात कीं, ते सबंध वाचून पाहण्यासाठीं बादशहांना एक तासापेक्षांही अधिक वेळ त्यात खर्च करावा लागतो.

जे कागदपत्र केवळ वाचून पाहून त्यावर अभिप्राय लिहावयाचा असतो, अशा कागदाची रास बाजूला केल्यानंतर ज्या कागदपत्रांवर बादशहांना सह्या कराव्या लागतात, त्यांचा ढीग पुढें येतो. असे कागदपत्र दर आठवड्याला सुमारे दोनशें तरी असतात. कित्येक वेळां तर एखादे दिवशीं अशा कामाचा वर्षाव होतो. पार्लमेंटच्या सर्व कायदेकानूंवर, सर्व सरकारी शिक्क्याच्या कागदपत्रावर, नाविक दल, लष्करी व वैमानिक खात्यासंबंधींच्या सर्व कागदपत्रांवर, परराष्ट्रांत करावयाच्या राजकीय नेमणुकांच्या हुकुमांवर, वैयक्तिक पदवी-

दानाच्या पत्रकांवर आणि इतर अनेक महत्त्वाच्या पत्रकांवर बादशहांना स्वाक्षरी करावी लागते.

सरकारी कामकाज अशा रीतीनें संपल्यावर बादशहा खासगी कामाकडे लक्ष देतात. सरकारी कामापेक्षांही बादशहाकडे येणारा खासगी पत्रव्यवहार दांडगा असतो. इतका सारा पत्रव्यवहार स्वतः वाचून पाहाण्याइतका बादशहांना रोजच्या रोज वेळ मिळणें शक्य नाहीं व तितकें त्या सगळ्याच पत्रव्यवहाराचें महत्त्वही दिसत नाहीं. म्हणून हा पत्रव्यवहार बादशहाचे खाजगी चिटणीस आधीं वाचून पाहतात व महत्त्वाच्या मानाने त्याची प्रतवारी आणि वर्गवारी करून ठेवितात. त्यांपैकी महत्त्वाच्या पत्रांतील विषयांचें टांचणही करून ठेवलेले असतें. असें असलें तरी या निवडक टांचणाचे कागदही कांहीं कमी असत नाहींत. एखाद्या मोठ्या कारखानदाराकडे नेहमीं येणाऱ्या पत्रव्यवहाराच्या ढिगाइतकीच बादशहांच्या पत्रव्यवहाराचीही रास पडते असें म्हणावयास हरकत नाहीं.

## कामामागून कामें

तत्त्वतः असे आहे कीं, बादशहांच्या प्रजाजनांपैकीं हलक्यांतल्या हलक्या व्यक्तीला देखील बादशहाकडे दाद मागण्याचा हक्क आहे; पण व्यवहारतः ही गोष्ट अशक्य आहे. कारण दाद मागूं इच्छिणाऱ्या प्रत्येक लहानसहानही व्यक्तीचें म्हणणे जातीनें ऐकून घेण्याचा आग्रह बादशहांनीं धरला, तर त्याना दिवसाचे चोवीसही तास पुरणार नाहीत ! शिवाय कोणी कसली तक्रार खुद्द बादशहांपर्यंत न्यावी, यालाही कांहीं धरबंद रहाणार नाहीं; म्हणून समक्ष भेटीची जरी सर्वच नागरिकांना मोकळीक नसली, तरी बहुतेक प्रजाजनांना व्यक्तीशः

पत्र पाठवून बादशहांकडे तक्रार करतां येते, त्यामुळें बादशहाचा पत्रव्यवहार असा फुगलेला असतो. सारीच पत्रें कांहीं बादशहाच्या निकटवर्ती स्नेह्यांची असतात असें नाहीं.

ह्या पत्रव्यवहाराची विल्हेवाट लावली, कीं इतर कामांकडे लक्ष देण्यास बादशहांना फुरसत मिळते. बादशहांच्या दैनिक कार्यक्रमातील दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांच्या तैनातीकडील खजिनदाराची मुलाखत ही होय. बादशहांचें कामकाज व घरखर्च यासाठीं लागणाऱ्या पैशासंबंधी या मुलाखतीत वाटाघाट होते. बादशहाच्या खासगी जीवनाचा व परिवाराचा एवढा पसारा आहे की, तत्संबंधीं कराव्या लागणाऱ्या आर्थिक तरतुदींची योजना रोजच्या रोज बादशहांना आपल्या खजिनदाराच्या सल्लामसलतीनें करावी लागते.

हा कार्यक्रम संपल्यानंतर लॉर्ड क्रोमर याना बादशहांच्या मुलाखतीसाठीं बोलावण्यात येतें. या मुलाखतीत बादशहाच्या त्या दिवशींच्या कार्यक्रमासंबधी काय काय व्यवस्था करावयाची ते ठरविण्यात येतें.

पण एवढ्यानें संपलें असें नाही. दुपारच्या फराळाच्या ( लंच ) वेळेपूर्वी आणखीही कांही कामे बादशहाना उरकून घ्यावी लागतात. बादशहांच्या भेटीसाठी परदेशांहून कित्येक राजकुलीन पाहुणे आलेले असतात; त्यांच्या भेटीगांठी घेणें हा कार्यक्रम महत्त्वाचा असतो; त्याशिवाय परराष्ट्रीय वकील, इग्लंडचे मंत्री आणि प्रिव्हिकौन्सिलर्स यांना निरनिराळ्या कामासाठी बादशहांची भेट हवी असते. त्या सर्वांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशीं विचारविनिमय करण्याचेंही काम बादशहांना रोज करावें लागतें. याखेरीज, बादशाही नोकरींत

वरिष्ठ अधिकारी, ॲडमिरल्स, फिल्डमार्शल्स यांसारख्या बड्या मंडळीनाही वारंवार कामानिमित्त बादशहांच्या भेटीला जावें लागतें. या सर्व हकीकतीवरून बादशहांना रोज किती कामें करावीं लागतात, त्यांचें स्वरूप किती विविध स्वरूपाचे व परस्पर भिन्न असतें हें ध्यानी येईल. या सर्व विषयांत नीट मन घालून व स्वतःवरील जबाबदारीचा पूर्ण विचार करून त्या सर्व भानगडींचा समाधान-कारक निकाल लावावयाचा म्हणजे सोपी व साधी गोष्ट नव्हे हें कोणीही कबूल करील.

## दिवसभर कामच काम !

या कामाच्या दडपणाखालून सुटका झाल्यावर बादशहा फराळ करतात, फराळ करतांना त्यांना जी कांहीं फुरसत मिळेल तेवढाच त्यांच्या विश्रांतीचा काळ ! फराळ आटोपताच त्यांना परत पुन्हां कामाला लागावे लागते. कारण प्रत्येक वेळीं नवा नवा पत्र-व्यवहार येत असतो आणि शिवाय सरकारी कामकाजाचे कागदपत्रही सर्व दिवसभर बादशहांच्या सह्यांसाठीं येत असतात. त्या सर्व प्रक-रणांचा निकाल बादशहांना रोजच्या रोज लावणे भाग असते.

या कामांतून डोकें वर काढतात न काढतात तो दुपारीं पुन्हा बड्या बड्या लोकांच्या भेटीगांठीचा कार्यक्रम असतो. याखेरीज सकाळी झालेल्या चर्चा व योजना अपुऱ्या राहिल्या असल्यास त्या पुऱ्या करण्यासाठी बादशाही तैनातीकडील जबाबदार मंडळी पुन्हा दुपारीं मुलाखतीस येतात.

याप्रमाणें सध्याकाळी चहाची वेळ होईपर्यंतचा सारा दिवस कामाच्या गर्दींत जातो. एका साम्राज्याचे ते बादशाह खरे, पण त्या

साम्राज्याच्या विस्ताराइतकाच बादशाही कामकाजाचा पसाराही अफाट असल्यानें रोजच्या रोज तासचे तास टेबलाशी बसून या कामकाजाचा निकाल लावावा लागतो. या एकाच गोष्टीवरून राजेपणाचें सुख काय असतें हें वाचकांच्या ध्यानी येईल.

रात्रींच्या भोजनानंतरच बादशहांना खरी विश्रांति मिळते. रात्रीं ९ ते ११ वाजेपर्यंतचा हा वेळ बादशहांना स्वतःच्या मर्जीनुरूप खर्च करतां येतो. पंचम जॉर्ज बादशहा या दोन तासांचा उपयोग, पोष्टाची तिकिटें सांठविण्यांत, किंवा बिनतारी यंत्राशी चाळे करण्यांत, नमुने आणि नकाशे काढून नाविकदलाच्या हालचालीचा लष्करी खेळ खेळण्यांत, अगर आपल्या प्रिय पत्नीसमवेत एखादा चरित्रग्रंथ वाचण्यांत घालवीत असत.

आठव्या एडवर्ड बादशहांना तिकिटें गोळा करण्याचा किंवा बिनतारीचा बिलकुल छंद नाही. त्यांना असल्या बैठ्या खेळांपेक्षां मैदानी व मर्दानी खेळांची आवड आहे आणि तें स्वाभाविकही आहे. कारण बादशहा अजून तरुण असल्यामुळें त्यांच्या आवडी तारुण्यसुलभ असणें स्वाभाविक आहे. पण येथवर बादशहांच्या दैनिक जीवनक्रमाचा जो आराखडा दिला, त्यावरून आपल्या आवडीच्या मैदानी खेळाकडे लक्ष पुरविण्यास बादशहांना कितपत फुरसत सांपडूं शकेल हा प्रश्नच आहे.

## सामान्य नागरिकच सुखी !

सातव्या एडवर्ड बादशहांना राज्यकारभाराचा गाडा सुरळीत चालविण्यासाठी जितका कामाचा रगाडा उपसावा लागे, त्याच्या दुप्पट पसारा पंचम जॉर्ज बादशहांना आवरावा लागत असे, असें म्हणतात. राजकारणाची गुंतागुंत सध्या इतक्या त्वरेने आणि तऱ्हेनें

वाढत चाललेली आहे कीं, राष्ट्रकार्याची धुरा शिरावर वाहणाऱ्या जबाबदार नेत्याची सारी शक्ति आणि सगळा वेळ कार्याची उरक करण्यांतच खर्चीं पडत आहे. या दृष्टीनें पाहिलें, तर आठव्या एडवर्ड बादशहांवर त्यांच्या वडिलापेक्षांही कामाचा बोजा अधिकच पडणार हें उघड आहे.

आणि जॉर्ज बादशहाची सर्व शक्ति खाऊन टाकणाऱ्या या दरबारी कामकाजाचा उरक समाधानकारक रीतीनें करण्यासाठी आठव्या एडवर्ड बादशहांना परिश्रमांची पराकाष्टा करावी लागेल. या साऱ्या वर्णनावरून बादशाही कामकाजाची तर कल्पना येतेच, पण त्याचा अवजडपणा पाहून बादशहांपेक्षां त्यांचे नागरिकच अधिक सुखी असावेत असा तर्क करण्याचा मोह अनावर होतो!

## बादशाही जमाखर्च

नव्या बादशहांच्या जमाखर्चाचा हा तक्ता एकाच दृष्टीक्षेपांत बादशहांच्या प्राप्तीची व खर्चाची कल्पना आणून देईल.

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| प्रिव्ही पर्स पौंड | ११०,००० | कोठारघरें पौंड | ७५,०० |
| घरखर्चासाठी | १९३,००० | बकिंगहॅम पॅलेस | २९,००० |
| घरगुती नोकरांच्या | | विंडसर कॅसल | १६,८०० |
| पगारासाठीं | १२५,००० | सॅंड्रिगहॅम | ११,००० |
| राजवाड्याची निगा | २०,००० | परीट | ८,००० |
| धर्मादायासाठीं | १३,००० | नौकाखातें | २७,०० |
| किरकोळ | ९,००० | मोटरी | ५,००० |
| | | जामानिमा | ५,२०० |
| एकूण | ४७०,००० | एकूण | ८,३४०० |

एवढी रक्कम पार्लमेंटकडून बादशहांच्या खर्चासाठीं मंजूर होते.

एका विद्वान् लेखकानें त्यांच्याविषयीं लिहितांना असे म्हटलें आहे की, प्रिन्स ऑफ् वेल्स असतांना, सार्वभौमपदाची त्यांना महत्त्वाकांक्षाच नव्हती. या जबाबदारीपेक्षा त्यांनीं एकाद्या नागरिकाप्रमाणें शांततेंत आपला जीवनक्रम आक्रमण करणे अधिक पसंत केलें असतें. ही गोष्ट अशक्य मानण्याचें कारण नाही. साधारणतः प्रत्येकास असें वाटते की राजपद प्राप्त होणे म्हणजे सुखाचा व वैभवाचा कळस होय. राजाच्या आधुनिक पद्धतीच्या जीवनक्रमाकडे पाहिलें तर, रात्रंदिवस शेंकडो लोक राजाची भेट घेण्यासाठी दरबारात तिष्ठत आहेत, केव्हांही जा, सभोवार मडळी बसलेली आहेच, फोटोग्राफर्स, वर्तमानपत्रांचे रिपोर्टर्स याचा घोळका मागाहून रेंगाळत आहेच, कोठेंही जा, नोकर चाकर, अंमलदार, प्रजाजन यांचे मुजरे तर घ्यावे लागतच आहेत, असे चाललेलें असतें. केवढें वैभव हे ? केवढी सत्ता ही ?

पण यांत केवढी दगदग आणि केवढा त्रास असतो याचा विचार केला तर, काय दिसून येते ? खरोखर राजपद हे अत्यंत बिकट, दगदगीचें आणि मनास कधीहि स्वस्थता न देणारें जीवन आहे. मनुष्यास अत्यंत प्रिय असणाऱ्या दोन गोष्टी म्हणजे स्वतंत्रता आणि स्वावलंबन, या दोन्ही गोष्टींस राजास अंतरावे लागते.

प्रारंभापासून अखेरपर्यंत राजाचा आयुष्यक्रम म्हणजे एकप्रकारचा अखंड बंदिवास असतो. हॅमलेटनें म्हटल्याप्रमाणें "एखाद्या भिकाऱ्याला तरी आपल्या हातानें घांस उचलून तोंडांत घालण्याचे स्वातंत्र्य असते, पण राजाला तेवढें सुद्धां नाहीं." विवाहासारखी प्रत्येकाच्या

वैयक्तिक मतांची व आवडीनिवडीची गोष्ट, पण राजकारणाच्या धोरणानुरूप त्यांत स्वत.चे विचार बाजूस ठेवावे लागतात. राजा आपला विवाह करील किंवा न करील, त्यात दुसऱ्याचा नफा तोटा काय ? पण राजा विवाह करणार की करणार नाही हा त्यांच्या कोट्यवधि प्रजेच्या चर्चेचा विषय होऊन जातो !

राजाचे शरीर-सरक्षक असतात त्यांच्या नजरेतून त्याला निसटतां यत नाहीं, हुजऱ्यांच्या ' जी सरकार ' चा जप तर सारखा ऐकून घ्यावा लागतो, आणि जन्मांत कधीं पाहिले नाहीत आणि पुनः कधीं पाहण्याचा संभव नाही अशा त्रयस्थ माणसांच्या मुलाखती आणि त्यांच्याशी पाळावे लागणारे शिष्टाचार यांच्या लोंढ्यांत अविश्रांतपणें आपला काल व्यतीत करावा लागत असल्यामुळें राज्यकर्त्या पुरुषाचा जीवनक्रम केवळ औपचारिक स्वरूपाचा आणि जगाच्या साधक-बाधक टीकेचा विषय होऊन राहिलेला असतो.

इतकेही विधि—शिष्टाचार पाळून राजास बाह्यतः तरी अशा इत-मामात रहावें लागतें कीं याच्यासारखा सुखी व भाग्यशाली पुरुष नाहीं असा दुसऱ्याचा ग्रह होऊन त्यांच्या ऐश्वर्याचा कोणीहि हेवाच करीत रहावें. कारण राजाचे महत्त्वाचे कर्तव्य हे आहे कीं त्यानें कधीच कंटाळून जातां नये ! लोकांच्या भेटी घेतां घेतां दगदगून गेलों आहे असे कधीच दाखवता नये. लोकांच्या जयजयकारानीं कान किटले असें चर्येवरून दिसतां नये. सारांश थोडावेळ तरी स्वस्थपणें एकांतवासांत जाऊन मनमोकळेपणे अमूक एक काम करीन किंवा आराम घेईन अशी क्षणाची संधी त्याला मिळत नसते.

जर या गोष्टीचा विचार केला तर वर जें म्हटलें कीं आठवे

एडवर्ड बादशहा प्रिन्स ऑफ् वेल्स असतां, सार्वभौम पदाची महत्त्वाकांक्षा त्यांना नव्हती, त्यांत आश्चर्य वाटावयास नको; आणि त्यांच्याबद्दल एकदोन गोष्टी अशा सांगतात की राजपद प्राप्त होण्यापूर्वी कांहींवेळा लोकांच्या स्वागतसमारंभांनी आणि त्यांतील शिष्टाचारांनीं दगदगून जाऊन एकांतवासांत स्वस्थपणे चार घटका आरामशीर घालवितां येण्यासाठीं ते कोणास दाद मागमूस लागणार नाहीं अशा ठिकाणीं गुपचिपपणे निघून गेले होते !

पण याचा अर्थ मात्र असा नव्हे की आपले प्राप्त कर्तव्य करण्यास ते कंटाळतात किंवा काचावतात. मागील वर्णनावरून त्यानी आपण होऊन कार्याचा केवढा व्याप लावून घेतला आहे हें दिसून येतें. गेल्या २० वर्षांत त्यांनीं नानाप्रकारची सार्वजनिक कामे अविश्रांतपणें व वेळच्यावेळी मोठ्या हौशीने व परिणामकारक रीतीने पार पाडली, आणि त्यांत जगाकडून वाहवा मिळविली. असे असलें तरी आठवे एडवर्ड बादशहा, आपले वडील पंचम जॉर्ज किंवा पितामह सातवे एडवर्ड यांच्याहून अधिक काटक आहेत किंवा आपल्या वडिलांपेक्षां त्यांचे व्यक्तिमत्व असामान्य आहे असें नाही.

त्यांचे पितामह सातवे एडवर्ड यांची मनोवृत्ति अशी होती कीं मानवी जीवनांतील सर्व प्रकारचे सात्त्विक सुखोपभोग अनुभवून घ्यावे. सदा आनंदी वृत्तीचा पुरूष ! त्रासिक दगदगलेली वृत्ति त्यांना ठाऊक नव्हती. विंडसर राजवाड्यांतील त्यांच्या सदा चाललेल्या मेजवान्या, गार्डनपार्ट्या वगैरे समारंभ ज्यांनी पाहिले असतील त्यास शेंकडों नव्हे हजारों मोठमोठ्या गृहस्थाच्या परिवारांत या एकट्या पुरुषाचें व्यक्तिमत्व कसे दिपवून सोडीत असे याची अजून ढळढळीत आठवण आहे !

सूर्यमालेंतील ग्रह सूर्यापासून प्राप्त होणाऱ्या तेजानें जसे प्रकाशमान होतात त्याप्रमाणें सातव्या एडवर्ड बादशहांच्या सान्निध्यांत, त्यांच्या व्यक्तिवैशिष्ठ्याच्या तेजानें, सभोंवारच्या मंडळींची शोभा खुलून दिसत असे, आणि मनाचे दिलदार व हाताचे सढळ असल्यामुळे त्यांच्या सहवासाचा लाभ होणारी मंडळी सदा सुखी व आनंदी वृत्तीची होऊन जात असे!

अशा प्रकारची सरदारीवृत्ति पंचमजॉर्जे बादशहाची नव्हती तरी कामाची वाकबगारी आणि स्वकर्तव्यपूर्तीची अदमनीय तत्परता त्यांच्या अंगीं पूर्ण वास करीत असल्यामुळे, अभूतपूर्व अशा जागतिक अस्वास्थ्याच्या काळांतील आपल्या कारकिर्दीच्या पाव शतकांतील प्राप्त-कर्तव्य त्यानीं धीरोदात्ततेनें व अचूकपणें पार पाडलें.

आठव्या एडवर्ड बादशहांची कार्यशीलता आणि त्यांच्या आगचा कणखरपणा त्यांच्या उपरोक्त दोन पूर्वजाच्याहून एका निराळ्या स्वरूपाचा आहे. आजोबासारखी ऐषआरामशीर राहणी ठेवण्याची प्रवृत्ति त्याची नाहीं, किंवा वडिलांप्रमाणें आलेल्या कामाच्या पाठीस तडफाफडकी लागावयाचें हा धोपटमार्गीपणाही त्यांजकडे नाही. त्यांचा स्वभाव भावनाप्रधान आहे. लोकसंग्रह करून विधायक कार्य करावें व कोणत्याही अगीकृत कार्याचा उत्साहपूर्वक व अविश्रांतपणें पिच्छा पुरवावा अशी त्यांच्या स्वभावाची ठेवण आहे.

कोणत्याही मेजवान्यांच्या किंवा इतर समारंभाच्या प्रसंगीं त्यांचे भाषण चाललें असतां त्यांच्याकडे लक्ष देऊन पहावें! भाषणांतील विचारांच्या भावनांप्रमाणें क्षणोक्षणीं पालटणारी मुद्रा, क्षणांत गळ्यातील टायकेड तर लगेच शर्टच्या कफकडे असा चाललेला हातांचा

खेळ हें सुरू असायचेंच ! तुम्हीं म्हणाल की त्या समारंभांत त्यांचें मन नसून केवळ शिष्टाचारासाठी ते तेथे आले असावेत, पण कदाचित् ती गोष्ट खरी असली तरी, आणि तो जबरदस्तीचा राम राम असला तरी त्या कार्यक्रमात ते त्यावेळी समरस होऊन जावयाचेच एवढी त्यांची इच्छाशक्ती दाडगी आहे. त्यांच्या आवाजांत त्यांच्या चित्तवृत्तीची भावना प्रतीत होते, आणि ते जें काय बोलत आहेत तें अंतःकरणापासून आहे अशी श्रोत्याची खात्री पटते. राजे लोकाच्या अगर बड्या लोकाच्या भाषणांत मधून मधून आपला अधिकार, आपला मोठेपणा, श्रोते मंडळीस जाणवण्यासारखे शब्द ठराविक आविर्भावाने बोलावे अशी एक ट्रूम पडून गेली आहे. जॉर्ज बादशहाच्या भाषणांत ती दिसून येत नसे, आणि वडिलांप्रमाणें एडवर्ड बादशहांच्या भाषणांतही ती दिसून येत नाही.

आणखी एक गोष्ट : त्यांच्या आवाजांत त्यांच्या वडिलांप्रमाणेंच एक विशेष गुण आहे. आणि तोच गुण या काळांत त्यांच्या दर्जास विशेष महत्त्वाचा आहे, वायरलेसचे संदेश स्पष्ट व परिणामकारक होण्यास ज्या प्रकारचा भरदम व भारदस्त आवाज पाहिजे तशा प्रकारचा आवाज जॉर्ज बादशहांप्रमाणे त्यांचे चिरंजीव आठवे एडवर्ड यांचाहि आहे, पंचम जॉर्ज बादशहांची शेवटीं शेवटीं जी लोकप्रीयता वाढत गेली त्याचे कारण आपल्या अखिल साम्राज्यांतील प्रजाजनांशीं या ब्रॉडकास्ट भाषणांनी त्यांना प्रत्यक्ष संबंध ठेवतां आला. या दृष्टीनें पाहातां एडवर्ड बादशहांस ही जी आवाजाची देणगी आहे ती फार महत्त्वाची असून त्यांच्या लोकप्रियतेंत भर घालण्यास ती पुष्कळ अंशी उपकारक होईल असें मानावयास हरकत नाही.

त्यांच्या भाषण शैलीविषयीं लिहितांना आणखी एका गोष्टीचा निर्देश करणें जरूर आहे. आपली भाषणें तयार करतांना त्यांना दुसऱ्याची मदत घ्यावी लागत असावी असा कित्येकांचा तर्क आहे. ही गोष्ट अशक्य आहे असे म्हणवत नाही. कारण जगात जेवढे कांही राजे लोकांनी जाहीर रीतीने बोलण्याचे विषय आहेत तेवढ्यांवर त्याना बोलण्याचा प्रसंग येतोच, आणि त्या सर्व विषयावर अधिकारयुक्त माहितीनें बोलतां येण्याइतका त्या प्रत्येक विषयाचा परिचय त्यांना असणें संभवनीय नाहीं. त्यामुळें त्या कामीं त्यांनीं तज्ज्ञाकडून माहिती घेतली असल्यास नवल नाही. पण म्हणून, विद्यार्थी घोकंपट्टी केलेला पाठ म्हणतात तसा ते दुसऱ्यांनी तयार केलेलें भाषण वाचून दाखवतात असे मुळीच मानावयास नको. कोणताही विषय पूर्ण समजून घेऊन तो आपल्या धाटणीप्रमाणें व आपल्या विचाराप्रमाणें तयार केल्याशिवाय तो ते पुढे येऊंच देणार नाहींत. 'इतरे' जनास जें भाषण-स्वातंत्र्य किंवा अघळपघळ भाषण करण्याची मुभा असते ती त्याच्या मोठ्या जबाबदारीच्या दर्जामुळें त्यांस नाही, तथापि भोजन समारंभांत अगर अन्यत्रहि भाषण करताना त्या समयास शोभणारी खुमारी त्या भाषणांत प्रतीत व्हावी अशा तऱ्हेचा फेरफार आपल्या तयार केलेल्या भाषणात ते आयत्या वेळींसुद्धां करतात.

त्यांना सर्वात मोठी ईश्वरदत्त देणगी म्हणजे मोहकपणा ज्याला म्हणतात तो गूण होय. हा गूण त्यांच्या अंगांत ओढून ताणून आणलेला म्हणजे कृत्रिम नव्हे. निसर्गतः प्रेमळ आणि कनवाळू चित्तवृत्ति असली म्हणजे माणसाच्या ठिकाणीं त्या सात्त्विक गुणाचें

तें तेज प्रकट होत असते. त्या तेजानें हा मोहकपणा म्हणजे दुसऱ्यांस आपल्याकडे आकर्षण करून घेण्याची शक्ति उत्पन्न होत असते. साधा मनमोकळा माणूस पाहिला कीं, पंचम जॉर्ज बादशहांस जसा तो प्रिय वाटे, तसाच यानाही वाटतो. तेथे मग आपण एक सार्वभौम राजा आहे आणि हा सामान्य नागरिक आहे, ही प्रतिष्ठा त्यांस आठवत नाहीं. बडेपणाचे शिष्टाचार तेथें मग गौण होतात.

आपला सर्वश्रेष्ठ दर्जा किंवा व्यक्तिमत्त्व यांच्याविषयीं त्यांना यत्किंचित् अहंपणा वाटत नाहीं. इतर सरकारी अंमलदार असतात, त्याप्रमाणें आपणही एक त्या सर्वांहून मोठा अंमलदार आहो, एवढेंच त्यांना वाटत असते. राजा म्हणजे ईश्वरी विभूति आहे किंवा माजी केसर बादशहास वाटत असे त्याप्रमाणें ती एक 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' अशा प्रचंड शक्तीचें प्रतीक आहे ही गोष्ट त्यांच्या स्वप्नांतही नाही. गेल्या पाव शतकांत जागतिक समाजस्वास्थ्याचा पाया डळमळीत करून सोडणारे जे अनन्वित प्रकार घडले त्यांचा अनुभव डोळ्यासमोर असल्यामुळें, राजेपणा हा किती चंचल आहे ही गोष्ट त्यांच्या मनावर दृढ होऊन बसली आहे. एकदां ते विनोदानें म्हणाले, "मी हल्लीं नवी फॅशन झालों आहें ! लवकरच ही नवी फॅशन जुनी होणार !" याचा अर्थ असा कीं लोकांत एकादी नवी फॅशन आली की थोडे दिवस प्रत्येक जण नवी म्हणून ती उचलतो आणि काही दिवस ती अंगवळणीं पडल्यावर तिचा कंटाळा येऊन ती मागे पडते व दुसरी एकादी नवी आल्यास लोक तिच्या मागें लागतात. त्याचप्रमाणें जगांतील सर्वांत मोठ्या साम्राज्याच्या बादशाहाचे युवराज जेव्हां सार्वजनिक कार्यांत भाग घेऊं लागले तेव्हां

लोक त्यांच्याकडे कौतुकानें पाहूं लागले. हा क्रम जन्मभर चालूच राहणार असल्यामुळें त्यांतील नाविन्य लोकांस हळूहळू वाटत नाहींसें होणार, ही जगाची रीतच आहे. हाच भावार्थ बादशाहांच्या वरील विनोदी उद्गारांत आहे.

आपल्या राजपदाची चंचलता याप्रमाणें अंत:करणात जागृत राहण्याची ही थोर मनोवृत्ती प्रजाजनांच्या स्वातंत्र्यहक्कांचा पूर्ण पुरस्कार करणारे त्यांचे पूर्वज, राजे तिसरे उइल्यम याची होती. एका मोठ्या समारंभप्रसंगी ते हजर असतां लोकांनीं आनंदानें त्यांच्या नांवाचा प्रचंड जयघोष केला. पण त्यामुळें हुरळून न जातां ते म्हणाले, ' या लोकांचें कांहींच खरें नव्हे. घटकेंत घोड्यावर तर घटकेंत गाढवावर ! आज जयजयकाराचा घोष, उद्यां डोंचकें उडवण्याचा शोष ! ' राजपदाच्या अस्थिरतेविषयी ब्रिटिश राजघराण्यांतील पुरुषांच्या अंत:करणांत सदैव जागृत राहणाऱ्या या तीव्र भावनेमुळें हें ब्रिटिश राजसिंहासन युरोपांतील क्रातीच्या भीषण वावटळींतून सहीसलामत टिकून राहिले आहे ! या ब्रिटिश मसनदीवर जर कैसरशाही स्थापन झाली असती तर कैसरशाहीचा झाला तो परिणाम या तख्तालाही भोगावा लागून ब्रिटिश साम्राज्य हा शब्द आज इतिहासजमा झाला असता ! ब्रिटिश बादशाही घराण्यांतील ही वृत्ति आपल्या प्रस्तुतच्या बादशहांतही पूर्णपणें वसत आहे.

महायुद्धाचा काल हा आठव्या एडवर्ड बादशहाच्या भर तारुण्याच्या सुरवातीचा म्हणजे त्यांच्या आयुष्यास कोणतें तरी बरें वाईट निश्चित वळण लागण्याचा काल होय.· १९।२० वर्षांच्या पोरवयांत महायुद्धाच्या राष्ट्रीय कार्यांत त्यांनीं उडी घेतली. वास्तविक असल्या

कामाचें त्याचें तें वय नव्हतें. त्या चार पांच वर्षाच्या अवघड दिव्यांतून, लष्करी पेशास सहजसुलभ अशी स्वतंत्र आणि मनमोकळी वृत्ति अंगांत बाणून ते बाहेर पडले.

विद्यार्थी दशेंतील त्यांच्या विद्यालयीन प्रगतीवरून त्यांची बुद्धिमता असामान्य आहे असे म्हणणे कदाचित् अतिशयोक्तीचें झालें तरी ती बुद्धिमता चागल्यापैकी आहे ही गोष्ट निःसंशय आहे. त्यांचें शिक्षण प्रथम ईटन व नंतर ऑक्सफर्ड येथें झाले. त्यावेळीं उच्चवाङ्मयसंपादनाविषयी जरी त्यांची उत्कठा दिसून आली नाही, तरी इतिहास व निरनिराळ्या प्रचलित भाषा यांचे ज्ञान प्राप्त करून घेण्याची त्याना फार आवड होती. घरी त्याना 'डेव्हिड' असे लाडिकपणानें म्हणत असत, आणि घरीं फार कडक शिस्तीत त्यांना रहावे लागे. पण कडक शिस्त म्हणजे धास्ती घेण्यासारखी जरब असे मात्र नव्हे ! वडिलाचा तरूणपणचा काळ दर्यावर्दीपणांत गेल्यामुळें तेथील कडक शिस्त त्यांच्या अगी भिनून गेली होती, त्यामुळे आपल्या मुलानींसुद्धां शिस्तीनेंच वागले पाहिजे अशी त्यांची कदर असे आणि हें शिस्तीचें वळण एडवर्ड बादशहांच्या अंगात आतां कायमचे होऊन बसले आहे.

ऑक्सफर्ड येथें कालेजांत ते गेले, पण त्यामुळें तेथील विद्वान् प्रोफेसरांस ती एक भिडेअडचणीचीच बाब होऊन बसली. या प्रोफेसरांची यासंबंधीं मनोवृत्ति दाखविणारे मॅक्सचे एक मार्मिक व्यंगचित्र आहे; त्यांत, ब्रिटिश सम्राटाचा युवराज आपल्या कॉलेजांत आहे हे जणूं काय आपणास माहितच नाहीं, हें प्रदर्शित करण्यासाठीं हा प्रोफेसरचा कंपू एकतानतेनें आकाशाकडे डोळे लावून बसला आहे

असें दाखविलें आहे ! त्यावेळची त्यांच्यासंबंधानें एक मजेची गोष्ट अशी सांगतात की अभ्यासाचे वेळी वर्ग सोडून बाहेर गच्चीवर फिरणाऱ्या कॉलेजविद्यार्थ्यांत हे राजविद्यार्थी येऊन मिळाले की त्यांना पाहण्यासाठी खाली रस्त्यावर जमणाऱ्या मडळीवर हे विद्यार्थी वरून पाण्याच्या बालद्या ओतीत असत !

पण महायुद्धांत मात्र त्याची खरी मनोधारणा, त्याचा निश्चयी स्वभाव दिसून आला. ते महायुद्धावर गेले त्यास कारणसुद्धा त्यांचा निश्चयी स्वभावच होय. सर्व वडील माणसे त्यांनी युद्धावर जाण्याच्या विरुद्ध होतींच पण खुद्द ब्रिटिश सेनानी लॉर्ड किचनेर हेही विरुद्ध होते. लॉर्ड किचनेर त्याची युद्धावर न जाण्याबद्दल समजूत घालीत होते आणि युवराज त्यांचे प्रत्येक कारण खोडून काढीत होते. लॉर्ड किचनेरनी त्याना एक मोठे कारण सागितले. ते म्हणाले, " युवराज, असं पहा ! आज तुम्हीं युवराज, ब्रिटिश सिहासनाचे भावी वारस. समजा अवचित तुम्हांस एकादी गोळी लागली आणि बरावाईट प्रसंग आला तर ?" यावर युवराज लगेच म्हणाले, " मग त्यांत काय झाले ? गोळी लागली तर लागली. मागे तीन भाऊ आहेत ! "

हे वीरवृत्तिदर्शक शब्द ऐकून लॉर्ड किचनेर म्हणाले, " पण महाराज समजा की, शत्रूपक्षाच्या कैदेत तुम्ही सांपडलां तर आमच्या दोस्त राष्ट्रांवर त्यामुळे केवढा पेच येईल ?"

यावर त्यांनी काय उत्तर दिले तें माहित नाही पण अखेरीस त्यांनीं आपलें म्हणणें खरें केले आणि कॅप्टन होऊन अघाडीवर गेले. महायुद्ध संपल्यावर ते एकदां अभिमानपूर्वक म्हणाले, " त्या चार वर्षांत

माझा मद वीरांशीं सहवास झाला आणि त्यामुळें माझ्या अंगांत स्वकर्तव्य करण्याची हिंमत आहे हें मला कळून आलें."

या उद्गारांत त्यांची खरी मनोधारणा दिसून येते : ती ही कीं, " सामर्थ्य आहे चळवळीचे ॥ जो जो करील त्याचें ॥ " हें तत्त्व त्यांच्या विचारांत पुरें बाणलें आहे. कामास लागले पाहिजे, चळवळ करीत राहिलें पाहिजे, प्रसंगी साहसहि केले पाहिजे अशाप्रकारचे त्यांचे विचार आहेत. कोणतेंही काम करावयाचें झालें की आधीं त्याचा विचार करा, दुसऱ्याशी भवति न भवति करून त्यांचे मत घ्या आणि नंतर काय तो बेत ठरवा असला धिमेपणा त्यांजकडे नाहीं. काम करावयाचे तर करावयाचें हें स्वतःच्या बुद्धीनें ठरवायचें आणि मग ते शेवटास जाईपर्यंत उत्साहाने, धीराने, नेटाने करीत रहावयाचें असा त्याचा तरतरीत स्वभाव आहे.

त्यांची देहयष्टि भव्य आहे असें नाही. वजन १२६ पौंड अगर कांहीं जास्ती असेल. पण व्यायामाने त्यांनी आपली प्रकृति काटक आणि निरोगी बनविली आहे. शरीराचा स्थूलपणा त्यांना मुळींच आवडत नाहीं.

त्यांचें धैर्य फार मोठे आहे. किंबहुना त्या वृत्तीला साहसवृत्ति म्हणतां येईल. घोड्यावर बसण्यांत पटाईत व्हावे या गोष्टीचा त्यांना एवढा नाद लागला होता की त्यांच्यासारख्या प्रकृतीच्या इसमास आटपणार नाहीत अशा मोठ्या अवखळ घोड्यांवर ते बसले आहेत. अशा कित्येक वेळीं अपघात होऊन त्यांना जखमाहि झाल्या. अखेरीस हा त्यांचा फाजील नाद लोकांच्या चिंतेचा विषय होऊन सरकारनें तिकडे लक्ष द्यावे एथपर्यंत मजल आली तेव्हां त्या नादास आळा पडला.

पण अशा प्रकारच्या धाडसीवृत्तीस कायमचें दडपण कसें पडणार? अश्वारोहणाचा नाद दाबून ठेवावा लागतांच वैमानिक विद्येकडे त्यांचें लक्ष गेलें. पहिले बरें पण हें नको !

सेंड्रिगहॅम राजवाड्यांत पंचमजॉर्ज बादशहांचें देहावसान झालें त्याच्या दुसऱ्याच दिवशीं नवीन बादशहा या नात्यानें ते सॅंड्रिग हॅमहून लंडनला विमानांतून गेले. बरोबर त्यांची धाकटी पुतणी होती. केवढेही तांतडीचे काम असले तरी अशावेळी विमानांतून आणि तेंही आपल्या पुतणीस बरोबर घेऊन हे नवीन बादशहा लंडनला गेले हे त्याच्या धाडसी स्वभावाचेच एक मोठे प्रत्यंतर होय. तरीपण गोल्फसारख्या अपघात होण्याचा संभव असलेल्या खेळाचा नाद कमी होण्यासाठीं त्यांचा आत्मसंयमनाचा प्रयत्न चालू आहे म्हणतात.

एका महत्त्वाच्या गोष्टींत मात्र त्यांचे आपल्या सिंहासनाधिष्टित कोणत्याही पूर्वजांहून वैशिष्ठ्य आहे. त्यांच्या इतका जगाचा प्रवास आजपर्यंत कोणत्याही राजाचा झालेला नाहीं. या प्रवासांत उपलब्ध झालेल्या जगाच्या माहितीचा फायदा त्यांच्या भावी जीवनांत फार उपयुक्त होईल.

प्रवासांत गेलेला काळ पाहिला तर पंचम जार्ज बादशहांचा प्रवास एडवर्ड बादशहांच्याहून दीर्घकाळचा झाला. पण जॉर्ज बादशहांचा प्रवास हा दर्यावर्दीपणाचा होता आणि तो फक्त ब्रिटिश साम्राज्यांतच झाला.

परंतु बादशहा आठवे एडवर्ड यांनीं जगाच्या बहुतेक देशांत

प्रवास केला आहे आणि प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या गोड स्वभावाची स्मृति लोकांच्या अंतःकरणांत कायम करून ठेवली आहे.

ब्रिटिश राजघराण्याविषयीं आज अमेरिकेत जी आदरबुद्धि वसत आहे, तिचें श्रेय, युवराज या नात्यानें त्यांची अमेरिकेत दिसून आलेली अष्टपैलू अभिरुची व पंचमजॉर्ज बादशहांची धीर गंभीर वृत्ति यांस आहे.

दक्षिण अमेरिकेतील त्यांचा प्रवास तर, त्याच्या परिवारांतील मंडळीच्या कुचराईमुळें झालेले एक दोन प्रकार सोडून दिल्यास, एकाद्या अद्भुतरम्य कादंबरीतील राजपुत्राच्या प्रवासाप्रमाणे तेथील लोकांच्या कुतूहलाचा विषय होऊन बसला आहे.

सारांश, या सर्व गोष्टींमुळें आज जे सर्वश्रेष्ठ राजपद त्यास प्राप्त झाले आहे त्या पदास व 'जगातील सर्वश्रेष्ठ नागरिक' या पदवीस लागणारी पात्रता त्यानी प्राप्त करून घेतली आहे, आणि आता जी मोठी जबाबदारी त्याजवर आली आहे, त्या जबाबदारीस लागणारे गुण व अनुभव त्यांजकडे आहे.

आणखी एक गोष्ट आज सर्वांच्या मनात एकसारखी घोळत आहे आणि तिच्यासंबधाने निश्चितपणे कोणास काही सागता येत नाहीं. असे आहे! पंचम जॉर्ज बादशहाचे निधन झाले त्याच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे मगळवारी ता. २१ जानेवारी १९३६ रोजीं हाउस ऑफ् लॉर्डसमध्ये पार्लमेंटची बैठक झाली त्यावेळी तख्तावर एकच खुर्ची असलेली पाहून सभेंतील पुष्कळ लोकांच्या मनात एक विचार येऊन गेला. तो विचार असा की या खुर्चीवर बसणाऱ्या व्यक्तीवरील जबाबदारी आतां फक्त त्या एकट्या व्यक्तीवरच

पडणार आहे. त्यांत हक्काची भागीदार व्हायला दुसरी व्यक्ति पाहिजे ती नाही !

इंग्लंडच्या राजसिंहासनावर अविवाहित राजा येणे ही गोष्ट फार क्वचित् घडून येणारी असल्यामुळें आठव्या एडवर्ड बादशहांच्या अविवाहितपणामुळे इंग्लिश जनतेस ओके ओकेच वाटणार आहे.

आज सिंहासनास भागीदार होणारी महाराणी आणि सुखदुःखाची भागीदार होणारी अर्धांगी आठव्या एडवर्ड बादशहांस नाही, तथापि वडिलांनी घालून दिलेल्या उज्वल उदाहरणाने त्यांचा भावी मार्ग प्रकाशित झालेला आहे, मातोश्रींचा अनुभव व सल्ला यांचें पाठबळ त्यास आहे आणि स्वतःच्या उदार व उदात्त विचारप्रवृत्तीस अनुसरून त्यांचे भावी जीवन आक्रमिले जाणार आहे, या सर्व गोष्टींचा विचार केला तर ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांत सुरू झालेला हा नवीन भाग पूर्वीच्या भागाहून कमी दर्जाचा होईल असे मनातसुद्धा येण्याचें कारण नाही.

बादशहा आठवे एडवर्ड यांच्या कारकीर्दीस नुकतीच सुरवात झाली आहे; म्हणून या सुरवातीच्या प्रसंगी आज जगांतील राजकीय परिस्थिति कशी आहे याचे संक्षिप्त समालोचन करून हा भाग पुरा करूं.

पंचम जॉर्ज बादशहा गादीवर आले त्यावेळीं जगाचें राजकीय वातावरण अस्वस्थतेच्या ढगांनी व्याप्त झालें होतें. आजही तीच स्थिति आहे.

परंतु खुद्द घरच्या स्थितींत पाहिलें तर त्यावेळच्या आणि आजच्या स्थितींत फरक आहे. पंचम जॉर्ज बादशहांस राजपद प्राप्त झालें, त्यावेळेस ब्रिटनच्या अंतर्गत कारभाराचें वातावरण क्षुब्ध झालेलें

होतें. पार्लमेंटच्या नवीन घटनेचें बिल, आयर्लंडमधील असतोष वगैरे गोष्टींनीं ब्रिटनमध्यें त्यावेळीं खळबळ माजून राहिली होती. पण जॉर्ज बादशहांच्याच कर्तबगारीनें हे मतभेद मिटून तेव्हांपासून राजा आणि प्रजा यांजमधील समजुतीचे व सलोख्याचे मार्ग उघडे झालेले आहेत. उलटपक्षी आठव्या एडवर्ड बादशहांच्या कारकीर्दीची सुरवात अंतर्गत कारभारांतील परिस्थिति आजपर्यंत कधींच नव्हती इतकी अनुकूल असतां होत आहे.

ईश्वराने जें पद त्यांस दिले आहे त्यास ते अगदी लायक आहेत. दिलदार स्वभाव, उदार अंतःकरण, मनमोकळेपणाची वृत्ति, प्रजे-विषयीं, त्यांतही तरूणपिढीविषयी प्रेम व कळकळ, अन्यायाची चीड आणि या सर्व गुणांबरोबर आपल्या वडिलांप्रमाणे स्वकर्तव्यपूर्तीची तीव्र जाणीव आणि लोकांच्या न्याय्य हक्क-संरक्षणासाठी पार्लमेंटशीं पूर्ण सहकार्य वगैरे अनेक कारणांमुळे साम्राज्याचीं सूत्रे चालवण्याची पात्रता त्याच्या ठिकाणीं पूर्ण वसत आहे.

आणि अखिल ब्रिटीश साम्राज्यांतील प्रजाजनांची त्यांजविषयीं पूर्ण सद्भावना आहे, व साम्राज्यांतर्गत राजकारणांत कितीहि मतभेद आणि पक्षोपपक्ष असले तरी त्यांच्याविषयीं वैयक्तिक भेदभावना कोणाचीच नाहीं, उलट आदरबुद्धि आहे हें त्यांच्या वडिलांच्या निधना-नंतर जगाकडून जे त्यांना सहानुभूतिदर्शक लक्षावधि संदेश आले, त्यावरून पूर्णपणें दिसून आलें आहे.

अशा या भाग्यशाली सम्राटाचें परमेश्वर सदैव कल्याण करो !

# भाग ४ था

## बादशहांच्या कांहीं गोष्टी

एकादी मोठी कादंबरी एखाद्या नियतकालिकांत, दर अकास एक प्रकरण याप्रमाणें क्रमशः प्रसिद्ध होत असतां, पूर्वी प्रसिद्ध झालेल्या प्रकरणांचा सारांश नवीन प्रकरणाच्या प्रारंभी देण्यांत येत असतो. याच्या योगानें पूर्वीचीं प्रकरणे न वाचलेल्या वाचकांस मागील भागांत येऊन गेलेलें त्या कादंबरीचें कथानक समजून पुढील मजकुराची मागील मजकुराशीं असलेली संगति समजण्यास सोपें जातें. बादशहा आठवे एडवर्ड याचे प्रस्तुत परिचयात्मक चरित्र लिहिण्यांत आमचा उद्देशही एकप्रकारें तशाच प्रकारचा आहे. एका बड्या सम्राटाचें जीवनचरित्र हें कादंबरीसारखेंच रहस्यमय असते. त्यांत, लोकमतानुवर्ति राज्यघटनेचा पूर्ण सहानुभूतीने पुरस्कार करणाऱ्या ब्रिटिश सम्राटाच्या चरित्रांत हें रहस्य अधिक प्रमाणांत प्रतीत होते; आणि अखिलजागतिक सर्वांगीण परिस्थितींत झपाट्यानें क्रांति होऊं पहात आहे अशा कालचक्राच्या सुरवातीच्या सुमारास, आधुनिक संस्कृतीच्या सर्व संस्कारांनी परिपूर्ण असा एक अधिकारी पुरुष-बादशहा आठवे एडवर्ड—हे जगांतील सर्वांत मोठ्या अशा साम्राज्याच्या सिंहासनावर अधिष्ठित झाले आहेत, या कारणानें तर त्या रहस्यास व्यक्तिमाहात्म्याची जोड मिळाली आहे आणि त्यामुळें जगाचें लक्ष यापुढें त्यांच्या प्रत्येक हालचालीकडे आणि प्रत्येक शब्दा-कडे वेधून राहणार आहे. ते आजपर्यंत युवराज असल्यामुळें जगाच्या नजरेपुढें प्रामुख्यानें नव्हते, म्हणून त्यांच्या जीवनचारित्ररूप कादंब-

रीचीं आतांपर्यंतची सर्व प्रकरणें सर्व लोकांस पूर्ण परिचयाचीं असणें संभवनीय नाही. अर्थात् यापुढील त्यांचा जीवनक्रम सर्वांच्या रहस्याचा विषय होणार असल्यामुळें, त्यांच्या आतांपर्यंतच्या चरित्राची संक्षिप्त माहिती मिळाली म्हणजे त्यांच्या भावी जीवनक्रमाची सुसंगती समजण्यास पुष्कळ सोपे जाणार आहे. याच उद्देशानें आतांपर्यंत त्यांचें सक्षिप्त चरित्र येथे दिले आहे. आतां या भागात त्यांच्या विषयी कांही मनोरजक गोष्टी सांगावयाच्या आहेत. या गोष्टीवरून त्यांचा स्वभाव व मनोवृत्ति यांवर जास्त प्रकाश पडेल. माणसाच्या लहान सहान व सकृद्दर्शनी क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींतसुद्धा त्याचें व्यक्तिमत्त्व प्रतीत होत असते, व त्यांवरूनच त्यांच्या मनोधारणेचें स्वरूप जग ठरवित असतें. सामान्य मनुष्याच्या कृतीकडे जगाचे लक्ष जात नाही आणि मोठ्या माणसाच्या कृतीकडे ते जातें.

## अष्टपैलू संस्कृती

ब्रिटिश राजदरबारांत नेहमी जाणारी तिकडील एका मोठ्या घराण्यातील स्त्री त्याच्याविषयी म्हणते, "ब्रिटिश राजसिंहासनावरील सम्राटाच्या ज्येष्ठ पुत्रास 'प्रिन्स ऑफ् वेल्स ( वेल्स प्रांताचा राजा ) ही पदवी देण्याचा प्रघात आज कित्येक शतके चालू आहे, पण या पदवीनें विभूषित झालेल्या कोणत्याही राजपुत्रापेक्षा या प्रिन्स ऑफ् वेल्सची संस्कृती जास्त होती व ती अष्टपैलू होती. राजे लोकांचा स्तुतिपाठ गाणें ही एक पद्धतच पडून गेलेली आहे ती असो आणि प्रस्तुत बादशहा प्रिन्स ऑफ् वेल्स असता त्याची स्तुतिस्तोत्रें शेकडों लोकांनीं केलेलीं असोत, परंतु आज जगात जे संस्कृतिसंपन्न, चाणाक्ष व कर्तबगार पुरुष आहेत त्यापैकीं ते एक आहेत ही जाणिव अद्याप

फार लोकांस झालेली नाहीं. इतरास ६० वर्षाच्या वयांत जो जगाचा अनुभव प्राप्त होत नाही तो त्यांस ४१ वर्षाच्या वयांत मिळालेला आहे. स्वभाव जात्या भिडस्त व चेहऱ्यावर एक प्रकारचे मार्दव आहे, पण तेवढ्यावरून त्याच्या खऱ्या मनोवृत्तीची व उच्च कर्तबगारीची कल्पना त्याच्या चरित्र-लेखकास किंवा जगासही करता येणार नाहीं."

साम्राज्याची सूत्रे चालविण्याची लायकी त्यास यावी या दृष्टीनें त्यास आजपर्यंत मिळालेले शिक्षण व तज्जन्य अनुभव यांच्या योगानें ते "शांततेच्या वेळीं खलाशी, युद्धाच्या प्रसंगी योद्धा आणि आणी-बाणीच्या वेळी मुत्सद्दी आणि ब्रिटिश राष्ट्रातर्फे जागतिक राष्ट्रांतील वकील अशा योग्यतेस पोचले आहेत" असे एक प्रख्यात लेखक मि. गाय रॅमसे यानी वर्णन केले आहे.

त्यांच्या आजच्या ४१ वर्षाच्या वयांत, त्यांची पणजी महाराणी व्हिक्टोरिया, आजोबा सातवे एडवर्ड आणि वडील पंचम जॉर्ज अशा ब्रिटिश सिंहासनावर तीन कारकिर्दी झाल्या. महाराणी व्हिक्टोरिया या थोरमनाच्या व सद्गुणी होत्या परंतु त्यांनी आपले ज्येष्ठ पुत्र सातवे एडवर्ड यास राजकारणाकडे फिरकू दिले नाहीं. इतके कीं त्याबाबतींत त्याच्यावर करडी नजर होती म्हणतात. तथापि ते स्वत. अधिकारा-रूढ झाल्यावर प्रयत्नांती आपल्यांत ही उणीव त्यांनी भासूं दिली नाही. पण स्वत.च्या चिरंजिवांकडे इतक्या करड्या नजरेनें वागणाऱ्या महाराणी व्हिक्टोरिया यांनी आपल्या या पणतवाचे फार लाड केले; आणि त्यांच्या पश्चात् सातवे एडवर्ड यांनीं मात्र आपणास मिळालेल्या अनुभवाचा फायदा घेऊन आपल्या तरतरीत बुद्धीच्या नातवास त्याच्या भावी जीवनास आवश्यक असें शिक्षण देण्यांत मुळीच कसूर केली नाहीं.

बादशहा आठवे एडवर्ड हे गादीवर आल्यापासून त्यांच्या संबंधानें आतांपर्यंतची माहिती शेंकडों नव्हे हजारों ठिकाणीं प्रसिद्ध झालेली आहे. तथापि त्यांच्या लहानपणाच्या कांहीं गोष्टी सर्वच प्रसिद्ध होणे शक्य नाही. त्या त्यांच्याशीं प्रत्यक्ष सहवास झालेल्या प्रजाजनांच्या आठवणींत असल्या पाहिजेत.

उदाहरणार्थ लहानपणांतील त्यांचे खेळ व बोलणे हे त्याच्या दाया, परिचारक, व बागांतील माळी, यांच्याच आठवणींत असणार. त्याहून मोठे झाल्यावर आसपासच्या खेड्यांत फिरावयास जात तेव्हां खेड्यातील लोक त्याच्याभोवती जमत, त्यावेळच्या गोष्टी त्या लोकांच्या आठवणींत असणें संभवनीय आहे. मोठेपणींसुद्धां सार्वजनिकजागीं अगर समारंभांत त्यांनी केलेल्या भाषणांची अगर त्या सभारभांतील त्यांच्या कार्यक्रमाची हकीगत वृत्तपत्रांच्या प्रतिनिधीस मिळालेली नाही. ती प्रत्यक्ष त्या त्या वेळीं हजर असलेल्या लोकांच्या आठवणींतच असणार.

अशा अप्रसिद्ध गोष्टी कोणाच्या आठवणींत असतील तर त्या आपल्याकडे पाठविल्यास प्रत्येक स्वीकारलेल्या गोष्टीस १० शिलिंग बक्षीस दिलें जाईल असें लंडन येथील ' जॉनबुल ' पत्रानें जाहीर केले होतें. त्याप्रमाणें बऱ्याच गोष्टी त्या पत्राकडे आल्या त्यांतल्या कांहीं पुढें दिल्या आहेत.

## ' घरासारखा पाहुणा ! '

सन १९२० सालच्या उन्हाळ्यांतील गोष्ट. एपिंग फॉरेस्ट येथें निरनिराळ्या शाळांतील मुलें खाण्यापिण्यांत आणि मजेंत एक दिवस घालविण्यासाठीं जमलेलीं होतीं. खेड्यांतील गरिबांचीं मुलें, त्यांच्या

अंगावर चांगले कपडे कुठून असणार ? तरी होते त्यांत नीटनेटके कपडे घालून ती आलीं होतीं. आणि त्यादिवशी त्यांची गंमत पाहण्यास 'प्रिन्स ऑफ् वेल्स' आले होते म्हणून ती विशेष आनंदांत होतीं.

शेंकडो मुलें असल्यामुळें त्यांस चहासाठी साध्या दगडी पेल्यांची तजवीज संमेलनाच्या व्यवस्थापकांनीं केली होती. मुलांस चहाचे पेले देण्याचें काम चालू असतां प्रिन्स ऑफ् वेल्स जवळच त्यांच्या बाजूस बसून गंमत पहात होते. खेडेगांवची मंडळी, त्यांस रीतभात विशेषशी कुठून माहित असणार ? चहाचे पेले देणारा इसम प्रत्येक मुलाच्या हातांत एक एक पेला देत शेवटीं जेथें प्रिन्स आफ् वेल्स बसले होते तेथें आला आणि त्यानें बाकीच्यांप्रमाणेच त्यांच्याहि हातांत तसलाच एक पेला दिला ! मुख्य व्यवस्थापकानी त्याच्यासाठी निराळीकडे चहाची तजवीज केली होती. त्यांची नजर जाते न जाते तोच प्रिन्स ऑफ् वेल्सच्या हातांत पेला गेला आणि त्यांनी तो तोंडास सुद्धा लावला. व्यवस्थापकांची तारांबळ उडून गेली. लगेच त्यांनीं तेथें येऊन झालेली चूक सांगितली. प्रिन्स ऑफ् वेल्स म्हणाले, " छे छे त्याची जरूरच नाहीं. मी आज या बालमंडळींत आलों आहें, आणि मीहि त्याच्यासारखाच पाहुणा आहे. घरासारखा पाहुणा, हेंच बरोबर आहे. "

## रणभूमीवरील जुना दोस्त.

लॅंबेथ येथें एका सभेस प्रिन्स आफ् वेल्स यावयाचे होते म्हणून ते मोटारींतून उतरणार होते तेथून सभेच्या हॉलपर्यंत त्यांना चालत जाण्यासाठीं किरमिजी गालिचा घातला होता. युवराजांची मोटार आली, ते खालीं उतरले आणि त्यांनीं गालिचावर पाय ठेवला, इत-

क्यांत मागच्या मंडळीत गडबड उडाली. एक जुने पुराणे कपडे घातलेला सामान्य माणूस त्या गालिच्यावरून हॉलमध्ये जाऊं पहात होता आणि प्रिन्स आफ् वेल्स पुढें असल्यामुळे मंडळी त्याला परत जबरदस्तीने मागे रेटीत नेत होती त्यामुळें तो संतप्त होऊन अद्वातद्वा बोलत होता. प्रिन्स आफ् वेल्सचे लक्ष तिकडे गेले आणि त्या माणसावर त्याची नजर पडताच त्यांनीं त्याचे नाव घेऊन हाक मारली आणि त्याला हातांत धरून आपल्याबरोबर सभेत नेले. महायुद्धांत फ्रान्सच्या रणभूमीवरील तो एक सैनिक होता आणि त्यावेळचा युवराजाचा दोस्त होता.

## चिरूट कीं सिगारेट ?

सन १९२२ साली कॅम्राल ब्रॉमविच येथें औद्योगिक प्रदर्शन भरलें होते व त्यास प्रिन्स आफ् वेल्स जावयाचे होते. त्यांच्या स्पेशल ट्रेनवर आलबर्ट रिचर्डस् नावाचा ड्रायव्हर होता. गाडी सुटण्याची वेळ झाली होती आणि गार्डचें सिग्नल मिळण्याची सदर ड्रायव्हर वाट पहात होता. इतक्यांत प्रिन्स ऑफ् वेल्स आपल्या डब्यातून त्याच्याकडे आले आणि त्याला विचारले, "तुम्ही तबाखू ओढतां काय ?" 'होय' असे उत्तर मिळाल्यावर क्षणभर थाबून युवराजांनीं परत विचारलें "चिरूट की सिगारेट ?" ड्रायव्हर म्हणाला "चिरूट ओढतो पण नेहमीच नाहीं कांहीं !" त्याबरोबर युवराज किंचित् हंसले आणि खिशातून चिरूटचा एक डबा काढून म्हणाले, "कां होईना पण ओढता ना ? मग हा घ्या तर," असे म्हणून ते परत आपल्या जागी गेले.

## पांगळी मुलगी

बर्मिंगहॅम येथील एक कारखाना पाहण्यासाठी युवराज येणार होते म्हणून त्या कारखान्यातील शेकडो कामगार, कारखान्यात युवराजांचे स्वागत करण्यासाठीं रांगेने उभे राहिले होते. त्या कारखान्यात यंत्र चालवणारी एक पांगळी मुलगी होती. तिला उभें राहतां येत नसल्या-मुळें ती एकटीच आपल्या यंत्राकडे बसून राहिली होती. मॅनेजरने ती पांगळी असल्याचें युवराजांस सांगितले. तें ऐकतांच युवराज प्रथम ती होती तेथे गेले, तिची विचारपूस केली व नंतर बाकी कामगाराकडे वळले.

## " भाकरीस वास तर खमंग येतो ! "

डरहॅम येथे एकदा युवराज गेले असता गरीब लोकांची वस्ती पाहण्यासाठी त्याच्या झोपड्या होत्या तेथें गेले. एका झोपडीत ते शिरले आणि येताना एक भाकरी घेऊन बाहेर आले. बाहेर लोक उभेच होते त्याचकडे पाहून ते म्हणाले, " भाकरीस वास तर खमंग येतो ! "

## " राजा आणि असला पोषाख ! "

आफ्रिका खंडांत त्यांचा दौरा सुरू असता तेथील हवा अति उष्ण असल्यामुळें आखूड शर्ट व माडचोळणा घालून ते एक दिवस आसपासचे खेडेगाव पहावयास गेले होते. त्यांना पहाण्यासाठीं तद्देशीय लोक जमले होते. एवढ्या मोठ्या साम्राज्याचे युवराज आणि त्यांचा असला पोषाख पाहून ते निराश झाल्यासारखे दिसले. युवराजास ती गोष्ट समजताच, कांहीं मैलावर त्यांचा मुक्काम होता तेथें परत त्या कडक उन्हांतून गेले आणि भर पोषाख घालून परत आले. तेव्हा त्या लोकांस फार आनंद झाला.

## मुलाच्या आईस विश्रांति

युवराजाचे बंधू डयूक ऑफ् यॉर्क हे सपत्नीक ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेले होते, ते परत यावयाचे होते म्हणून ते यावयाच्या वेळीं पुष्कळ मंडळी स्टेशनवर जमली होती. युवराजही मडळींत होते. त्या मंडळीत एक बाई आपल्या मुलास घेऊन उभी होती. मूल जरा बरेंच सशक्त अर्थात् जड होते. बराच वेळ घेऊन उभी राहिल्यामुळें बाई अगदीं दमून गेली होती. खाली ठेवावें तर मंडळीची भारी गर्दी! युवराजांच्या लक्षांत ती गोष्ट आली. लगेंच त्यांनी त्या बाईकडचे मूल आपण घेतलें आणि म्हणाले, " बाई थोडा वेळ विश्राति घ्या ! "

## लढाईत विद्रूप झालेला शिपाई

महायुद्धाचे वेळीं लढाईत घायाळ व जखमी झालेल्या सैनिकांस उपचारासाठी लष्करी हॉस्पिटलात आणून ठेवीत असत. युवराज या हॉस्पिटलांत वरचेवर जाऊन जखमी लोकांस पाहत व त्यांची विचार-पूस करीत. त्याप्रमाणें एके दिवशीं ते एका लष्करी हॉस्पिटलांत जखमी लोकांस पहावयास गेले असतां तेथील सर्व जखमी लोकांस त्यानी पाहिलें व त्यांच्याकडे जाऊन प्रत्येकाची विचारपूस केली. आणखी कोणी आहेत काय असे युवराजांनी विचारल्यावर डॉक्टर म्हणाले, " आता कोणी पाहण्यासारखे नाहींत; एक जण आहे, पण त्याला पाहण्यासारखें नाहीं ". खरा प्रकार असा होता कीं लढाईत त्या शिपायाचे अवयव छिन्नभिन्न झाले होते आणि पांगळा प्राणी तेथें आणून टाकलेला होता. चेहरा सुद्धां विरूप झाला होता, डोळे गेले होते आणि फक्त नांवास जिवंत होता. युवराजांनीं डॉक्टरकडून ती हकीकत ऐकल्यावर डॉक्टरांचें म्हणणें न ऐकतां डॉक्टरांस घेऊन ते

त्या रोग्यास निराळ्या खोलींत ठेवलें होतें तेथें गेले. त्याची स्थिति पाहून युवराजांस गहिंवर आला. ते त्या रोग्याजवळ वांकले आणि त्याच्या कपाळाचें चुंबन घेतलें.

## ' माझ्याकडून व्हावयाचे प्रयत्न मीं केले '

नुकतेच दिवंगत झालेले सुप्रसिद्ध ग्रंथकार व कवि मि. रडयार्ड किपलिंग याचा मुलगा जॉन किपलिंग गेल्या महायुद्धांत लष्करांत ' आयरिश गार्ड्स ' मध्ये होता. फ्रान्स येथें लढाईत तो ठार झाला. याच पलटणींत मि. रॉबर्ट ग्रेसन हा दुसरा इसम जॉन किपलिंग याच्याच बरोबर होता. हे दोघेही जिवलग मित्र होते आणि त्यामुळें ग्रेसन याचा किपलिंग कुटुंबात फारच घरोबा होता.

सन १९१५ च्या सप्टेंबर महिन्यात ही पलटण फ्रान्सांत लूस येथें लढाईवर गेली. त्या लढाईत रॉबर्ट हा गोळी लागून जखमी झाला आणि जॉन किपलिंग याचें काय झालें याचा पत्ता लागत नाहीं असा हेडक्वार्टरांत रिपोर्ट आला.

रॉबर्ट जखमी झाल्यामुळें त्यास लंडन येथील लष्करी हॉस्पिटलांत उपचारांसाठीं आणून ठेवले होते. आपल्या मुलाची काहीं बातमी मिळेल म्हणून मि. रडयार्ड किपलिंग रॉबर्टला भेटण्यासाठीं त्या हॉस्पिटलमध्यें आले. बाहेरून मनांतली चिंता न दाखवण्यासाठीं ते प्रयत्न करीत होते, पण किती झालें तरी पित्याचें हृदय, त्याचा परिणाम चेहऱ्यावर दिसल्याशिवाय कसा राहील ? रॉबर्टने त्यास आपणास ठाऊक होती तेवढी हकीकत सांगितली, पण त्यावरून नक्की कांहींच कळेना. तेव्हां दोघांनीहि विचार करून असे ठरवलें कीं प्रिन्स ऑफ् वेल्स हे त्यावेळीं त्याच अघाडीवर होते त्यांस पत्र पाठवून जॉनची नक्की

बातमी काढून कळविण्याची विनंति करावी. त्याप्रमाणें त्यांनीं पत्र पाठविलें. त्या पत्राचें उत्तर प्रिन्स ऑफ् वेल्स यांनीं पाठविलें तें उत्तर किती कळकळीने लिहिलेलें आहे, हे समजण्यासाठीं, तें पत्र जशाचें तसे येथें दिलें आहे·—

हेडक्वार्टर, गार्ड्स् डिव्हिजन
१५ ऑक्टोबर १९१५

प्रिय ग्रेसन,

आपण पत्र पाठविले याबद्दल आपले फार आभार मानतों. हें उत्तर पाठविण्यास इतका विलंब लागला याबद्दल दिलगिरी वाटते, पण इलाज नाही. किपलिंगची खरी माहिती मिळवणें ही गोष्ट सोपी नव्हती.

किपलिंगचे कंपनी कमांडर बर्ड यांची चिठी यासोबत पाठवित आहें त्यावरून काय ते समजून येईल. असली तर त्यानाच त्याच्याविषयी माहिती असणे शक्य आहे म्हणून मी त्यास पत्र लिहीले होतें, त्याशिवाय फादर नॅप यांस काल रोजी मुद्दाम भेटून घेतले. त्यांची आणि बर्ड याची माहिती एकच आहे. जॉन किपलिंग शत्रूच्या कैदेंत असावा असे तूर्त मानून चालणें भाग आहे.

गेल्या आठवड्यात तुमच्या नं १ पलटणीची फारच नासाडी झाली. कमांडिंग ऑफिसर ठार झाला, ॲडज्युटंट जखमी झाला, गरीब बिचारा गेअर-लॅंगटन आणि फादर ग्विन हेही प्राणास मुकले. हेडक्वार्टरांतच तोफेचा गोळा येऊन पडला आणि एवढा अनर्थ झाला. मोठा घोर प्रसंग.

तुमची प्रकृति आतां सुधरत असेल आणि लवकरच हॉस्पिटलाची जरुरी राहणार नाही अशी मी आशा करतों.

किपलिंगविषयीं याहून जास्त कांहीं माहिती मला देतां येत नाहीं, याबद्दल मला किती वाईट वाटतें म्हणून सांगू ? पण काय करणार ? माझ्याकडून होण्यासारखे होते तेवढे प्रयत्न मीं केले.

आपला

**एडवर्ड** .

हे पत्र लिहिणारी व्यक्ति ब्रिटिश साम्राज्याचा युवराज होती, यावरून ही मनोवृत्ति किती साधी, किती निष्कपट व किती निरहंकारी आहे याची कल्पना होईल.

गेल्या ४० वर्षांच्या कालाचे जर आपण सिंहावलोकन केलें तर त्यावेळी आणि आतां या दरम्यान जगांत केवढी क्रांति झाली आहे हें लक्षांत येऊन आश्चर्य वाटेल. नुसत्या वाहनांचा जरी विचार केला तरी घोड्यांच्या जागीं आज विमानांची मजल आली आहे. त्यावेळचें जीवन आरामशीर आणि स्वस्थतेचें असे. आज केवढीही श्रीमंती असली तरी जीवनात स्वास्थ्य आणि शांतता नाहींशी झाली आहे. त्यावेळी सभोंवतालच्या परिस्थितींत स्थिरपणा असल्याचा मनास विश्वास वाटत असे. आज जागतिक परिस्थितींत इतका चंचलपणा आला आहे की आज आहे ती परिस्थिती उद्यां राहील असें कोणास निश्चयात्मक सांगतां येणार नाही.

चाळीस वर्षांतील झपाट्यानें होत असलेल्या या क्रांतीच्या प्रत्येक अवस्थेचा अनुभव बादशहा आठवे एडवर्ड यांनीं घेतलेला आहे. ४० वर्षांपूर्वीचें वाहन घोडा यावर बसण्यांत ते अगदीं पटाईत आहेत तर आजचें वाहन मोटार, विमान हींहि चालवण्यांत ते पूर्ण वाकबगार आहेत. घोड्यावर बसण्याच्या त्यांस असलेल्या नादासंबंधानें पूर्वी

उल्लेख आलाच आहे. विमानविद्येसंबंधानें पाहिलें तर, राजेलोकांत विमानांतून प्रवास करण्याचा उपक्रम पहिल्यानें त्यांनींच सुरू केला. पण यासंबंधानें त्यांच्यांत आणि इतर राजेलोकांत फरक इतकाच कीं त्यास स्वतः विमान चालविण्याची कला अवगत आहे.

प्रिन्स ऑफ् वेल्स असतां त्यांच्या मालकीचीं विमानें ब्रिटनमध्यें इतर कोणाच्याही विमानापेक्षां जास्त होतीं. कोणत्याही सार्वजनिक सभेस अगर समारंभास जावयाचें असल्यास ते आजपर्यंत बहुधा विमानांतून जात. हाच क्रम आतां पुढें राहतो कीं काय पहावें.

विमानाच्या वाहतुकीचा प्रसार अद्याप बराच व्हावयाचा आहे. ब्रिटनमध्यें सुद्धां अद्याप विमानांत न बसलेले कोट्यवधि लोक आहेत. याचें कारण या वाहनाच्या सुरक्षिततेविषयीं अद्याप लोकांच्या मनाची खात्री झालेली नाहीं. यामुळे बादशहा प्रिन्स ऑफ् वेल्स असता जेव्हा विमान हें वाहन त्यांच्या नित्य रहदारीचें झालें तेव्हां लोकांस फार आश्चर्य वाटूं लागलें.

## विमानांतून पहिली सफर.

विमानांतून त्यांनीं पहिली सफर केली तरी ती त्यावेळीं बरेच दिवस कोणास माहित झाली नव्हती. त्यासंबंधाची हकीकत गमतीची आहे. ही पहिली सफर महायुद्धाचे मुदतींत झाली व ती त्यांनीं गुपचूपपणें केली. लंडन जवळ जें विमानगृह आहे तेथें ते गूपचूप गेले, आणि आपण कोण आहों ही कोणास जाग लागूं न देतां तेथें आसपास टेहळणी करीत राहिले. इतक्यांत एक तरुण वैमानिक अंमलदार विमानांत बसून जाण्याची तयारी करीत असल्याचें त्यांस दिसतांच त्याजकडे जाऊन म्हणाले, "माझ्याही मनांत एकदा बसावयाचें होतें. नेतां काय मला आपल्याबरोबर ?"

हे प्रिन्स ऑफ् वेल्स असतील अशी त्या तरुण अंमलदारास कल्पनाही नसल्यामुळें तो म्हणाला, " अस्सं ! बरेंच झालें. मला तरी सोबत हवीच होती. चला, बसा. "

त्यांना घेऊन तो तरुण अंमलदार विमानांत बसला आणि सुमारें २० मिनिटें तें विमान त्यानें फिरवून आणलें. विमानांतून उतरल्या-वर युवराजांनीं त्याचे आभार मानले व त्याच्याबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत राहिले.

पण इतक्यांत एक लष्करी अंमलदार कावऱ्याबावऱ्या स्थितींत तेथें आला आणि त्यानें युवराजांस, " युअर रॉयल् हायनेस " म्हणून संबोधितांच त्या तरुण वैमानिकाची बोबडी वळण्याचा प्रसंग आला ! युवराजांस विमानांत बसविल्याबद्दल वरिष्ट अंमलदारांनीं त्याची बरीच कानउघाडणी केली, पण युवराजांनीं मात्र त्यास कफचीं किंमतदार बटनें बक्षीस म्हणून पाठवून दिलीं.

## अभय भीताला !

गेल्या महायुद्धांत ब्रिटिश वैमानिक दलांत प्रसिद्धीस आलेले कर्नल बार्कर, व्ही. सी. यांच्या विमानांचें शत्रूच्या ६० विमानांशीं युद्ध सुरू असतां, कर्नल बार्कर यांस गोळी लागली, त्यांचा डावा हात तुटला व दोन्ही पाय व नाक यास जखमा झाल्या. त्यांना इंग्लंडात हॉस्पिटलांत आणून ठेवलें होतें तेथें युवराज त्यांस भेटाव-यास गेले. गोष्टी निघतांना त्यांस कर्नल बार्कर पुनः विमानांत बस-ण्यासारखे बरे होतील काय असा प्रश्न निघाला. कर्नल म्हणाले, " विमानांत पुनः बसेन कीं काय याचा आतां संशयच आहे. " लगेच युवराज म्हणाले, " त्यांत संशय कसचा आला आहे ? तुम्हीं

बरे होणार आणि पुनः विमान चालवणार हें निश्चित आहे. आणि पहिल्या खेपेस मी तुमचा पॅसेंजर आहे हें लक्षांत असूं द्या !"

कर्नल बार्कर त्यातून बरे झाले आणि प्रिन्स ऑफ वेल्सनीं सांगितल्याप्रमाणें आपला शब्द खरा केला. कर्नल बार्कर पुढें पुष्कळ वर्षें विमान चालवीत असत. शेवटी १९३० साली कानडांत त्यांस अपघात होऊन ते वारले. त्यावेळीं युवराजांस फार दुःख झालें.

महायुद्धानंतरही वैमानिक प्रवासाची त्यांची आवड वाढतच गेली. आफ्रिका व दक्षिण अमेरिका इकडे प्रवासास गेल्यावेळी तिकडील प्रवासाचें विहंगम निरीक्षण ते विमानांतून करीत असत.

वैमानिक प्रवासाविषयीं त्यांची ही धाडसी वृत्ति पाहून प्रत्येकास विस्मय वाटे. आफ्रिकेच्या दौऱ्यावर असतां एके दिवशी ते विमानां-तून तिकडील प्रदेश पाहण्याची तयारी करूं लागले. तेव्हां एक वरिष्ठ सरकारी अधिकारी त्यांस म्हणाले, "या प्रदेशांत असें करणें फार धोक्याचें आहे. प्रसंगी जर विमान अपघातानें खालीं कोसळलें तर दाद-सुद्धां लागणें शक्य नाहीं. कारण सर्वत्र अफाट निबिड अरण्यें आणि भयंकर दलदलीचे प्रदेश आहेत."

युवराज हंसून म्हणाले, "मग हाडें तरी कुठल्याही युगांत मिळ-तील." त्यांनी तो प्रवास ठरल्याप्रमाणें केला हे सांगावयास नकोच.

दक्षिण अमेरिकेंतील उंच बर्फाच्छादित ऑडिस पर्वतावरून त्यांचें विमान जात असतां ते मोठ्या शर्तीनें अपघातांतून बचावले म्हणतात. तथापि त्यांचा नाद कमी झाला नाहीं. सन १९२८ साली विमान चालवण्याची शास्त्रीय माहिती मिळवण्यासाठीं ते त्यांत पुष्कळ लक्ष घालूं लागले. कारण यावेळीं बहुतेक दररोज कांहीं तरी सार्वजनिक

कार्यक्रम त्यांच्यामागें असावयाचाच असें होऊं लागलें, आणि त्यामुळें आगगाडीनें जाण्यायेण्यात बराचसा वेळ खर्च होऊं लागला.

प्रत्येक रेलवे स्टेशनवर येतांना आणि जातांना स्वागत हें ठरलेलें असावयाचेंच. असल्या औपचारिकतेमुळें युवराजांस दगदग होऊं लागली. त्यांना विधायक अगर उपयुक्त कार्य कितीहि करावें लागलें तरी श्रम थकवा म्हणून कांही वाटावयाचा नाही, पण हे ठराविक व पोकळ कार्यक्रम मात्र त्यांस कंटाळवाणे वाटतात.

या वयांतील एकसारखें काम करण्याचा त्यांच्या मनाचा उत्साह व तरतरी उत्तरोत्तर वयपरत्वें अशीच कायम राहील असें नाहीं, उतार वय होत जाईल तसतशी विश्रांतीची त्यांना जरूर वाटूं लागेल हें खरें, पण आज मात्र हा त्यांचा उत्साह जबरदस्त असल्यामुळेंच शक्य तों जास्त कार्य करतां यावें याकरितां वेळाची बचत करण्यासाठीं त्यांनी वैमानिक प्रवास आत्मसात् केला. हेंडन येथील विमानगृहापर्यंत त्यांनीं लंडनहून दररोज प्रवास करावा, अशा क्रमानें त्यांनीं सुप्रसिद्ध वैमानिक डॉन यांजकडून या कलेचे शिक्षण घेतलें.

या प्रत्यक्ष अनुभवात्मक शिक्षणाशिवाय त्यांनीं त्या विषयावरील बहुतेक पुस्तकांचें पारायण केलें, आणि थोडयाच अवधींत त्याविषयींची शास्त्रीय माहिती संपादन केली.

## विमान चालविण्याचा पहिला प्रयत्न

सन १९२९ च्या आक्टोबर महिन्यांत युवराजांनीं स्वतः विमान चालविण्याचा पहिला अनुभव घेतला. रॉयल एअर फोर्सचें एक विमान घेऊन एके दिवशी सकाळीं त्यांत ते एकटेच बसले, आणि वीस मिनिटें उत्तम पद्धतशीर रीतीनें तें फिरवून पुनः जागच्या जागीं

आणलें. पहिलाच प्रयत्न कोणाच्या मदतीशिवाय इतक्या बिनचूक रीतीनें यशस्वी झालेला पाहून त्यांस अत्यंत आनंद झाला, व वैमानिक कलेंत त्यांस आत्मविश्वास वाटूं लागला. त्या दिवसापासून वैमानिक प्रवासाची त्यांची आवड वाढतच गेली. रॉयल एअर फोर्समध्यें त्यांनीं एअर मार्शल हा किताब मिळविला आहे, आणि त्यांस जे अनेक आरमारी व लष्करी किताब आहेत त्यांपेक्षां हा किताब त्यांच्या मनाला अधिक प्रिय वाटतो. प्रत्येक जातीच्या विमानांत बसण्याचा त्यांनीं सराव ठेवला आहे. एकाद्या विमानांत नवीन यांत्रिक रचना असल्याचें त्यांना समजलें कीं ती पाहिल्याशिवाय त्यांना चैन पडावयाचें नाहीं.

जर्मनीचें प्रचंड विमान डॉर्निअर ( Dox ) हें सोलेंट येथें आलें होतें. तेव्हां युवराज तें पहाण्यासाठीं मुद्दाम आपल्या विमानांतून तेथें गेले, आणि आधुनिक कालांतील एक शास्त्रीय चमत्कार म्हणून नांवाजले गेलेलें हें विमान त्यांनीं वीस मिनिटें उत्तम प्रकारें चालवून दाखविलें. सदर विमानांतील कमांडर कॅ. मर्झ् यांनीं युवराजांची जेव्हां तारीफ केली तेव्हां युवराजांस मनःपूर्वक समाधान वाटलें.

इंग्लंडांतील कांहीं प्रमुख वजनदार लोक व राजकारणी मुत्सद्दी यांस बादशाहांची ही वैमानिक प्रवासाची आवड पाहून मनांत एक प्रकारची भीति वाटते. त्यांच्या मातुश्रीस तर याविषयीं नित्य काळजी वाटत असते. बादशहा पंचम जॉर्ज हे विमानांत कधींच बसले नसावे असें वाटतें. ते आपल्या चिरंजीवांस याबद्दल जरी फारशी हरकत घेत नसत तरी फार काळजीनें वागा अशी त्यांची ताकीद असे. सुमारें दोन वर्षांपूर्वी त्यांचीं सहा विमानें होतीं त्याचा ते आळीपाळीनें

उपयोग करीत असत. अगदीं अलिकडे जें विमान त्यांनीं तयार करविलें आहे तें बांधण्यास सुमारें दोन लाख रुपये खर्च झाला असावा. हें ' व्हिकर्स व्हिआस्ट्रा ' जातीचे असून त्यात दोन हजार मैलांचा केंद्र साधला आहे. वैमानिक कलेची त्यात कमाल झालेली दिसून येते. या कलेंत नांवाजलेल्या जगांतील सर्व कलावंत कारागिरांचें सहकार्य हें विमान बांधतांना मिळविलें होतें. त्यामुळें जगांतील आजच्या सर्व विमानांत तें पहिल्या दर्जाचें झालें आहे. आंतील यंत्राचा मोठा आवाज होऊं नये अशा तऱ्हेची त्यांत योजना केलेली आहे. या विमानांत खुद्द बादशहांची बसण्याची केबिन आहे. त्यांत उंची मूल्यवान् गालिचे, आर्म् चेअर्स, केबिनमधील हवा गरम ठेवण्यासाठीं विद्युत् यंत्र अशी योजना असून त्यामध्यें पूर्ण आरामशीर बसून बादशहांस बोलतां चालतां येतें, किंवा आपलीं भाषणें लिहून काढतां येतात. विमानांतील यंत्रांची मुळींच गडबड तेथें ऐकूं येत नाहीं. या विमानांत बारा इसम व प्रवासाचें भरपूर साहित्य एवढें वजन घेऊन ताशीं दीडशें मैल प्रवास करण्याची यांत्रिक शक्ति आहे.

विमानांतून प्रवास करतांना त्यांच्याबरोबर त्यांचा खास शरीरसंरक्षक एक सरकारी स्पेशल डिटेक्टिव्ह, व एकदोन विशेष परिचयाचे स्नेही एवढी मंडळी असते. प्रिन्स ऑफ वेल्स असताना मि. पियर्स ले हे त्यांच्याबरोबर असत. ते स्वतां विमान चालविण्यांत निष्णात असले तरी बहुधा स्वतां कधीं विमान चालवित नाहींत. वैमानिक प्रवासात आराम व विश्रांति यांची जरूर असल्यामुळें विमान चालविण्याची कामगिरी ते आपल्या पायलटवरच सोंपवितात. बादशहांचे विमान चालविणारे मुख्यतः तीन अमलदार आहेत. ले. जे. डी. आरमर,

ले. ई. एच. फेल्डन, व ले. मेलर हे तिघे ऑफिसर मुख्यतः त्या कामावर असले तरी ले. फेल्डन यांसच बहुतेक ते आपल्याबरोबर घेतात. कारण हे वैमानिक सबंध युरोपांत फार काळजीने व दक्षतेने काम करणारे व त्या कलेत पूर्ण वाकबगार अशी ख्याती आहे.

बादशहा एकदां विमानांतून प्रवास करीत असतां दाट धुके पडल्यामुळें यॉर्क शायरमधील एका माळावर विमान उतरावें लागलें. त्यावेळीं विमानांत सहा मंडळी होती. आसपास वसती नव्हती. थोड्याशा अतरावर एकच अंधुक दिवा दिसत होता, तिकडे सर्व मंडळी वळली. सुमारें एक मैल चालल्यावर एका खेडेगांवांतील खाणावळीकडे ते येऊन पोहोंचले. हे बडे पाहुणे पाहून मालकाची धांदल उडून गेली. परंतु बादशहांनीं त्यांच्या मनाची गडबड नाहींशी करून टाकिली. मंडळीस असेल तो फराळ आणून द्या असें सांगितलें, आणि खाणावळींत पूर्वीं आलेले पाहुणे खेळत बसलेले होते, त्यांत आपणहि खेळ पाहूं लागले. धुके असल्यामुळें विमानाचा प्रवास रद्द करून मोटारीचा प्रवास करण्याचे ठरल्यामुळें मोटार येऊन तयार होती. पण चाललेला खेळ संपेपर्यंत ते तेथे राहिले व नंतर ही सर्व मंडळी निघून गेली.

बादशहा चहा घेतात, परंतु विमानांत असतांना त्यांना तो अधिक वेळां लागतो. अशावेळीं वाटेल तेव्हां चहा घेतां यावा म्हणून एक विजेची किटली त्यांच्यापाशीं तयार असते. व त्यांत ते स्वतः चहा तयार करून घेतात.

सारांश वैमानिक कलेसंबंधानें जितकें ज्ञान व वैमानिक प्रवासाची जितकी अभिरुची बादशहा आठवे एडवर्ड यांस आहे तितकी विद्यमान राजे लोकांत आणखी कोणासही नाहीं.

या वैमानिक कलेशिवाय त्यांना अश्वारोहण कलाहि चांगली अवगत आहे. त्याविषयीं मागें वर्णन आलेंच आहे. मोटर तर ते फारच उत्तम चालवितात. गोल्फ, टेनिस वगैरे खेळांत ते निष्णात आहेत. आणि बंदुकीच्या निशाणबाजींतहि ते कुशल आहेत.

परंतु या सर्व गुणांपेक्षां त्यांचा मोठा गुण म्हणजे ते खरे कार्यकर्ते आहेत हा होय. एकाद्या कारखान्यास औपचारिक भेट देणें किंवा एकाद्या हॉस्पिटलमध्ये जाऊन तेथील व्यवस्था पहाणें किंवा एकाद्या इमारतीचे पायाचा दगड बसविण्याचा समारंभ ठराविक पद्धतीनें करणें, असल्या औपचारिक कार्यक्रमांत बादशहांचें समाधान होत नाहीं. उदाहरणार्थः एकाद्या कारखान्यांत ते गेले तर कारखान्यांत काय काय माल तयार होतो, एवढेंच समजून न घेतां तो कसा तयार होतो, त्यास यंत्रसामुग्री कोणती लागते, कामगार किती आहेत, त्याची काम करण्याची पद्धत कशी आहे वगैरे तपशीलवार माहिती घेतल्याशिवाय ते रहात नाहींत. हॉस्पिटलमधील रोग्यांस करण्याची उपचारपद्धति कशी आहे, रोगी कोणकोण व किती आहेत वगैरे हरएक प्रकारची माहिती ते घेतात. इमारतीच्या पायाचा दगड बसवावयाचा असला तर इमारतीचा आकार काय, इमारत बांधण्याचा उद्देश काय, कारागीर निष्णात आहेत कीं नाहीं, इमारत बांधावयाची त्या जमिनीविषयीं माहिती, वगैरे बारीकसारीक तपशीलशुद्धां त्यांना पाहिजे असतो. सारांश इंग्लंडच्या राजसिंहासनावरीलच नव्हे, तर आजपर्यंतच्या कोणत्याही राष्ट्राच्या राजापेक्षां त्यांचें व्यक्तीवैशिष्ठ्य निराळेंच आहे !

प्रिन्स ऑफ् वेल्स असतांना एकादें सार्वजनिक कार्य त्यांनीं हातीं घेतलें तर त्या कामास जनतेकडून मिळालेलें सहकार्य हे त्यांनीं

आपल्या अधिकाराचा दिमाख व थाटमाट दाखवून मिळविलेलें नाहीं. लोकांच्या मनावर परिणाम करण्यासाठीं बरोबर दरबारी सरंजाम, शिपाई प्यादे न्यावयाचे, तेथें तोफांची सलामी घ्यावयाची आणि अशा भपक्यानें लोकांच्या मनावर परिणाम करून त्यांत लोकांकडून सत्तेच्या जोरावर सहाय्य घ्यावयाचें ही गोष्ट त्यांनीं कधीं केली नाहीं. त्यांनीं आजपर्यंत सार्वजनिक कार्यासाठीं मोठमोठे फंड जमविले, आणि त्यामुळें कित्येक संस्थाहि उभारण्यांत आल्या. त्या कार्यासाठीं सभेंत भाषणें करतांना हा ठेंगणा किरकोळ बांध्याचा पुरुष साधा पोषाख घालून भाषण करीत असे. त्या भाषणांत मधून मधून थट्टा विनोद. गप्पा त्यांतच धुम्रपान इत्यादि प्रकार चालावयाचे. त्यांच्यासंबंधानें पुरुष मंडळींस मित्राची, महिलामंडळांस पुण्यविभूतीची आणि बालचमूंस धर्मपित्याची भावना वाटते. ती त्यानीं आपल्या थोर व निर्मल आचरणानें उत्पन्न केली आहे. शारीरिक सौंदर्यावर लोकप्रियता मिळविणारे चित्रपट सृष्टींतील नट, शास्त्रीय संशोधनानें लोकप्रिय झालेले शास्त्रज्ञ किंवा मल्लविद्येतील नैपुण्यानें नांव कमावलेले मल्ल याच्याहून जास्त लोकप्रियता बादशाहांनी आपल्या साध्या वर्तनानें मिळविलेली आहे. एकाद्या सर्वाधिकाऱ्यास कडक शिस्त ठेवून नाटकी आविर्भावाचें आवेशयुक्त भाषण करून किंवा सुसंघटित गुप्त हेरांचें जाळें पसरून जें आपलें वर्चस्व बसवितां येते तशा प्रकारचे वर्चस्व बादशाहांनीं साम्राज्यान्तर्गत राष्ट्रांतच नव्हे तर जगांतील सर्व राष्ट्रांत संपादन केलें आहे. लहानांपासून मोठ्यापर्यंत खेळीमेळीची वागणूक व कोणतीहि गोष्ट त्यांत समरस होऊन करण्याची यांची मनोवृत्ती यांत त्यांच्या लोकप्रियतेचें रहस्य सांठविलेलें आहे.

लेनिनला ईश्वराप्रमाणे मानणारा आणि हिटलरचा पूर्ण तिरस्कार करणारा एक कम्युनिस्ट पंथी दुराराध्य माणूस, युवराज युरोपांत प्रवासास गेले असतां त्यांचें थोर वर्तन पाहून त्यांच्याविषयी अभिप्राय देतांना म्हणाला "राजाच्या जन्माला आला म्हणून ! नाहींतर सामान्य माणूस या नात्यानें पाहिले तर हा पुरुष खरोखर सज्जन आहे."

आमच्या नूतन बादशहांच्या वयाची आज चाळिशी उतरून गेली आहे. तरी देहयष्टी मुळचीच सुटसुटीत व प्रकृति काटक व निरोगी असल्याने त्यांच्या चेहेऱ्यावर अद्याप थोडीशी पोरवयाची झांक दिसते. आज वीस वर्षें जगभर लक्षावधि मैलांचा प्रवास व स्वदेशीं असतांना अनेक सार्वजनिक कामांचा एकसारखा व्याप त्यांच्यामागें असतां त्या मानानें त्यांची शरीरप्रकृति उत्तम आहे असें म्हटलें पाहिजे. कधीतरी प्रसंगवशात् सर्दी पडसें याशिवाय मोठें दुखणें या वीस वर्षांत त्यांना आलेलें नाहीं. लहानपणी त्यांची प्रकृति अगदीं नाजुक दिसत असे, परतु तो नाजुकपणा अशक्ततेचा नसून निरोगीपणाचा होता हें आता दिसून आलेच आहे. आणि त्यांच्या या निरोगीपणाचे रहस्य असे आहे कीं उघडया स्वच्छ हवेंत व्यायाम करून शरीर सुटसुटीत ठेवण्यांतच खरा निरोगीपणा असतो असें त्यांचें मत आहे. देहाच्या स्थूळपणाची त्यांना फार भीति वाटत असते असें म्हणतात. आपले आजोबा सातवे एडवर्ड याच्यासारखा आपला देह स्थूल आणि भव्य होऊं नये याच उद्देशानें सपाटून काम करण्याची संवय त्यांनीं लावून घेतली असें म्हणतात. इंग्लिश मनोवृत्तीला ज्या व्यायामाची व खेळांची अभिरुचि असते ती सर्व त्यांना आहे. तथापि इंग्लिश लोकांचा सर्वांत आवडता खेळ क्रिकेट याची त्यांना फारशी

आवड असल्याचें दिसत नाहीं. त्यांच्या अष्टपैलू तरतरीत बुद्धीस तो एकच एकसारखा चालणारा धिमा खेळ आवडत नाहीं. टेनिसचीसुद्धां त्यांना फारशी आवड नाही. तथापि कोणत्याहि खेळांत प्रेक्षक होण्यापेक्षा प्रत्यक्ष भाग घेण्याकडे त्यांची प्रवृत्ति जास्त असते. घोड्यावर बसून शिकारी कुत्र्यांचा कळप घेऊन त्यांची शर्यत लावण्याचा त्यांना फार शोक आहे. कुत्र्यांस घेऊन पारध करण्यासाठीं मेल्टन मोब्रे हें त्यांनीं सदर ठाणें केलें आहे. आणि याठिकाणी ते आले म्हणजे त्यांच्या परिवारांत उच्च दर्जाच्या गृहस्थापासून शेतातील मजूरांपर्यंत सर्व दर्जाचे लोक असतात. मेल्टन मोब्रेच्या या खेडवळ प्रदेशांत एका शेतकऱ्याची एक लहानशी झोंपडी आहे, त्या शेतकअत्यंत प्रिय वाटणारी जर कोणती वस्तु असेल तर एक लहानसा कुत्रा ही होय. बादशहा युवराज असतां या भागांत एकदां शिकारीस गेले होते. घोडा धांवत असतां घोड्यास ठेंच लागली आणि त्या झटक्यानें ते खालीं पडले. त्यांना थोडीशी चक्कर आली. तशांतच ते वर उठत होते इतक्यांत हा शेतकरी तेथें येऊन पोहोचला. घरीं त्याची बायको आजारी होती. तिच्यासाठीं तो बाजारांतून एका कुल्यांतून ब्रँडी घेऊन येत होता. लगेच त्यानें बादशहांस हुषारी वाटण्यासाठीं ती ब्रँडी दिली. थोड्या वेळानें त्यांस आराम वाटून ते पुनः घोड्यावर बसून निघून गेले. दुसऱ्या दिवशीं एक उंची ब्रँडीची बाटली, बरीचशी अन्नसामुग्री व कांहीं पौंडांची एक नोट त्या शेतकऱ्याच्या झोंपडींत पोहोंचती झाली. बादशहाच्या परिचयाचें स्मारक म्हणून तो कुत्रा त्या शेतकऱ्यानें फार जपून ठेवला आहे. बादशहांना गोल्फ खेळाची आवड आहे हें मागें सांगितलेंच. पोलोचा खेळसुद्धां त्यांना आवडतो. त्यांच्या व्यायामांत पोहण्याचा व्याया-

मांहि ते मधून मधून घेतात. शिकारींत पक्षी, ससे अशा लहानसहान प्राण्यांची शिकार करण्यांत त्यांना मुळींच मजा वाटत नाहीं. पण त्यांचे फोटो घेण्याची मात्र त्यांना फार आवड आहे. अशा प्रकारचे स्वतः घेतलेले शेंकडो फोटोग्राफ त्यांनी आपल्या संग्रहीं ठेवले आहेत. फोटोग्राफीमध्यें चलच्चित्रपट घेण्याची त्यांना फार आवड आहे. प्रवासांत सिनेमा कॅमेरा नेहमीं त्यांच्याबरोबर असतो.

त्यांच्या वाचनाच्या अभिरुचीविषयी पाहिलें तर त्यांना वाचनाचा अतिशय शोक आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. सातव्या एडवर्ड बादशहांविषयी असें सांगतात की वयाच्या वीस एकवीस वर्षांनंतर त्यांनीं पुस्तक उघडलें नाही. हाच नियम त्यांच्या नातवास तंतोतंत लागू करतां येईल असें मात्र नाहीं. सवड झाली तर केव्हांतरी थोडासा वेळ ते वाचनांत घालवितात. तरी वाङ्मयविषयक प्रेम ज्याला म्हणतात तें त्यांना आहे असें म्हणतां येणार नाहीं.

करमणुकीसाठीं नाटकगृहांत ते मधून मधून जातात, परंतु साधे हास्यरसोत्पादक, फार्सवजा खेळ त्यांना जास्त आवडतात. उच्च, भारदस्त नाटकप्रयोग पहाण्यास ते फारसे जात नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी या त्याच्या अभिरुचीबद्दल एका वर्तमानपत्रांतून टीका आली होती. तथापि बादशहांनीं ती टीका लक्षात घेतली नसावी असें दिसतें. कारण त्यांचा क्रम पूर्ववत् सुरू आहे. फार्स, संगीत संवाद हीं आपणाला मनापासून आवडत असतां लोकांच्या टीकेला भिऊन आपणास होणारा मनाचा आनंद कां गमवावा ? व लोकांस आवडतें एवढ्याचसाठी भारदस्त खेळांस कां जा ? अशी त्यांची विचारसरणी आहे. दुसरी लोकवार्ता अशी आहे कीं भारदस्त नाट्यप्रयोग

पहाण्यासाठीं ते कोणास कळूं नये अशा तऱ्हेनें गुपचूपपणें जातात. तथापि वस्तुस्थिती अशी आहे कीं नाट्यगृहांतील करमणूक ही श्रांत झालेल्या मनास विश्रांति मिळण्यासाठीं आहे. (भारदस्त प्रयोगांतील) मानस शास्त्राचे व नीतिशास्त्राचे सिद्धांत सोडविण्यासाठीं नव्हे, किंवा शोकपर्यवसायी कथानक पाहून मन उदासीन करून घेण्यासाठीं नव्हे असे त्याचें मत असावे. या त्यांच्या विचारसरणीबद्दल विद्वान् लोकात कदाचित् मतभिन्नत्व होईल, परंतु बहुसंख्याक लोकमत अशाच प्रकारचें आहे यांत संशय नाहीं. विद्वत्तेची थोरवी मिरविण्यासाठीं व कलाभिज्ञतेचें प्रदर्शन करण्यासाठीं उच्च प्रकारच्या मनोरंजनाचा पुरस्कार करणाऱ्या विद्वान् मंडळाची मनोधारणा श्रेष्ठ कीं काय या गोष्टींचा या ठिकाणीं विचार कर्तव्य नाहीं. परंतु बादशहा आपल्या मनास योग्य वाटेल ते करण्याच्या कामांत केवळ लोकमतास प्राधान्य देत नाहींत हीच गोष्ट येथें लक्षांत ठेवावयाची आहे. त्यांच्या पोषाखासंबंधानें हाच नियम लागू आहे. फॅशनकडे त्यांचे लक्ष नाहीं. ज्या तऱ्हेचा कपडा मनास येईल त्या तऱ्हेचा ते वापरतात. कित्येक लोकांचें असे मत आहे कीं इंग्लंडांत पुरुषांच्या कपड्यांत कांहीं नवीन फॅशन्स बादशहा युवराज असतांना त्यांनीं पाडल्या, पण ही गोष्ट फारशी खरी नाहीं. बिरेट आणि पुलोह ही तिकडे जास्त वापरण्याचा प्रघात त्यांच्यामुळेंच जास्त पडला ही गोष्ट मात्र खरी आहे.

त्यांच्या स्नेही मंडळीविषयीं लिहावयाचें तर जिवाभावाचे असे त्यांचे कोणी स्नेही नाहींत, पण हीहि गोष्ट खरी आहे कीं त्यांच्या इतके मित्र जगांत आणखी कोणाचेहि नसतील. बादशहा सातवे एडवर्ड हे युवराज असतां त्यांच्या जिवश्च कंठश्च मित्राची नांवें जग-

जाहीर होतीं. परंतु या आजोबासभोंवती जशी सदासर्वदा मित्रांची प्रभावळ असावयाची तसें त्यांच्या या नातवाचें नाहीं. तथापि अगदी निकट परिचयाचे म्हणावयास त्यांचे पांच सहा स्नेही आहेत. या स्नेह्यांच्या आचरणाविषयीं शंका घेण्यास कोणाला तिळमात्रहि जागा नाहीं. आतांपर्यंत बादशहा किंवा त्यांचें हें मित्रमंडळ यांच्याविषयी कुत्सितपणाचा एकहि शब्द कुणी काढल्याचे ऐकिवांत नाहीं. क्लबमध्यें जाऊन मित्रमंडळीबरोबर गप्पासप्पा झोकणें, थट्टा-मस्करी करणें हें मधून मधून चालत नसे असें नाहीं. तथापि कोणाहि मनुष्याच्या मागें त्याच्यावर टीका करणे हे त्याना मुळींच सहन होत नाहीं. एकदां एका मुत्सद्यानें दुसऱ्या मुत्सद्यावर तो नस-तांना बादशहाचे पुढ्यांत कांही विरुद्ध टीका केली तेव्हा बादशहा म्हणाले ‘ तशा प्रकारचा पुरुष तुम्हीं म्हणतां तर असेल तो, पण आजपर्यंत मला त्याचें वर्तन अगदीं सरळ दिसून आलें आहे. त्याच्याउलट अनुभव मला आल्याशिवाय त्याच्याविषयी चर्चा नको. ’

मित्रमंडळीस एखादी मेजवानी दिली आणि मंडळी फारशी नसली तर त्यावेळीं बादशहांचा मनमोकळेपणानें थट्टा विनोद चालतो. लंडनमध्यें त्यांच्या मेजवान्या बहुधा ‘ यॉर्क हाऊस ’ या वाड्यांत होतात. तथापि राजवाड्यापेक्षां त्यांना स्वतंत्रपणें वेस्टएंडमधील त्यांच्या ठराविक हॉटेलांत मेजवानीचा समारंभ करणें अधिक आवडतें.

बादशहांना गायनाची अभिरुचि आहे. प्रिन्स ऑफ् वेल्स अस-तांना दर आठवड्यास अमेरिकेंत नवीन नवीन निघालेल्या रेकॉर्ड्स व संगीत शास्त्रांतील स्वरसंशोधनपर लेख यांचीं पत्रकें त्यांच्या नांवावर येत असत. कधीं कधीं असें होई कीं ते एकाद्या नवीन

स्वर-वादनाची माहिती सांगत ती लंडनांतल्या प्रमुख बँडमास्तरनें कधी ऐकलेलीहि नसावी ! युरोपांत मेजवानीच्या वेळीं बँडवादन सुरू ठेवण्याची पद्धत आहे, आणि बादशहा या बँडवादनाचे शोकी आहेत, परंतु लंडनांत सोहोस्केअर येथें कोणाची फारशी गडबड नाहीं अशा एका शांत ठिकाणीं एक लहानसें हॉटेल आहे त्या हॉटेलात बँडही नाहीं पण उत्तम प्रतीचे जेवण आणि श्रांत मनास आराम तेथें मिळतो म्हणून बादशहा तेथें वारंवार जात असत.

या हॉटेलाचा मालक एक परराष्ट्रीय माणूस आहे. आपल्या हॉटेलात दोनतीन स्नेहीमंडळीसह येऊन भक्कम बिल देणारा हा कोणीतरी श्रीमंत तरुण आहे अशी त्या मालकाची समजूत होती. पुढें कांही महिन्यानीं त्याला बातमी लागली की हा तरुण म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून त्यावेळचे प्रिन्स ऑफ् वेल्स व आजचे ब्रिटिश सम्राट् हेच होत ! पण तो मालक व्यवहार-कुशल होता. आपण कोण आहो हें गुप्त ठेवण्याचा जर त्यांचा इरादा आहे तर आपण तें गौप्य फोडल्यानें हे घबाड हातचें जाईल असा दूरदर्शी-पणाचा विचार करून, तोहि असे दाखवूं लागला कीं खरी गोष्ट आपणांस जणूं ठाऊकच नाही ! उलट आपण कोण हें त्यास ठाऊक नाहीं, अशीच बादशहांचीहि समजूत कायम राहून ते नेहमीं तिकडे जातच राहिले ! लोकांनीं आपला बडेजाव माजवावा हें बादशहांस आवडत नाहीं व अशातऱ्हेनें गाजावाजा करणाऱ्या लोकांचा कांहीं अंतःस्थ मतलब असेल तर तो साधत नाहीं. अमूक मनुष्य पुढें पुढें करतो असें त्यांस दिसून आलें कीं त्याच्याविषयी बादशहांना सहानुभूति वाटत नाहींशी होते.

लंडन येथील एका क्लबमध्यें बादशहा रात्रीच्या वेळी गेले होते. तथून निघण्याचे वेळीं पाहातात तों आपला ओव्हरकोट ठेवलेल्या जागी नाही. लंडनच्या थंड हवेची आणि त्यांतून रात्रीच्या वेळीं असणाऱ्या थंडीची ज्याना कल्पना असेल त्यांना बाहेर हवेंत जातांना ओव्हरकोटाची किती जरूर असते हे निराळें सांगावयास नको. त्यांत त्या दिवशीं तर थंडीचा फारच जोर होता. बादशहांचा त्यावेळचा ( युवराजाचा ) ओव्हरकोट कोणीतरी नेला, हें समजताच जिकडे-तिकडे कसून शोध सुरू झाला, आणि थोड्या वेळाने अशी माहिती लागली की एक अमेरिकन पाहुणा त्या क्लबमध्यें आला होता त्यानें तो कोट नेला आहे.

युवराजांच्या जवळ यावेळी कोणी एक गृहस्थ होते ते जरा आपली शिताफी दाखविण्यासाठीं म्हणाले, " मला वाटतें त्या गृहस्थानें तो कोट अशासाठीं नेला असावा कीं " एकेवेळी युवराजाच्या मालकीचा असणारा कोट आज माझ्याकडे आहे, हा बघा ! " अशी आपणास लोकापुढें प्रौढी मिरवितां यावी ! लगेच युवराज म्हणाले, " आणि मला थंडीने आंखडून मारावे अशीहि त्या गृहस्थाची इच्छा असेल !"

एवढ्या दरम्यान, युवराजांच्या कोटाच्या शोधार्थ पोलीस सुटले होते. त्यांनीं एका भयभीत आणि ओशाळलेल्या अमेरिकन इसमास त्या ओव्हरकोटसह आणून युवराजांच्या पुढ्यांत उभे केलें. त्याच्याकडे पाहून युवराज म्हणाले, " यानंतर जेव्हां कोट चोरून नेण्याची तुम्हांस इच्छा होईल तेव्हां त्याजागीं आपला कोट ठेवा आणि तो चोरून न्या. असला अविचार पुनः करूं नका, हें लक्षांत ठेवा. "

वडिलाप्रमाणेंच एडवर्ड बादशहांनाही ' रेडिओ ' ची आवड आहे. इतर देशांतील रेडिओच्या कार्यक्रमांपेक्षां ब्रिटनमधील कार्यक्रम त्यांना आवडतात. एकादा कार्यक्रम त्यांना विशेष पसंत वाटला तर तो आपणास फार पसंत पडला असें ब्रि. ब्रॉ. कंपनीला ते स्वतः फोन करून कळवतात. त्याचप्रमाणें एकादा गचाळ वाटला तरीहि तशी टीका करावयास ते क़मी करीत नाहींत. त्यांच्या विमानांत रेडिओ असतात, पण आपल्या खास मोटारीतही त्यांनीं रेडिओ ठेवला आहे.

बादशहाना जर्मन, फ्रेंच व स्पॅनिश या भाषा येतात. युरोपखंडांतील इतर भाषाहि आपणास समजाव्या यासाठीं सवडीप्रमाणे त्यांचे प्रयत्न चालू असतात.

बादशहा युवराज असतां सार्वजनिक कार्यांत ज्याप्रमाणें त्यांचा पुष्कळ वेळ खर्च झाला आहे त्याप्रमाणें करमणूक, खेळ, गप्पासप्पा यांतही झालेला आहे. विचार केला तर, काटक आणि पूर्ण निरोगी प्रकृति आणि पूर्ण उत्साही मन असल्याशिवाय अशा प्रकारचें अविश्रांत कार्यव्यापृत्व कोणाकडून होणें शक्य नाहीं.

आतां त्यांचें वय ४१ वर्षांचे झालें आहे, आणि या वयांत साम्राज्यपद प्राप्त झालें आहे, अशा वेळी पूर्वीसारखे श्रम करीत राहतां नये असा सल्ला त्यास मिळणार हें उघड आहे; पण ती गोष्ट त्यांजकडून कितपत राखली जाईल हा प्रश्नच आहे. कारण आज वयाच्या मानानें त्यांची तारुण्यावस्था राहिली नसली तरी मनाची हिंमत अजून तरुणच आहे; आणि वयाचा परिणाम प्रकृतीवर यत्किंचित् झाला असल्याचें त्यांच्या स्वप्नीं सुद्धां येत नाहीं.

" आरोग्य पुरुषार्थाचें साधन आहे " या सिद्धांताच्या समर्थनार्थ

बादशहांचें उदाहरण आज जगापुढें ढळढळीत आहे ! आज ४२ वें वर्ष त्यांना सुरू आहे पण २० वर्षांच्या तरुणाचा उत्साह व तरतरी आणि ६० वर्षांच्या म्हाताऱ्याचा जगाचा अनुभव त्यांच्याकडे आहे.

परस्पर-विरोधी परिस्थितींनीं भरलेल्या आजच्या नवयुगांत त्यांच्या सारख्या महान् दर्जाच्या पुरुषाला ही मोठीच ईश्वरी देणगी प्राप्त झालेली आहे असें म्हटलें पाहिजे. खेळ, व्यायाम, करमणूक यांतील चांगलें व निर्दोष असेल तेवढ्याचेंच ग्रहण करून त्याचा फायदा त्यांनी आत्मसात् करून घेतला आहे आणि त्याच्या योगानें भरपूर आरोग्य, उत्तम शरीरसामर्थ्य, निर्दोष विचारशक्ति, आणि आपल्या प्रजेच्या भावनांचें यथार्थ ज्ञान या गोष्टीचा लाभ त्यांस झाला आहे.

---

# भाग ५ वा

## भविष्यकालीन अपेक्षा.

बादशहा आठवे एडवर्ड यांस राज्याधिकारप्राप्ति झाली, त्या गोष्टिसंबंधानें लिहितांना लंडन टाइम्सच्या ' अंतर्भेदी ' ह्या लेखकानें आपले कांहीं मार्मिक विचार प्रसिद्ध केले आहेत. सदर लेखक म्हणतो " एका राजाच्या पश्चात् दुसऱ्या राजाची कारकीर्द सुरू झाली ही गोष्ट, एक नवीन राजा आला या वैयक्तिक महत्त्वापेक्षां, त्या राष्ट्राच्या भविष्यकालीन नवीन परिस्थितीचा प्रारंभ त्याकाळीं झाला या दृष्टीनें अधिक महत्त्वाची आहे. त्या राष्ट्राच्या, या नवीन कारकीर्दीतील राष्ट्रीय व सामाजिक परिस्थितीची जी प्रेरकशक्ति, त्या प्रेरकशक्तीचा कार्यारंभ या नवीन कारकीर्दीनें सुरू झाला असें म्हटलें पाहिजे, ही गोष्ट सुरवातीस जरी आमच्या समजुतीत येत नसली तरी भविष्यकालीं ती इतिहासात नमूद होऊन राहील यात संशय नाही.

महाराणी व्हिक्टोरिया, बादशहा सातवे एडवर्ड, बादशहा पंचम-जॉर्ज यांच्या कारकीर्दीत प्रत्येकी वैयक्तिक विशिष्टत्व आहे, म्हणजे ही प्रत्येक कारकीर्द त्या राष्ट्राच्या विवक्षित परिस्थितीविषयी प्रसिद्ध आहे. कालास अनुसरून, परिस्थितीपुढे राजास नम्र व्हावें लागतें ही गोष्ट जरी खरी आहे, तरी विशिष्ठ परिस्थितीस राजा कारण होतो हेंही काहीं खोटें नाहीं.

एका राजाचें देहावसान झालें कीं त्याच्या कारकीर्दीतील राष्ट्रीय जीवनांत प्रजेची जी मनोभूमिका बनलेली होती ती आतां राहणार नाहीं अशी त्या प्रजेची भावना होते. म्हणूनच एका राजाच्या निधन

प्रसंगानें प्रजेच्या भावना उचंबळून येतात; आणि याच नियमानें, नवीन कारकिर्दीच्या सुरवातीस, भावी राष्ट्रीय जीवनांत आपली नवीन मनोभूमिका तयार होणार, या भावनेचा उद्भव होतो. ''

सनदशीर म्हणजे लोकमतानुवर्ती राज्यपद्धतींत राजाच्या हातीं कांहींहि सत्ता नसते, राजास लोक-प्रतिनिधींच्या हातांतील बाहुलें होऊन रहावे लागते असे पुष्कळास वाटतें. पण ही गोष्ट सर्वांशीं खरी आहे असें म्हणता येणार नाहीं. तसें असतें तर विसाव्या शतकांतील ब्रिटिश सिंहासनावरील राजास एक प्रतिष्ठित गृहस्थ यापलीकडे सामाजिक अगर राजकीय महत्त्व राहिलें नसतें. सनदशीर राजांच्या मालिकेत पंचम जॉर्ज बादशहास श्रेष्ठ मानतात, त्याचें कारण त्यांच्या ठिकाणीं स्व-कर्तव्य—जागृति नव्हती किंवा त्यांना स्वतःची मते नव्हतीं हें मुळीच नव्हे. तर त्याचे कारण, ती मते कोणत्याहि पक्षोपपक्षाची भाडभीड न धरता केवळ लोकमताचे अचूक निदान करून त्या अनुरोधानें ते बोलून दाखवीत, हें आहे. आपल्या वडिलाचें हें धोरण आपण तंतोतंत पुढें चालवूं अशी बादशहा आठवे एडवर्ड यांनीं जाहीर घोषणा केल्यामुळेंच सर्वांस संतोष वाटत आहे. व्यावहारिक दृष्ट्या विचार केला तर सनदशीर राज्यकर्त्या राजावरील जबाबदारी त्याच्या एकाद्या सामान्य प्रजाजनाहून कमीच असते असें म्हणावे लागतें. कारण त्या मनुष्यास बरेवाईट मत देण्याचा तरी अधिकार असतो. राजा आपल्या प्रधानमंडळाच्या अनुमतीशिवाय राजकीय प्रकरणांत स्वतःच्या मतानें असें कांहींच करूं शकत नाहीं. अर्थात् राजाकडून अन्याय होणें शक्य नाहीं. अन्याय्य कृत्यास त्याचें प्रधानमंडळ जबाबदार असतें. मग अन्याय्यकृत्य करण्याचें सुद्धां जर त्याच्या हातांत नाहीं तर न्याय्य कृत्य करण्याचें तरी त्याच्या हातांत

काय आहे ? सामान्य प्रजाजनाप्रमाणें आपलें मत बोलून दाखविण्याचा राजाला हक्क आहे. पण शिवाय त्याला चांगल्या गोष्टी करण्याच्या असंख्य संधीहि प्राप्त होत असतात. प्रत्येक गोष्टींत राजाचे मत घेतलें जातें आणि कोणतीहि गोष्ट प्रधानमंडळानें करण्याचें ठरविले तर त्या गोष्टीची सयुक्तिकता, आवश्यकता वगैरे हरएक कारणांचा समाधानकारक खुलासा राजास प्रधानमंडळाकडून मागता येतो. त्याच्याबद्दल साधकबाधक चर्चा करता येते. सिंहासनाधिष्ठित पुरुष या नात्यानें त्यांच्या मतास वजन असतें, हें तर झालेंच, पण वैयक्तिक विचार-स्वातंत्र्य, कर्तबगारीची हुशारी, लोकांवर छाप बसविण्याची हूक, उदात्त विचारसरणी, लोकसंग्रह करण्याची कुशलता हे गूण जर राजाच्या अंगात असले तर राजानें केलेली अप्रत्यक्ष सूचना किंवा मत-प्रदर्शन यांचा परिणाम प्रधानमडळाच्या नियोजित धोरणावर होईल तो पार्लमेंटांतील बहुसंख्याक समर्थनाने अगर विरोधानें होणार नाहीं !

या दृष्टीने विचार केला तर नवीन बादशहा आठवे एडवर्ड यांच्या कारकीर्दीविषयीं अनुकूल व आशाप्रद अनुमान निःसंशय काढतां येईल. कारण इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीनंतर त्यांच्या इतका स्वतंत्र व तरतरीत बुद्धिमत्तेचा राज्यकर्ता ब्रिटनच्या राजसिंहासनावर अद्याप आला नाही. दुसरा चार्लस राजा व्यवहारकुशल होता तर चवथा जॉर्ज रसिक व गुणीजनांचा पुरस्कर्ता होता. महाराणी व्हिक्टोरिया, सातवे एडवर्ड व पंचमजॉर्ज हे प्रारंभीं नसले तरी नंतर अनुभवानें आपल्या पदास लायक झाले. पण बुद्धिमत्ता आणि कर्तव्यदक्षता या दृष्टीनें नवीन बादशहा या सर्वांपेक्षां मूळचेच श्रेष्ट आहेत.

अमुक वेळीं अमुकच काम साधून घेतलें पाहिजे हें ज्ञान म्हणजे प्रयोजकता, प्रियवादित्व, कोणत्याही विषयाची चर्चा चालली असेल तर त्याविषयांतील अंतःस्थ मर्म शोधून काढण्याची शैली, हे गूण इतरांप्रमाणें सनदशीर राजाच्या ठिकाणी असणे महत्त्वाचे आहे. बादशहा आठवे एडवर्ड यांच्या ठिकाणीं हे गुण आहेत असें मानण्यास आतांपर्यंतच्या अनुभवावरून बरीच जागा आहे, आणि एक गोष्ट तरी नि.संशय खरी आहे कीं कोणत्याही विषयांतील मर्म ताबडतोब ग्रहण करण्यास लागणारी बुद्धिमत्ता आणि धूर्तपणा हे गूण तर या गादीवरील पूर्वींच्या कोणत्याही व्यक्तीपेक्षां जास्त आहेत. यात एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही कीं सनदशीर राज्यपद्धतींत सुद्धा राजाची कारकीर्द यशस्वी होण्यास त्याच्या ठिकाणीं केवळ वरील गूण असून भागत नाहीं. स्वतःच्या अंगीं हे गूण असून जो उपयोग होईल त्यापेक्षां लोकाच्या अंगातील त्या गुणाची पारख करण्याची चलाखी अधिक उपकारक ठरेल. सारांश, वैयक्तिक शील आणि देहस्वभाव यावर सर्व मदार असते.

राजसिंहासनास एकाद्या संस्थेप्रमाणें चिरस्थायित्व प्राप्त झालें म्हणजे पूर्वीचा राजा व नवीन राजा या दोहोंमधील स्वभावभिन्नतेकडे लोक सूक्ष्म नजरेनें पाहतात. पंचमजॉर्ज बादशहांनी आपले साम्राज्य-पद कसें शिस्तवार चालवले याचें सूक्ष्म निरीक्षण नवीन बादशहांनी केलें आहे, आणि सनदशीर राज्यकारभाराच्या स्वरूपाविषयी चिरंजिवांचें मत वडिलांसारखेंच आहे. परंतु देहस्वभाव, सुशिक्षितपणा व इतर विविध मनोवृत्ति या गोष्टींत पिता पुत्रांत बराच फरक आहे. जॉर्ज बादशहांच्या आयुष्यास वळण लागण्याचा तारुण्य-काल

दर्यावर्दीपणांत गेल्यामुळें त्या जीवनक्रमास सहज अशी पुराणप्रियता त्यांच्या स्वभावांत उतरली होती. याच्याउलट नवीन बादशहाचा हा काल केवळ लष्करी पेशातच नव्हे, तर जुनी संस्कृति पार हादरून टाकणाऱ्या जगड्व्याळ युद्धाच्या धुमश्चक्रीत गेला. कित्येक पिढ्यांच्या अंतरानें दोन संस्कृतीत क्रांती होणार नाही, ती या एका महायुद्धानें जुन्या व नव्या पिढीत घडवून आणली अशा या नव्या संस्कृतीत नवीन बादशहांची मनोधारणा तयार झाली आहे.

दुसरी गोष्ट अशी की, जॉर्ज बादशहांस युवराजपद प्राप्त झाल्यावर आरमार खात्यांतून ते बाहेर पडले खरे, पण त्यापुढील वर्षे त्यांनीं स्वस्थपण आपला गृहस्थाश्रम व राजदरबार यांत काढलीं. प्रस्तुत बादशहांचें तसे नाहीं; आपल्या अमदानीतील प्रत्येक चळवळींत त्यांना प्रत्यक्ष भाग घ्याना लागला आहे. वडिलाप्रमाणें त्यांचा प्रवासही पुष्कळ झाला, पण दोहोंच्याही प्रवासांचें स्वरूप भिन्नभिन्न होतें. जॉर्ज बादशहांच्या प्रवासांत त्यांच्या जुन्या समजुती होत्या त्या दृढमूल झाल्या. चिरंजिवांच्या प्रवासाचे ध्येय जगांतील निरनिराळ्या संस्कृतींचा अनुभव घेऊन आधुनिक जगाचा परिचय करून घेणें हें होतें. राजदरबारांतील श्रमांचा परिहार होण्यासाठीं खेड्यापाड्यांत जाऊन विश्रांती घेतली कीं झालें एवढ्यावरच जॉर्ज बादशहांच्या मनाची समाधानी होत असे. नवीन बादशहांस जुन्या विचारसरणींचे छापी कार्यक्रम मुळींच आवडत नाहीत.

बादशहांस नवीन नवीन स्थळें पाहण्याची आवड आहे, त्याप्रमाणें नव्या नव्या लोकांशीं परिचय व्हावा अशीहि त्यांना हौस आहे. नवें आणि अपरिचित असें कांहीं दिसलें कीं तिकडे त्यांचें मन वेधतें.

इंग्लंडच्या उत्तर भागांतील उद्योगधंद्याचे कारखाने त्यांनीं जाऊन पाहिले, परंतु ते पाहण्यांत गरीब मजूर लोकांची अंतःस्थ परिस्थिति समजून घ्यावी हा परोपकाराचा उद्देश होता. त्यांचे वडील जॉर्ज बादशहा हे लहान थोर सर्वांशीं सारख्या प्रेमळपणाने वागत, परंतु बहुसंख्याक जनतेच्या अंतःस्थस्थितीची त्यांना कल्पना नव्हती. लोकांस मात्र बादशहा थोर मनाचे आहेत एवढे कळून आलें होतें. परंतु बादशहा आठवे एडवर्ड यांस गरीब लोकांची स्थिति पाहून कळवळा उत्पन्न होतो, आणि गरिबांस दुःखपरिमार्जनाच्या कामी ते शक्य ते प्रयत्न केल्याशिवाय राहत नाहीत.

जॉर्ज बादशहा व एडवर्ड बादशहा याच्या मनोवृत्तींत असे भिन्नत्व आहे. मात्र यात एक गोष्ट आहे ती ही की, जॉर्ज बादशहा आपल्या विशिष्ठ सरळ धोपटमार्गी आचरणानें या गादीवरील आजपर्यंतच्या कोणत्याही पुरुषाहून लोकप्रिय झाले; पण तशी धोपटमार्गी वृत्ति आजच्या बादशहाच्या ठिकाणी नाही.

त्याचा स्वभाव भावनाप्रधान असून कर्तव्याची तीव्र जाणीव त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें, नवीन प्राप्त झालेल्या अधिकारपदाचें कर्तव्य आणि देहस्वभाव यांत समतोलपणा राखण्यास कित्येक प्रसंगीं त्यांस फार आत्मसंयमन करावे लागणार आहे. तथापि पूर्वीच्या आणि नवीन कार्यपद्धतींत सकृद्दर्शनीं फरक दिसला तरी, प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत केव्हां तरी असा एक प्रसंग येतो कीं त्यावेळीं त्यास जुनी परंपरा किंवा नवमत यांतून बहुधा एक कोणतें तरी स्वीकारावें लागतें. या नियमास अनुसरून नवीन बादशहांवर साम्राज्यपदाची इभ्रत आणि परंपरा यांचेंच वर्चस्व बसून आजपर्यंतच्या परंपरेचाच विजय होईल असा संभव दिसतो.

पण ही एकच बाजू या प्रश्नास संभवते असें मात्र नाहीं. कारण कार्यपद्धतीचें स्वरूप नवविचारांप्रमाणें ठेवूनसुद्धां सनदशीर राज्यकारभार चालवितां येतो असेंही ठरण्याचा संभव आहे. कारण ती गोष्ट यशस्वी होण्यास लागणारी कल्पकता आणि खंबीरपणा नवीन बादशहांच्या ठिकाणीं आहे. खुद्द पंचमजॉर्ज बादशहा यांचेच धोरण घेतलें तरीं ते महाराणी व्हिक्टोरिया अगर सातवे एडवर्ड यांच्याहून निराळेंच होतें. कदाचित् असेंही म्हणतां येईल कीं त्यांची कारकीर्द इतकी यशस्वी होण्याचे कारण, त्यांची मनोधारणा त्या काळांतील प्रवृत्तीसारखी नव्हती, किंबहुना ते आपल्या मनूच्यामार्गें होते, आणि सनातनी मताचे होते. आठवे एडवर्ड हे आधुनिक नवमतवादांत पूर्ण समरस झाले आहेत त्यामुळें ते आपली विचारसरणी यशस्वी करून दाखवितील. नाहीं कोणी म्हणावे ?

यांत अमुक गोष्ट योग्य आणि अमुक अयोग्य असें सांगतां यावयाचे नाही. एकानें जी गोष्ट ज्या मार्गानें साधली तो मार्ग दुसऱ्याच्या कर्तबगारीस कदाचित योग्य ठरणार नाही ? दुसऱ्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास आणि कर्तव्यपरायणता असल्यास, तो ती गोष्ट आपल्या पसंतीच्या मार्गानें साध्य करून घेईल. बादशहा आठवे एडवर्ड यांचें व्यक्तिमत्व आणि ब्रिटिश राजकारण या दोन गोष्टींत राजकारणावर व्यक्तिमत्वाचें वजन पडून व्यक्तिमत्व श्रेष्ठ ठरेल. या भावी श्रेष्ठत्वावर आज अनिश्चिततेचें पटल आहे, त्यामुळें या प्रश्नाची भवति न भवति सर्वत्र चालू आहे आणि ती विशेष जिज्ञासापूवक चालू होण्याचें कारण नवीन बादशहांविषयी प्रत्येकाच्या अंतःकरणांत असलेली निष्ठा व सहानुभूति हीं होत.

राजकारणदृष्ट्या पाहिलें तर, परिस्थिति शुभ व समाधानकारक असतांना नवीन बादशहांच्या कारकीर्दीस सुरवात झाली आहे. पंचम

जॉर्ज बादशहा गादीवर आले त्यावेळी इंग्लंडांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांत तीव्र विरोध माजून राहिला होता व आपसांत यादवी सुरू होते कीं काय अशी धास्ती वाटत होती, ती स्थिति आज राहिलेली नाहीं. मागेंपुढें ती परिस्थिति पुनः उद्भवेल की काय आणि माजी बादशहांनीं आपले सर्व प्रयत्न एकवटून राष्ट्रांतील सर्व राजकीय पक्षांत जो एकोपा घडवून आणला आणि जो कायम टिकविण्यासाठीं आवश्यक असें धोरण आपल्या अमदानींत ठेवले, तो एकोपा कायम राहील कीं काय, ह्या प्रश्नाचा आज विचार करण्याचें कारण नाहीं. कारण नजीकच्या भविष्यकालीं तरी तसा संभव दिसत नाही. आज सर्वपक्षीय ( राष्ट्रीय ) प्रधानमंडळ अधिकारारूढ आहे आणि ते कर्तबगार व आपली जबाबदारी ओळखणारें आहे, असें त्याच्या आतांपर्यंतच्या कारकीर्दीवरून मानावयास हरकत नाही. राष्ट्रीय प्रधानमंडळ हेंच ब्रिटनच्या राज्यव्यवस्थेस खरें पथ्यकर असते ही गोष्ट सिद्धांतरूप ठरण्याइतकी कर्तबगारी त्या प्रधानमंडळाकडून होईल की काय ही गोष्ट अद्याप प्रयोगावस्थेत आहे.

नव्या मनूतील विचारप्रवृत्ति नवमताकडे आहे. हे नवमत सर्वपक्षीय असलें पाहिजे आणि तें प्रत्येक पक्षाच्या विचारांतील उत्तमांश घेऊन बनविलें पाहिजे, राष्ट्रीय प्रगती द्रुतगतीनें पण शांततेनें, शिस्तवार होण्यास तें सहाय्यक झालें पाहिजे, अशी सर्वांची इच्छा आहे. पंचवीस वर्षांपूर्वी जॉर्ज बादशहा अधिकारारूढ झाले त्यावेळी सर्व विरोधी पक्षाची एकवाक्यता करून त्यांचा एकोपा करणें ही जबाबदारी त्याजवर होती. नवीन बादशहांवरील आजची जबाबदारी नवविचारांचा राजकारणाशीं मेळ घालून त्या अनुरोधानें प्रगति साधणें ही आहे.

ब्रिटिश साम्राज्यातील अंतःस्थ राजकारणाची ही गोष्ट झाली. जागतीक परिस्थितीत आंतर्राष्ट्रीय राजकारणाच्या आकाशांत अस्वस्थतेचे काळेकुट्ट ढग आले आहेत आणि ते केव्हा कोसळतील याचा नेम नाही, अशा स्वरूपाची भडक वर्णनें आपण पुष्कळ दिवस वाचीत आलों आहो आणि सध्या वाचीत आहों, पण त्याविषयीं कल्पनासृष्टीत चित्र रंगविण्यांत अर्थ नाही. १९१० साली जॉर्ज बादशहांच्या कारकीर्दीच्या सुरवातीस, लवकरच जागतीक महायुद्धाची वावटळ सुटेल अशी कोणाची कल्पना होती ? पण तशी वावटळ उद्भवून तिच्यांतून ब्रिटिशसाम्राज्य सहीसलामत व यशस्वी होऊन पार पडले आहे. भविष्यकालाच्या उदरात काय साठवलेलें आहे त्याची अचूक कल्पना करणें मानवीबुद्धिसामर्थ्याच्या पलीकडचें आहे.

आंतर्राष्ट्रीय राजनीतीच्या दृष्टीने पाहिले तर बादशहा आठवे एडवर्ड यांची मनःप्रवृत्ति पाश्चात्य अगर पौर्वात्य राजकारण या दोहोंसही अनकूल अगर प्रतिकूल आहे असे कांहीच नाहीं. बादशहा सातवे एडवर्ड यांचें धोरण युरोपांतील राष्ट्रांत परस्परसलोखा असावा अशा प्रकारचे होत. याच धोरणामुळें ' शांतता-प्रस्थापक एडवर्ड ' ( Edward the Peacemaker ) हे भूषण त्यांस प्राप्त झालें. बादशहा आठवे एडवर्ड यांची विचारसरणी याबाबतींत आपल्या वडिलांप्रमाणेंच आहे. युरोप हेच आपले सर्व जग नव्हे, आणि महायुद्धाचा समेट ज्या तहानें झाला त्या व्हर्सायच्या तहांतच जगाचें राजकारण सांठवलेले नाहीं, तर ब्रिटिश साम्राज्य जगाच्या पाठीवर जेथें जेथें पसरलेलें आहे, तेथें तेथे साम्राज्याच्या राजकारणाचीं सूत्रें गुंतलेलीं आहेत आणि त्या सर्व सूत्रांचें सारखें नियमन झालें पाहिजे अशा तऱ्हेची नवीन बादशहांची विचारसरणी आहे.

जॉर्ज बादशहांच्या कारकीर्दीत ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील परस्परसंबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकावयवांत ब्रिटिश राष्ट्राचें स्थान काल-गणनेच्या दृष्टीनें कदाचित पहिलें लागेल, परंतु दर्जांत आज क्रमवारी राहिलेली नाहीं. साम्राज्यातील सर्व राष्ट्राचा आणि वसाहतींचा दर्जा परस्परांशी समान असून ती एकाच साम्राज्यछत्राखालीं एकवटलीं आहेत अशी विचारप्रवृत्ति आतां उत्पन्न झाली आहे. या सर्वांचे स्नेहसंबध दृढतर करून त्यांच्यात परस्पर-बंधु-भावनेचे प्रेम उत्पन्न करणे ही गोष्ट बादशहा आठवे एडवर्ड यांच्या कारकीर्दींत घडून यावी असाहि ईश्वरी संकेत असेल !

'**बादशहा आठवे एडवर्ड यांचा अल्प परिचय**' असें नांव या पुस्तकास आम्ही कां दिलें हे आतां आमच्या वाचकाच्या लक्षांत आले असेल. हें चरित्र येथें पूर्ण होत नसून राजपदावस्थेतील त्यांच्या चरित्रास नुसती सुरवात होत आहे. अर्थात् या चरित्रांत आणखी शेंकडो प्रकरणांची भर पडणार आहे. ही पुढील प्रकरणे मानवी दृष्टीस दिसण्यास, त्यांवर भविष्यकालाचा पडदा आहे तो दूर झाला पाहिजे. हा पडदा दूर झाल्यावर हीं प्रकरणें नितांत रम्य व उज्ज्वल दिसतील व त्यांत आपल्या हिंदराष्ट्राचे प्रकरणही बाकीच्या प्रकरणांइतकेंच तेजस्वी दिसेल अशी आपण सर्वजण अपेक्षा करूं, व तें तसे दिसावें अशी त्या जगन्नियंत्याकडे प्रार्थना करूं !

दरम्यान हे पुस्तक,

अपूर्ण—

ईश्वर राजाचे रक्षण करो !